








# परशुरामीय
## १९८२

WITH BEST COMPLIMENTS FROM

**DON'T LET TOMORROW CATCH YOU UNPREPARED.**

SAVE NOW WITH

**BANK OF BARODA.**

Thou shalt forever be prosperous with

**Bank of Baroda**

A Network of Over 1600 Branches in
India And Abroad - In U. K.
East Africa, Mauritius, Fiji Islands,
Guyana, America, Belgium
& Gulf Countries.

शिक्षण प्रसारक मंडळी
सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे

S P COLLEGE PUNE 30 LIBRARY

# परशुरामीय

## मार्च १९८२

**विद्यार्थी प्रतिनिधी :**

भालचंद्र पटवर्धन ( तृ. व. वाणिज्य )
वंदना बोकील ( तृ. व. साहित्य )
अशोक चौधरी ( तृ. व. शास्त्र )
श्रीवल्लभ दामले ( बारावी वाणिज्य )
छाया हुवली ( बारावी साहित्य )
सुधेंदु काशीकर ( अकरावी शास्त्र )

**संपादक :**

डॉ. चंद्रशेखर बर्वे
डॉ. सौ. श्रीलेखा साने

**सल्लागार :**

प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर
उपप्राचार्य प्रा. म. रा. राईलकर
उपप्राचार्य प्रा. भ. ना. कुलकर्णी
उपप्राचार्य प्रा. आ. गो. मोडक
कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. अ. गो. जुमडे

**सदस्य :**

प्रा. अ. वा. नाईक
प्रा. सु. ब. पळशीकर
प्रा. सु. श्री. अलूरकर
प्रा. डॉ. सौ. मेधा कुमठेकर
प्रा. रोहिणी पटवर्धन
प्रा. अ. र. फडके

S P College Library
83029
Rack
101502 P16

SP COLLEGE LIBRARY, PUNE30.
Accession No 101502
Call No.. m 378.05/Par
Price ........ Date 1983
19 1983

S
23/7/83

# लिंगाणा-एक जिंकलेले आव्हान

[ मुखपृष्ठ - परिचय ]

सह्याद्रीमध्ये गिर्यारोहकांना आव्हान ठरणारा, गिर्यारोहणातील यशाचे प्रतीक समजला जाणारा आणि एक 'थ्रिल क्लाइंबिंग' साठी प्रसिद्ध असलेला लिंगाणा किल्ल्याचा सुळका श्री. अभय कुलकर्णी ( तृ. व. वाणिज्य ) श्री. सुनील बोडस ( तृ. व. वाणिज्य ) व प्रा. सु. दा. गोरे ह्या तिघांनी चढून जाण्यात यश मिळाले. लिंगाण्याच्या ह्या सुळक्यावर ढासळणारे खडक, भेदक खडकांचे मुरुम, निसटणारे गवत आहे. त्यामुळे कोठूनही पडल्यास मरणाशिवाय पर्याय नाही. आणि ह्या कारणामुळेच हा सुळका चढून जाण्यात आत्तापर्यंत फक्त २५ ते ३० जणांनीच यश मिळवले आहे. त्या यादीत वरील तिघांनी आपले नाव नोंदवून गिर्यारोहण क्षेत्रातील एक अवघड टप्पा गाठला आहे.

आपल्या महाविद्यालयातील वरील तीन गिर्यारोहकांनी दि. १०-१२-१९८१ रोजी ११ वाजून १० मिनिटांनी लिंगाण्याच्या सुळक्याच्या माथ्यावर पाऊल ठेवले व दुपारी ३ वाजून ४५ मिनिटांनी ते यशस्वीरीत्या खाली उतरले. त्यांनी केवळ ३ तास १० मिनिटांत हा सुळका सर केला व उतरण्यास त्यांना ४ तास लागले. त्यांनी दोराशिवाय इतर कोणत्याही गिर्यारोहण-उपयोगी साहित्याचा उपयोग केला नाही.

सुळक्याची उंची ४५० फूट आहे व त्याचा आडवा विस्तार ११०० फूट आहे. प्रत्येक खडक ठिसूळ आहे व कोठूनही ढासळण्याची शक्यता आहे. त्यामुळे कुठल्याही खडकावर हात किंवा पाय टाकताना विचार करावा लागतो. कारण हात अथवा पाय घसरल्यास मरण हा एकमेव शेवट असतो.

वर्षातील बराचसा काळ डोंगरदऱ्यांत, निसर्गाच्या सान्निध्यात घालवणाऱ्या वेगवेगळ्या साहसपूर्ण मोहिमा काढणाऱ्या सर्व गिर्यारोहकांना उत्तरोत्तर असेच यश मिळत जावो ही प्रार्थना.

C 23/7/83

**सतीश पाकणीकर**
द्वि. व. शास्त्र

मुद्रक : **य. गो. जोशी**, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
प्रकाशक : प्राचार्य डॉ. **दि. ब. फेरुर**, स. प. महाविद्यालय, पुणे ४११ ३०

# संपादकीय विभाग

# संपादकीय दृष्टिक्षेप

स. प. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचा हा पहिलाच एकत्र निघणारा अंक. महाविद्यालयीन कर्तृत्वाचे संकलित चित्र यात पाहावयास मिळेल. स्थल ( पृष्ठ ) संकोच व कालमर्यादा यांमुळे हे चित्र विस्तृत देता आले नाही, याची जाणीव आम्हांला आहे. तसेच, मुद्रणालयातील अडचणींमुळे व वीजपुरवठयातील अडथळयांमुळे हा अंक वेळेवर देता आला नाही, याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

★

जागतिक, भारतीय, प्रांतिक, कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी सध्या सर्वत्र अस्थिर, अशांत परिस्थिती असलेली दिसते. अशा परिस्थितीत साजऱ्या होणाऱ्या थोर व्यक्तींच्या, अमर ग्रंथांच्या शताब्दी-समारोहांमुळे या परिस्थितीचे गांभीर्य फार तीव्रतेने जाणवते. अर्थात, अशा परिस्थितीत चालू असणाऱ्या विधायक कार्यक्रमांमुळे, उपक्रमांमुळे ही तीव्रता काहीशी सुसह्यही होते.

★

या संदर्भात, गेल्या वर्षी महाविद्यालयात झालेल्या विशेष कार्यक्रमांचा उल्लेख करावासा वाटतो. महाराष्ट्रस्तरावरील आंतरमहाविद्यालयीन काव्यस्पर्धा, ' सौंदर्यानुभव ', ' भारतीय लोकशाही व सामाजिक बदल ' आणि ' ऊर्जा-समस्या ' या विषयांवरील तीन चर्चासत्रे, श्री दत्तमहाराज कवीश्वर व पंडित श्रीनिवासशास्त्री यांनी अनुक्रमे ' श्री ज्ञानदेव व दत्तसंप्रदाय ' आणि ' ब्रह्मवल्लीतत्त्वप्रकाश ' या विषयांवर गुंफलेल्या दोन कौशिक व्याख्यानमाला, भूगोल विभागाने पुरा केलेला मावळ तालुक्यातील कृषिनियोजना-विषयीचा संशोधन-प्रकल्प. या कार्यक्रमा-उपक्रमांमुळे महाविद्यालयातील बौद्धिक, शैक्षणिक वातावरण विशुद्ध होण्यास चांगलीच मदत झाली.

★

आपल्याला सर्वांना आनंद व्हावा आणि अभिमान वाटावा अशी कर्तबगारी महाविद्यालयातील काही प्राध्यापकांनी दाखविली–

- प्राचार्य डॉ. केरूर पुणे विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रशाखेच्या अधिष्ठाता ( डीन ) पदावर बहुमताने निवडले गेले.
- प्रा. करमरकर ( भूगोल ), प्रा. कार्लेकर (भूगोल), प्रा. तुळपुळे ( रसायनशास्त्र ), प्रा. सौ. शास्त्री ( समाजशास्त्र ) व प्रा. सौ. कुमठेकर ( मानसशास्त्र ) यांचे प्रबंध पुणे विद्यापीठाने स्वीकारून त्यांना पीएच्. डी. पदवी दिली.
- प्रा. हरिश्चंद्रकर ( संख्याशास्त्र ), प्रा. कात्रे (गणित), प्रा. पळशीकर ( राज्यशास्त्र ), प्रा. सौ. भागवत (तत्त्वज्ञान), प्रा. प्रकाश सोमण ( तत्त्वज्ञान ), प्रा. कु. विद्या नाडकर्णी ( तत्त्वज्ञान ) यांनी पुणे विद्यापीठाच्या एम्. फिल्. परीक्षेत उज्ज्वल यश मिळविले.
- श्रीमती मंजूषा दाते ( गणित ) व श्रीयुत श्रीनिवास केळकर ( रसायनशास्त्र ) यांनी पुणे विद्यापीठाच्या बी. एड्. परीक्षेत स्पृहणीय यश संपादन केले.
- प्रा. अ. गो. जुमडे यांनी मंचर महाविद्यालयात, ' कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रश्न ' या विषयावर व्याख्यान दिले.
- प्रा. अरुण बेलसरे (इंग्रजी) यांनी तळेगाव, सोमेश्वरनगर व नारायणगाव येथे बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता विनाशुल्क खास व्याख्याने दिली.
- डॉ. चंद्रशेखर बर्वे ( मराठी ) यांची ' नाट्यदर्शन ' नामक ग्रंथलेखन योजना विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वीकारली.

—या सर्वांचे ( व ज्यांची माहिती आमच्यापर्यंत पोहोचली नाही त्यांचेही ) हार्दिक अभिनंदन.

★

प्रा. रं. ना. गायधनी (इतिहास) हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. अध्यापनाखेरीज त्यांनी केलेले ग्रंथलेखन व महाविद्यालयासाठी विविध रूपांत केलेले कार्य यांचे स्मरण सर्वांना सदैव राहील. प्रा. गायधनी यांची शांत वृत्ती, धडाडी ही लक्षणीय होय. त्यांना शुभेच्छा.

* *

कनिष्ठ महाविद्यालयाच्या अकरावी वर्गाच्या वार्षिक परीक्षा मार्च १९८१ च्या शेवटच्या आठवड्यात पार पडल्या. यंदाच्या वर्षी तिन्ही शाखांचे निकाल गणकयंत्राच्या साहाय्याने तयार करण्यात आले. निकालपत्रकांसाठी आकर्षक कार्डे तयार करण्यात आली होती.

अकरावी वर्गांचा निकाल दि. ६ मे रोजी लागला. याच दिवशी 'विशाल सह्याद्री'चे माजी संपादक, माजी न्यासदार व शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे सदस्य मा. श्री. अनंतराव पाटील यांच्या हस्ते विविध विषयांमध्ये पहिल्या आलेल्या व प्रत्येक शाखेमध्ये पहिल्या तीन क्रमांकांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा, पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला.

यंदाचा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९ जून १९८१ रोजी लागला. आपल्या महाविद्यालयातील शास्त्र व साहित्य शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळविले. कु. वर्षा क्षीरसागर ही विद्यार्थिनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या साहित्य शाखेमध्ये सर्व विद्यार्थ्यांमध्ये बोर्डामध्ये पहिली आली. कु. गौरी चाफेकरने पाचवा क्रमांक मिळविला.

शास्त्र शाखेमध्ये कु. स्वाती हळबे सर्व विद्यार्थ्यांमध्ये आठवी आली. तिने वास्तवशास्त्रामध्ये १००/१०० गुण मिळवून ब्रह्मीभूत करपात्रीजी महाराज पारितोषिक मिळविले. कु. अनुपमा दाते एकूणामध्ये दहावी आली व कु. विजया म्हैसूरकर एकूणामध्ये तेरावी आली. तिलाही वास्तवशास्त्रामध्ये १००/१०० गुण मिळाले आहेत. कु. माधुरी सहस्रबुद्धे/सठेचेही यश उल्लेखनीय आहे. दोनच वर्षांपूर्वी आपण सुरू केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रम विभागातील स्कूटर-मोटरसायकल-सर्व्हिसिंग या विषयामध्ये आपल्या महाविद्यालयातील श्री. प्रदीप कुरुलकर व श्री मिलिंद बाध २०० पैकी १६४ गुण मिळवून बोर्डामध्ये पहिले आले आहेत. आपल्या शिक्षकांनी वर्षभर या विद्यार्थ्यांवर अपार कष्ट घेतले होते. त्यांच्या कष्टाचे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवून चीज केले.

दि. १८ जून १९८१ रोजी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या वरील विद्यार्थ्यांचा सत्कार महाराष्ट्राचे शिक्षण संचालक डॉ. श्री. वि. वि. चिपळूणकर यांच्या हस्ते करण्यात आला. आपल्या महाविद्यालयातील काही शिक्षकांनी मे महिन्याच्या सुटीमध्ये शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या मार्गदर्शन वर्गांचे संचालन केल्याबद्दलही त्यांचे विशेष अभिनंदन केले.

☆

आपल्या महाविद्यालयातील बारावी वाणिज्य वर्गातील एक हुशार विद्यार्थिनी कु. जयश्री खाडीलकर या विद्यार्थिनीचे एप्रिलमध्ये अकाली निधन झाले. ती उच्च माध्यमिक वाणिज्य परीक्षा ७८% गुण मिळवून उत्तीर्ण झाली. परीक्षेचा निकाल तिच्या निधनानंतर लागला. तिच्या वडिलांनी तिच्या स्मरणार्थ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत आपल्या महाविद्यालयात वाणिज्य शाखेत पहिला क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थिनीसाठी रु. १००/- चे पारितोषिक ठेवले आहे. यंदाचे हे पारितोषिक कु. ज्योत्स्ना साठे या विद्यार्थिनीला मिळाले.

☆

तीन वर्षांपूर्वी आपण सुरू केलेला व्यावसायिक अभ्यासक्रम विभाग अतिशय चांगल्या पद्धतीने चालू आहे. गतवर्षी या विभागातर्फे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'स्कूटर मोटरसायकल सर्व्हिसिंग' व 'इलेक्ट्रॉनिक्स' या विषयांचे सहयोगी अभ्यासक्रम चालविले होते. या प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये १५ विद्यार्थी प्रशिक्षित केले गेले. स्कूटर मोटरसायकल सर्व्हिसिंग या अभ्यासक्रमासाठी एक गॅरेज विद्यार्थी वसतिगृहाच्या भोजन शाळेशेजारील इमारतीमध्ये उभे करण्यात आले आहे. या गॅरेजचे उद्घाटन शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. मोहनराव गर्दे यांच्या हस्ते दि. १३ नोव्हेंबर १९८१ रोजी करण्यात आले.

व्यावसायिक अभ्यासक्रम विभागामध्ये आता ३ शिक्षक, ३ इन्स्ट्रक्टर्स, १ वर्कशॉप असिस्टंट, १ भांडाररक्षक व २ शिपाई आहेत. कनिष्ठ महाविद्यालयाच्या या विभागासाठी प्रा. डॉ. न. रा. शेटे यांची विभागप्रमुख म्हणून नेमणूक दि. १ एप्रिल १९८१ पासून करण्यात आलेली आहे.

क्रीडा विभागामध्ये यंदा प्रथमच भरलेल्या कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाने शिरीष खैरे याच्या नेतृत्वाखाली उपविजेतेपद संपादन केले आहे. कु. जयश्री बापट व कु. संजीवनी करंदीकर या अकरावीतील दोन विद्यार्थिनींची पतियाळा येथील स्पोर्टस् इन्स्टिटयूटमधील प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. त्यांचे प्रशिक्षण चालू असून दिल्ली येथे नोव्हेंबर १९८२ मध्ये होणाऱ्या आशियाई स्पर्धांमधील जिम्नॅस्टिक्ससाठी भारतातर्फे त्यांची निवड होण्याची शक्यता आहे. वर्षभरामध्ये ठिकठिकाणी झालेल्या स्पर्धांमध्ये त्यांना अनेक सुवर्ण व रौप्य पदके मिळाली आहेत. महाविद्यालयाला त्यांचा अभिमान वाटतो. कु. स्मिता देवस्थळी ही कबड्डीपटू महाराष्ट्रातर्फे राष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकली असून तिनेही वर्षामध्ये अनेक पदके मिळविली आहेत. श्री प्रसन्न, पिंपळे, योगेश जोशी, श्री. भांडारकर, श्री. अभिजित कुलकर्णी हे चार विद्यार्थी यंदा सी. के. नायडू क्रिकेट स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातर्फे खेळले. श्री. दीनानाथ लेले या विद्यार्थ्याची प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथे झालेल्या संचलनासाठी निवड झाली होती. श्री. कढे हा विद्यार्थी महाराष्ट्रातर्फे अनेक टेनिस स्पर्धांमध्ये खेळला असून मार्च-एप्रिल–मे मध्ये होणाऱ्या स्पर्धांसाठीही त्याची निवड झाली आहे. या सर्व क्रीडापटूंचे हार्दिक अभिनंदन !

श्री. शिरीष फणसळकर, कु. शुभदा गोडबोले, कु. स्वाती सरदेसाई कु. वर्षा कुलकर्णी या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी अनेक वादस्पर्धांमध्ये महाविद्यालयातर्फे भाग घेऊन पारितोषिके मिळविली आहेत. त्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

*

कनिष्ठ महाविद्यालयाचा व्याप दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे. १५०० विद्यार्थी आहेत.

दि. १ ऑगस्ट १९८१ पासून प्रा. वा. म. दाते यांची सहाय्यक कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखपदी नेमणूक झाली.

* *

नूतन मराठी विद्यालय ही आपली भगिनी संस्था. तिने शंभराव्या वर्षात पदार्पण केले असून नुकताच, आपले माजी विद्यार्थी, शि. प्र. मंडळीचे अध्यक्ष, भारताचे सरन्यायाधीश श्री. य. वि. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली शताब्दी महोत्सव शुभारंभ समारोह साजरा केला. सांस्कृतिक दृष्टया नू. म. वि. ही एक चिरंजीव, चैतन्यमय व सर्जनशील संस्था आहे. तिचे ‘ पूर्व दिव्य ’ मोठे असून तिचा ‘ भावी काल ’ उज्ज्वल असणार हे निःसंशय. ‘ नू. म. वि. ’ला आमच्या शुभेच्छा.

*

अंक सर्वांगसुंदर व्हावा यासाठी, विद्यार्थीप्रतिनिधी भालचंद्र पटवर्धन ( तृ. व. वाणिज्य ) याने, अभ्यास चालू असतानाच, स्वतंत्रपणे, जबाबदारीने खूपच मोलाचे सहाय्य केले.

● मुखपृष्ठावरील अक्षररेखांकन, भूगोल विभागातील कार्टोग्राफर श्री. पुरंदरे यांनी तत्परतेने करून दिले.

● श्रद्धांजली लेखांपैकी काही लेख, डॉ. रा. शं. वाळिंबे, प्रा. कृ. रा. कुलकर्णी, प्रा. बी. एन. कुलकर्णी, प्रा. अरुण भागवत व श्री. पां. वा. केळकर यांनी लिहिलेले, आम्ही वापरले आहेत.

● या अंकातील जाहिरातींची सर्व जबाबदारी, संपादकमंडळातील एक सदस्य, प्रा. रोहिणी पटवर्धन (वाणिज्य) यांनी दक्षतेने पार पाडली.

● श्री. सु. अ. हळबे ( ग्रंथालय ) यांनी ‘परशुरामीय’ कार्यालय चांगल्या रीतीने सांभाळले.

● ‘ परशुरामीय ’ची मुद्रिते यंदा मुद्रित-शोधक श्री. सरदेशपांडे यांनी तपासली; आणि एका जिकिरीच्या कामाचा मोठा भार उचलला.

● ‘ आनंद मुद्रणालया ’चे श्री. दादासाहेब जोशी, श्री. माधवराव जोशी व त्यांचे सहकारी यांनी अनेक अडचणी, अडथळे यांनून सुंदर मुद्रण करून दिले.

–सर्वांना धन्यवाद.

संपादक

**जाहिरातदार व जाहिराती मिळवणारे आपले विद्यार्थीमित्र यांना खास धन्यवाद.**

# Science and Society

We are an academic community. Ours is a place of higher learning, with an academic atmosphere permeated by an idealism of rare kind. We here breath a free air of rare kind. A freedom of which, those who use it wisely and those who misuse are equally proud.

Ours is an exciting place where ideas are born and nurtured, a place where future leadership takes shape, and a place wherefrom go out young men and women either to serve their fellowmen or to serve their own ends.

In such a context it is imperative that the young that enter the college realise their historical role, they are destined to play in the society.

The most important factor in modern life is the growth of science. Make an effort to understand the nature of science and its implications for society. A scientific enquiry analyses a situation and endeavours to discover the laws that govern the situation. An understanding of these laws provides an opportunity to master the situation. This is indeed 'power' -power that initially remains confined to those that pursue the science.

As it is, not all pursue the science-either because some have no desire or because some do not get any opportunity. Either way the result is imbalance, inequality. Those in possession of science and in possession of ' power, ' implied in the science, get relatively stronger in relation to those without power.

So long as the science, the knowledge and the power continue to remain a privilege of the few, imbalances and inequalities in the community grow deeper. Such a situation is detrimental to the very existence of the society.

This danger has to be counteracted. What is the way out ? A process of democratisation of education may go a long way in counteracting the danger. When education ceases to be a privilege, at least one factor fostering social inequality is eliminated. But this is not enough. While democratisation of education is a necessary condition, is certainly not a sufficient condition to ensure a healthy egalitarian community.

An awareness of the social context, a sense of social responsibility, a spirit of social service, on the part of one and all, and the academic community in particular, would prove almost a sure way to ensure the building up of an ideal society.

What needs to be constantly borne in mind is the social context and the need to identify with the society.

Each one of us is a product of society. We are born in a society, we live and grow in a society and we conclude our life in a society. Are you aware that the name your parents have given you, serves a social purpose ? One needs to have a name only while one moves in the society.

All our individual deeds and actions have a social significance and have an impact on the society. We cannot and we should not escape the society. Naturally one has to be even aware of the social context and social consequences of one's action.

Make an effort to identify with the society, develop a sense of belongingness to the society and you will then realise the vital role you are destined to play.

Dr. **D. B. Kerur**

# Summary of Important Findings and Suggestions

**Semester System :**

(1) Students do not seem to be against the semester system but they want some modifications in it.

(2) The disparity in the workload of Science faculty students on one hand and Arts and Commerce faculty students on the other should be reduced if not altogether removed.

(3) The course contents should be reviewed with the express purpose of finding out whether they are too heavy and whether they can be reasonably taught by the teachers and assimilated by the students in the available time. A rigorous analysis as to how many lectures would be required to cover each course should be entrusted to a group of experienced teachers of the respective subjects. Although on paper it may appear that the 'fourteen weeks' time is available as required by the rules, it should be ascert ained whether the teachers actually get all this (Do we allow for the non-instructional days occassioned by a variety of reasons, which have become so common these days ?)

(4) The diparity among the faculties regarding separate passing in the internal assessment should be removed. It should be realised that compulsory passing in internal assessment ceases to be meaningful when a student in the Vth or VIth semester is found to be struggling pitifully to clear his/her internal assessment backlog in the IIIrd or IVth semetter. This makes a mockery of the entire philosophy and principles on which the semester system is founded. Also if a student does not clear the internal assessment in the very first attempt, his marks, if higher than the minimum for passing should be reduced to passing level.

(5) Too many tests and examinations should be avoided. These tend to create tension in the minds of students and also leave very little time for co-curricular and extra-curricular activities.

(6) The proposal to restrict the choice of subjects in the Science faculty by grouping the subjects in a number of groups and asking the F. Y. B. Sc. students to choose four subjects taking not more than two from any group, has been strongly opposed by the students. This is probably because the suggested grouping disallows two most popular groups at present viz. MCPS and PCBZ.

(7) A majority of students feel that the syllabi should be fully covered in the classes, and have stated that at present this is not done. The percentage of students stating that the syllabi are not fully covered in the class is the highest in commerce faculty (80%), next in Arts faculty (70%) and last in Science faculty (65%).

(8) A majority of the students have tate d that they do not get enough time for assimilation of what they are taught.

(9) A majority of the students do not participate in extracurricular activities at all. 71% of Science faculty students have stated that they do not get time for such participation.

(10) Semester system has increased financial burden on the students.

**Examination Reforms :**

(1) A majority of students are in favour of changing the ratio of internal and external assessment from the the present 40:60 to 20:80.

(2) Students have suggested that there should be only one test and one tutorial per course for the internal assessment.

(3) Students have stated that internal assessment has helped io inculcate regular study habits.

(4) large majority of the students of Arts faculty have suggested that passing in internal assessment should be made compulsory in their faculty.

(5) A majority of the students of Arts and Science faculties are in favour of extending the duration of external examination for each course from two hours to three hours.

(6) Students feel that introduction of the question banks has served a useful purpose.

(7) Student are opposed to the present rule of reducing the internal assessment marks if they exceed the external assessment by more than 15%.

(8) The question of the backlog courses should be considered afresh. Should any backlog be allowed at all at any semester ?

* *

आपल्या महाविद्यालयाने ( संख्याशास्त्र विभागाने ) इतरांच्या सहकार्याने केलेल्या सर्वेक्षणातून–

# एक स्वगत

## शरद तळवलकर

मी पुण्याचा भावे स्कूलचा विद्यार्थी. भावे स्कूलची नाटकं त्या काळी खूप गाजलेली असायची. आचार्य अत्र्यांनी एकदा म्हटलं होतं,

' भावे स्कूल अभ्यास वगैरेपेक्षा नाटकात फार पुढं आहे. '

दरवर्षी शाळेत नाटकं व्हायची. सुरुवातीला मी त्यांत नव्हतो; पण एकदा असं घडलं, सतत दोन वर्षं विनोदी कामं करणारा देशमुख नावाचा विद्यार्थी होता, त्यानं नाटकासाठी दहा पासेस्‌ची मागणी केली. आमचे सुपरिंटेंडेंट उमराणीकर होते. ते अतिशय कडक होते. ते त्या देशमुखाला म्हणाले,

' तुला फक्त दोन पासेस मिळतील. काम करायचं असलं तर कर, नाही तर संध्याकाळी नाटकाची वही आणून दे. ' त्यानं वही आणून दिली. तेव्हा मग टीचर्स-रूममध्ये चर्चा सुरू झाली. आमचे क्लास-टीचर्स होते श्री. के. क्षी. ते इतरांना म्हणाले,

' गोपीनाथ तळवलकरांचा एक भाऊ आपल्याकडे आहे, तो कोणाकोणाच्या नकला करीत असतो, त्याला विचारू. ' त्यांनी मला विचारलं, तेव्हा मी प्रथम नकारच दिला. पण त्यांनी सांगितलं, ' तू काम केलंच पाहिजेस ! '

मग मी हो म्हटलं. तालमी सुरू झाल्या. ते नाटक होतं ' रणदुंदुभि ' नावाचं. त्यात मी शिशुपालाचं काम केलं. ते माझं पहिलं काम. आठ दिवसांत पाठांतर करून मी ते काम केलं. नाटक खूप रंगलं. घरच्यांपैकी म्हणजे फक्त गोपीनाथरावच आले होते. कारण माझे वडील अतिशय कडक होते. त्यांना नाटक वगैरे असलं काही आवडायचं नाही. या नाटकाच्या निमित्तानं एक लक्षात आलं, की आपण स्टेजवर काही केलं, की लोक हसतात. मग उत्सुकता वाढत गेली.

### ....आणि मी घर सोडलं !

१९३८ साली जेव्हा नाटकात काम केलं, तेव्हा केशवराव दाते नाटकाला आले होते. ते कोणाचे तरी पाहुणे म्हणून आले होते. त्यांनी माझं काम पाहिलं. त्यावेळी-म्हणजे १९३८ ला त्यांची ' नाट्यमन्वंतर ' बंद पडली होती. नंतर त्यांनी ' नाट्यविकास ' मंडळी काढायचं ठरवलं. माझा आतेभाऊ सदाशिव ठकार पूर्वी केशवरावांच्या कंपनीत होता. तर त्यांनी त्याला विचारलं, ' भावे स्कूलच्या नाटकात एक मुलगा मी पाहिलाय, तो आपल्या नवीन कंपनीसाठी मिळाला, तर बरं होईल. ' माझ्या आतेभावानं मला विचारलं. दोन-तीन वर्षांच्या कामामुळं थोडा उत्साह होता, लोकांनी कौतुकही केलं होतं. म्हणून मी त्याला होकार दिला. त्याच वेळी मॅट्रिक झाल्यावर मला एस्. पी. कॉलेजची स्कॉलरशिप मिळालेली होती. तेव्हा मी गोपीनाथरावांकडेच राहात होतो. मी लगेच नाटक कंपनीची नोकरी धरली. तेव्हा महिना १२ रुपये पगार होता. तेवढ्यात वडलांना कॉलेजचं पत्र गेलं.

तुमच्या मुलानं अजून कॉलेजमध्ये नाव घातलं नाही. तर आम्ही ती स्कॉलरशिप दुसऱ्याला देऊ का ? वडील अतिशय तापट ! ते पी. डब्ल्यू. डी. मध्ये होते. त्यांनी बऱ्याच नोकऱ्या केल्या. तसे ते त्यावेळी मुलांवरच अवलंबून होते. मी त्यांना सांगितलं, ' मी नोकरी धरलीय. त्यामुळं मी कॉलेजात नाव घातलं नाही. ' तेव्हा ते म्हणाले,

' बरं झालं, तुला कळलं, की माझ्याकडं पैसे नाहीत. ' नंतर त्यांनी विचारलं, ' कुठं नोकरी धरलीस ? ' मी सांगितलं, ' नाटक कंपनीत. ' तेव्हा ते संतापले आणि म्हणाले, ' सकाळचा घरात जेवलास, हे ठीक आहे; पण संध्याकाळचं जेवण आता इथं नाही. या घरात राहायचं

नाही.' ते अतिशय कडक असल्यानं त्यांच्याशी जास्त बोलणं शक्यच नव्हतं. आमच्या भावंडांपैकी फक्त गोपीनाथराव त्यांच्याशी बोलू शकत. त्यामुळं जास्त बोलण्याचा प्रश्नच नव्हता. मी काही सांगायला लागलो तेव्हा ते म्हणाले, 'हा विषय संपलेला आहे. मी दुसऱ्या विषयावर बोलतोय.' तेव्हा मी घर सोडलं....

## केशवराव दाते

–आणि मग केशवरावांची कंपनी जिथं होती, (म्हणजे अप्पा बळवंत चौकात–उद्यान कार्यालयात) तिथं राहायला गेलो. तिथं मी पहिलं व्यावसायिक नाटक केलं, ते शं. गो. साठे यांचे 'छापील संसार!' पण सुरुवातीला काही काम नाही, म्हणून मेकप करणं, इंदिरा चिटणीस, राजा परांजपे या कलाकारांच्या कपड्यांच्या घड्या घालायच्या अशीच काही कामं करायचो.

दोन–तीन वर्षं त्या कंपनीत होतो. तिथं भागवत म्हणून एक होता. त्याच्या ओळखीनं 'उसना नवरा' मध्ये काम मिळालं. 'छापील संसार' मध्ये गड्याचं काम केलं होतंच. पण या कामापेक्षा केशवराव दाते तालमी कशा घेतात ते पाहायला मिळालं. विशेषतः भूमिका समजावून सांगत असताना पाहायला मिळायचं. पण त्या नाटकाला उत्पन्न मिळेना. त्यात दात्यांनी रणजित स्टुडिओमध्ये काम स्वीकारलं! झालं. आमच्या नाटक कंपनीच्या मालकानं स्वयंपाक बंद केला. तेव्हा आम्ही सातारला होतो. तो भागवत आणि मी थिएटरमध्येच झोपायचो. आमच्याजवळ फक्त अडीच रुपये होते. सकाळी एक बटाटे-वडा आणि चहा घ्यायचो. तसंच पुन्हा संध्याकाळी करायचो. दोन पैशाला वडा आणि एक पैशात चहा असा साताऱ्च्या रॉयल हॉटेलमध्ये मिळत असे. सातारहून आम्ही वाईला आलो. तिथं प्रयोगाचं उत्पन्न सात रुपये झालं तेव्हा मग मी ठरवलं, की कंपनी सोडायची. आणि ती कंपनी सोडली.

## सरकारी नोकरी

पुण्यात आलो. तेव्हा खिशात फक्त बारा आणे होते. त्यावेळी वाई ते पुणे प्रवासाचं तिकीट बारा आणेच होतं. 'माने लॉज'चा मालक आमचा मित्र. पुण्यात आल्यावर त्याच्याकडं राहिलो. तिथं राहून टायपिंग शिकलो. आता उषाबाई लिमये नाटकात काम करतात ना, त्यांचे यजमान माझे दोस्त, (क्रिकेटमुळं आमची दोस्ती. तो नू. म. वि. कडून आणि मी भावे स्कूलकडून क्रिकेट खेळत होतो.) एक दिवस तो भेटला. तो म्हणाला, 'तू सध्या काय करतोस?' मी म्हटलं, 'मी बेकार आहे.' तर तो म्हणाला, 'बेकार बसण्यापेक्षा माझ्याबरोबर मिलिटरी अकौंटसमध्ये चल.' तेव्हा युद्धाचे दिवस असल्यानं सारखी भरती असायची. एका आंब्याच्या झाडाखाली अर्ज घेऊन संध्याकाळी गरजू लोकांना उभे करायचे, नंतर मग एखादा गोरा साहेब यायचा आणि म्हणायचा, 'तुम्ही या, तुम्ही जा' वगैरे. तसा एकदा मी पण गेलो. तो साहेब मला 'या' म्हणाला. मी तिथं नोकरीला लागलो. तिथं टायपिंग करीत होतो.

मी एस. पी. कॉलेजमध्ये नाव घातलं होतं, पण नोकरीमुळं कॉलेजला जाणं जमायचं नाही. कारण दोन्हीही दुपारी. त्या वेळी 'आळतेकर ट्रॉफी' मिळवणं विशेष मानलं जायचं. कवी वसंत बापट माझ्याबरोबर होता. त्यानं ठरवलं, की काहीही करून ट्रॉफी मिळवायची. त्यानं कोणाला तरी सांगितलं, की कुठल्या तरी नाटक कंपनीतला एक मुलगा आपल्या कॉलेजमध्ये आहे. तो शोध घेत माझ्याकडे आला. मी त्याला म्हटलं, 'मी अशी अशी शपथ घेतलीय, त्यामुळं काम करणार नाही.' तर तो म्हणाला, 'ते काही मला सांगू नकोस, तू काम करायलाच हवं. फार तर व्यावसायिक नाटकात करू नकोस. आपल्याला ट्रॉफी मिळवायची आहे.' मी हो म्हटलं. आम्ही 'खडाष्टक' केलं. त्यात मी कर्कशराव. नाटक उत्तम झालं आणि आम्हाला ती 'ट्रॉफी' मिळाली. त्यामुळं सतत चार वर्षं कॉलेजात कामं करावी लागली. त्याच वेळी भालू केळकर (भालबा) आणि मी 'मधुमाधव' नावाची नाट्यसंस्था काढली. कारण बाहेर नाटकं करायला संस्था हवी होती. विठ्ठलराव घाटे आमच्या संस्थेचे अध्यक्ष होते. इंटरकॉलेजिएट अशा लोकांची ती संस्था होती. आम्ही 'लग्नाची बेडी'चा प्रयोग केला. त्यावेळी काय झालं, साहित्य परिषदेचा माधवराव पटवर्धन हॉल बांधून झाला होता. त्यांना थोडी-फार पैशांची गरज होती. प्रा. श्री. म. माटे आमचे गुरुजी. ते म्हणाले, 'तुम्ही मराठीचे विद्यार्थी, परिषदेला काही मदत करा.' म्हणून प्रयोग करण्याच्या तयारीला लागलो. पदरमोड करून आम्ही तालमी सुरू केल्या. पण के. नारायण काळे

म्हणाले, ' मुलांच्या नाटकाला कोण पैसे देणार ? त्यापेक्षा आम्ही तुम्हाला व्यावसायिकांचं नाटक देतो. ' त्यावर साहित्य परिषदेच्या लोकांना आम्ही म्हटलं, आम्हाला फक्त तुमचं बॅनर द्या, बाकी सगळं आम्ही करतो. पण त्यांनी तेही नाकारलं. मग आम्ही जिद्दीला पेटलो. सगळ्या महाविद्यालयात भरपूर तिकिटं खपविली आणि ' विजयानंद 'मध्ये तो प्रयोग हाऊसफुल्ल गेला.

**' मानापमान '**

एकीकडे कॉलेज आणि नोकरीत टायपिंग चालूच होतं. युरोपियन लोक अधिकारी होते, तोपर्यंत पुष्कळच सवलती मिळत होत्या, पण पुढं आपले अधिकारी आल्यावर बदलीचा त्रास सुरू झाला. बदली झाली की ती टाळण्यासाठी प्रयत्न सुरू व्हायचा.

असं करत करत एम्. ए. झालो. त्यावेळी व्यावसायिक नाटकांतल्या लोकांशी माझी थोडी-फार ओळख झालेली होती. आमच्या ऑफिसात आजचे प्रसिद्ध गायक-नट वसंतराव देशपांडे नोकरीला होते. त्यानं आणि मी मिळून काही लोक गोळा केले. त्यातून ' मानापमान ' सारखी काही नाटकं आम्ही केली. आज जे ' लिमये चित्रमंदिर ' आहे, त्याचं जवळजवळ उद्घाटन आमच्या या प्रयोगांनीच झालं....!

**' करायला गेलो एक ! '**

तसं माझं पहिलं नवीन नाटक म्हणजे ' करायला गेलो एक ' हे १९५५ मधलं ! मी एक दिवस विद्यापीठातून सायकलवरून घरी येत असताना बाबूराव गोखले, प्रभाकर मुजुमदार, श्यामदत्त महाराव वगैरे लोक भेटले. त्यांनी सहकारी पद्धतीची एक नाट्यसंस्था काढली होती. मी काम करतो, हे त्यांना माहीत होतं. त्यांनी मला विचारलं, ' तू शंखनादचं ( पत्रकाराचं ) काम करशील का ? '

५१ प्रयोगांत मी शंखनादचं काम केलं. पण एकदा काय झालं, राजा गोसावी हरिभाऊ हर्षेचं काम करायचा. त्याचं ' गंगेत घोडं न्हालं ' हे पिक्चर त्यावेळी चांगलं चाललं होतं. काही लोकांनी त्याच्या डोक्यात भरवलं, ' तुझ्यावर हे नाटक चालतंय, तू एवढ्या कमी पैशात इथं कशाला काम करतोस ? ' नगरच्या प्रयोगाची गोष्ट. त्यानं येत नाही, म्हणून कळवलं. नगरच्या कॉंट्रॅक्टरनं सांगितलं. ' राजा गोसावी नसेल तर त्यामुळं जेवढी तिकिटं परत जातील, तेवढे तुमचे पैसे कमी होतील. '

बाबूराव म्हणाले, ' ठीक आहे ' त्यांनी मला विद्यापीठात निरोप पाठविला. मी जयकरांना सर्व सांगून हरिभाऊंची नक्कल दुपारी चार ते रात्री दहापर्यंत पाठ करीत होतो. रात्रीच्या गाडीनं आम्ही सगळे नगरला निघालो. प्रभाकर मुजुमदारानं माझं फर्स्टक्लासमधलं रिझर्वेशन केलं होतं. तिथं मी तालमी केल्या. माझ्या सीनमध्ये जी माणसं असायची, त्यांना तेवढ्या वेळापुरतं तो घेऊन येत असे. अशी रात्रभर तालीम करून सकाळी प्रयोगाला उभा राहिलो. त्यावेळी अंगानं बेताचा होतो, त्यामुळं राजा गोसावीचे कपडेही मला बरोबर बसले.

नगरच्या प्रयोगाचे फक्त ३६ रुपये कॉंट्रॅक्टरनं कापले. कारण तेवढीच तिकिटं परत गेली होती. तो प्रयोग चांगला झाला. पुढं बाबूरावांनी पुण्यात ' भानुविलास 'ला सलग अठरा प्रयोग केले. मी रजा घेतली. इतर ठिकाणचेही प्रयोग केले.

**विवाहाची कथा**

माझं लग्न १९५० साली झालं. तेही ' संशयकल्लोळ ' मुळंच ठरलं. उषा ही डॉ. के. ना. वाटव्यांची मुलगी. तीही एस्. पी. कॉलेजमध्येच होती. ' भारत गायन समाजा 'त गाणं शिकायची. दिसायलाही चांगली. तिच्या मत्रिणींनी ठरवलं, की आपण संगीत ' संशयकल्लोळ ' नाटक करायचं. उषा रेवती आणि कर्णिक म्हणून मुलगी होती ती अश्विनशेटचं काम करणार होती. म्हणजे मुलींनी पुरुष पार्ट करायचे आणि मुलांनी स्त्रीपार्ट करायचे. त्यात पुन्हा आमचे प्रिन्सिपॉल सोनोपंत दांडेकर होते. ते सनातनी वृत्तीचे ! त्यांनी मुलींना सांगितलं, ' तुम्हाला जर नाटक करायचं असेल, तर बाहेरचा दिग्दर्शक चालणार नाही. कॉलेजमधलाच कोणीतरी हवा. तळवलकर आपल्याकडे नेहमी नाटकं बसवतो, विद्यापीठात तो नोकरीला आहे, तिथं मी मिटिंगला गेल्यावर त्याला विचारीन. तो हो म्हणाला, तरच हे नाटक करायचं. '

सोनोपंतांनी मला विचारलं. मी ' संध्याकाळी तालीम घेईन ', म्हणून सांगितलं. त्या नाटकाच्या निमित्तानं आमचं जमलं. आणखी म्हणजे उषाचा भाऊ माधव वाटवे याला रंगभूमीवर मीच प्रथम कामं दिली. त्यामुळं

त्याची-माझी दोस्ती होतीच. उषानंच माधवला सांगितलं, 'हा माणूस नाटकवेडा दिसतोय. मला याच्याशी लग्न करायचं.' माधवनं घरी आईला, नानांना (के. ना. वाटवे) सांगितलं. त्यांना आमचं कॉलेजचं वागणं चांगलंच माहीत होतं. त्यांना आमचं लग्नाचं कळल्यावर त्यांनी एका कागदावर माझ्याशी लग्न करण्याचे फायदे आणि तोटे, असे लिहून काढले. त्यात लिहिलं होतं.

'व्यसनी असावा, नोकरीची खात्री नाही. तेव्हा सर्व विचार कर आणि ठरव.' एके दिवशी के. ना. वाटव्यांनी मला विद्यापीठात निरोप पाठविला. ते काहीसे सिनिक असल्यानं सायंकाळी स्मशानाच्या बाजूला फिरायला जायचे. त्या दिवशी त्यांच्याबरोबर मीही फिरायला गेलो. आणि गंमत म्हणजे त्यांनी स्मशानात आमचं लग्न ठरल्याचं सांगितलं. तेव्हा माझ्या लग्नाचा स्मशानाशी आणि 'संदाय बर्हळ ळ'शी जवळचा संबंध आहे; तो असा....!

म्हणजे जिथं संसार संपतो, तिथं माझा संसार सुरू झाला....!

## काही मतभेद

लेखकाशी, दिग्दर्शकाशी तसे मतभेद फारच कमी झाले. हां, फक्त तेंडुलकरांशी 'एक हट्टी मुलगी'च्या वेळेस मतभेद झाला. 'मी जिंकलो, मी हरलो' हे खरं माझ्या-वरच लिहिलं. पहिल्या अंकाचं वाचन इथंच, माझ्याकडं झालं. इतकंच नव्हे, तर त्यातला सेटदेखील या माझ्या घराचाच आहे. नटाच्या व्यक्तिरेखेच्या संदर्भात मी त्यांना काही सुचवलं, पण ते त्यांना मान्य झालं नाही. तेव्हा मतभेद हे असे एवढेच!

तुम्ही म्हणताय, त्याप्रमाणं शरद तळवलकर ही नटाची प्रतिमा काही वेळा प्रत्यक्ष काम करताना रंगभूमीवर उपकारक ठरते. ती अशी, की प्रेक्षकांत गोंधळ चाललाय. आधीचा प्रसंग तितकासा रंगत नाही, असं झालं, तर माझ्या येण्यानं, बोलण्यानं वातावरणात खूपच फरक पडतो. पण जे नट रंगमंचावर प्रवेश करण्याआधीच त्यांच्या आवाजाचं, चाहुलीचं लोकांना कुतूहल वाटतं, अशा विनोदी नटांमध्ये हे श्रेय सर्वप्रथम मी दिनकर कामण्णांचं पाहिलेलं आहे. त्यांचा-माझा व्यक्तिगत परिचय होता. ते स्टेजवर येण्याच्या प्रसंगाचा पडदा पडला, की पहिली टाळी पडा-यची आणि त्यांची एन्ट्री झाली, की, दुसरी टाळी पडायची. शब्दफेक आणि मुद्राभिनय करण्याची त्यांची जी पद्धती होती, तसा नट मी अद्याप पाहिला नाही त्यांच्या टॅब्लोला, पोजेसलाही प्रचंड हशा व्हायचा. ते महत्त्वाचं वाटलं मला!

लोकांना हसविण्यासाठी म्हणून मुद्दाम काही वेगळं करण्याच्या मी विरुद्ध आहे. जे लेखनात आहे, त्यातल्याच गमती अधिक कशा खुलतील, हे मी करतो. पण ती चौकट सोडत नाही. पण काही वेळेला लोक हसले नाहीत, की पंचाईत होते. वऱ्हाडमध्ये पांढरकवडा नावाच्या गावी 'करायला गेलो एक'चा प्रयोग अगदी हाऊसफुल्ल होता. सगळे पासोटेवाले. एक अंक झाला. कोणी हसायला तयार नाही. दुसरा अंक निम्मा झाला, तरीही हशा नाही, शेवटी वसंतरावांनी प्रेक्षकांत उडी मारली, त्याला लोक हसले. काय करणार!

## पीएच्. डी. आणि अत्रे

आचार्य अत्रे यांनी मला विद्यार्थिदशेपासून पाहिलेलं होतं. गोपीनाथरावांचे ते दोस्त. त्यामुळं जाणं-येणं होतं. १९४० साली चित्रपटात काम मिळावं, म्हणून त्यांचंच पत्र घेऊन मी गेलो. पण तेव्हा काही जमलं नाही. पण एका मॉबसीनमध्ये मी आणि राजाभाऊ परांजपे प्रथम एकत्र आलो. 'माझा मुलगा' नावाचा चित्रपट होता. त्या कामाचे दोन रुपये मिळाले. पुढे मग हळूहळू चित्र-पटांत कामं मिळत गेली.

या चित्रपटांच्या प्रवासात राजाभाऊ ठाकूर आणि राजाभाऊ परांजपे हे माझ्या दृष्टीनं सर्वांत आदर्श चित्रपट दिग्दर्शक. दोघांच्या पद्धतीत फरक होता. परांजपे स्वतः नट होते, त्यामुळं स्वतः करून दाखवायचे; पण ठाकूर नट नसल्यानं ते कलाकारांकडून काढून घ्यायचे.

हां, तर अत्र्यांची एक गंमत सांगण्यासारखी म्हणजे मला माझ्या सासऱ्यांनी पीएच्. डी. साठी अर्ज करायला सांगितला. 'विनोदमीमांसे'वर मी काम करायचं, असं ठरवलं. त्यासाठी अत्र्यांना भेटण्याचं ठरलं. एक दिवस खंडाळ्याला गेलो. ते म्हणाले, 'का आलास?' मी सांगितलं, 'असं असं पीएच्. डी. करणार आहे. तुमच्या-कडची पुस्तकं हवीत, तुमची मदत हवी.' तेव्हा ते मोठ्यानं हसले आणि म्हणाले, 'वेडा आहेस. तू पीएच्. डी. केलंस, तर तुझ्यातला विनोद मरेल. तुझ्या सासऱ्यांच्या 'रसविमर्श' ग्रंथाचं काय झालं, ते माहीत आहे ना?

कोण वाचतो तो ग्रंथ? तो उशाला घेतात. तसं तुझं होईल! काही लिहू नकोस. तो ग्लास घे.' हे ऐकल्यावर आमचा पीएच्. डी. चा विचार बारगळला, हे सांगायलाच नको!

## गंभीर भूमिका हवीय !

विनोदी नट म्हणून मान्य झाल्यानं गंभीर प्रकृतीचा किंवा कारुण्यपूर्ण अशा भूमिका सहसा माझ्यासाठी लिहिल्या जात नाहीत. ते मान्यच होत नाही. चित्रपटात मात्र तशा भूमिका मी केल्यात, त्या मान्यही आहेत. अगदी आता 'कैवारी'तलीही भूमिका लोकांना मान्य आहे; पण नाटकात नाही. सुरेश खरेनं एक नाटक लिहिलं होतं : 'मी एक विदूषक' नावाचं. ते काही कारणानं पुढं झालं नाही ते निराळं. मला असं वाटतं, की गंभीर प्रकृतीच्या भूमिका मी करू शकतो, यावर नाटककाराचा फारसा विश्वासच नाही. त्यामुळं वेगळी अशी भूमिका लिहावी, अशी इच्छा असूनही ते घडत नाही.

या तीस-चाळीस वर्षांच्या प्रवासात नाटक हे क्षेत्र सोडून द्यावं, असं एकदा वाटलं. पाच-सहा वर्षांपूर्वी या हॉटहिट नाटकाच्या तीन-चार संहिता माझ्याकडं आल्या. त्या वाचून मनात आलं, की आपण हे सगळं कशाकरिता करतो आहोत? म्हणून मी तसली नाटकं कधी केली नाहीत. पण असे क्षण क्वचितच येतात. यातूनच स्वतःची नाटक कंपनी काढण्याचं मनात आलं. 'कलाकार' नावाची आमची कंपनी आहे, त्यामध्ये अनेक गोष्टींचे निर्णय आपले आपण घेऊ शकतो. खूप गोष्टी करू शकतो. त्यातल्या जमतील तेवढ्या करतोच आहे....त्यामुळं आता निराशेच्या क्षणांचा प्रश्नच येत नाही. म्हणूनच असं वाटतं, की, 'क्लाऊन' सारखं वरून दिसायला विनोदी, पण आतून कारुण्यमय असलेलं नाटक मी केव्हा ना केव्हा करणार. कारण तशी वेगळी भूमिका करायला मिळावी, अशी मनापासूनची इच्छा आहे. तशी भूमिका कोणी लिहीत नाही, ही खंत आहे....

[ गेली दोन वर्षे, विविध क्षेत्रांत यशस्वी ठरलेल्या आपल्या काही माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखती 'परशुरामीय' मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या. या वर्षी, श्री. शरद तळवलकर यांचा मुलाखतवजा लेख त्यांच्याच सौजन्याने 'शरद तळवलकर एकसष्ठी समारोह स्मरणिका'- मधून उद्धृत करीत आहोत. ]

*

श्रीमान विसूभाऊ साळवेकर निबंधस्पर्धेमध्ये कु. पर्ल श्रीसुंदरम् द्वि. व. सा. हिने लिहिलेल्या 'Mass Religious Conversion–A Philosophical Consideration' या विषयावरील निबंधाला प्रथम क्रमांक मिळाला.

*

# मुलाखत आपल्याच सतारियाची

## सुधीर फडके

सवाई गंधर्व संगीत महोत्सवात आपल्या देशातील महान गायक, वादकांच्या बरोबरीने आपल्या कॉलेजमधील सुधीर फडके या उमलत्या कलावंताने आपली कला दाखविली. या आपल्या मित्राशी बातचीत करायला तुम्हालाही आवडेल.

आयुष्यात आपले ध्येय लहानपणीच निश्चित करणारी आणि त्यासाठी धडपडणारी माणसे पुढे नक्कीच मोठी होतात, यशस्वी होतात, यात वादच नाही. अशा काही थोड्या माणसांपैकीच सुधीर फडके एक!

त्याला मी विचारले, 'सुधीर तुला 'संगीत' हे क्षेत्रच का निवडावेसे वाटले? विशेषतः तू सतारीकडे कसा काय वळलास?'

माझे आजोबा पं. वामनराव फडके हे उत्तम गायक आहेत. ते पं. विष्णू दिगंबर पलुस्करांचे शिष्य! ते सगळी वाद्यं वाजवितात. माझे वडील श्री. सच्चिदानंद फडके हे उत्तम सतारवादक आहेत. माझी आई आणि बहीण, सध्या ती आपल्याच कॉलेजमधे आहे, ती सुद्धा सतार वाजवते.

मग तूही सतार वाजवायला सुरुवात केलीस, असंच ना?

अग, मी पाच वर्षांचा असतानाच गाणे शिकायला लागलो. नंतर वडिलांकडे तबला शिकायला सुरुवात केली. त्यांच्याकडेच मी जवजवळ दहा वर्षे सतार शिकलो. गेली चारसाडेचार वर्षे श्री. अन्नपूर्णा रविशंकर यांच्याकडे शिकतो आहे. मला 'सेनिया' घराण्याच्या पद्धतीनुसार सतार शिकावयाची होती. म्हणून मी त्यांच्याकडे गेलो.

सतार वाजविण्यासाठी लागणारं हाताचं कसब तुला कसं काय साधलं?

लहान असताना सुरुवातीपासून मी रोज तासभर रियाज करत असे. आता दिवसातून चार-पाच तास रियाज चालू असतो. सारखे वाजविण्यानेच हाताला चापल्य आले आहे.

सुधीर, तुझे आतापर्यंत किती आणि कुठे कार्यक्रम झाले?

माझा अगदी पहिला कार्यक्रम आमच्या क्लासच्या गॅदरिंगच्या वेळी झाला. त्यावेळी मी ११ वर्षांचा असेन. त्यानंतर माझा ह्या कलेतला रसही वाढला. आकाशवाणीवर बालोद्यानमधे आणि नंतर युववाणीतही वाजविले. ९ वीत असताना केंद्रसरकारची शिष्यवृत्तीही मिळाली. त्या वेळी दूरदर्शनवर माझी मुलाखत व सतारवादन झाले. १९७७ मधे केसरी वाड्यात गणेशोत्सवाच्या वेळी संध्याची व माझी सतारीची जुगलबंदी खूप गाजली. याच जुगलबंदीला गेल्या वर्षी फिरोदिया करंडक स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळाला. १९८१ च्या ऑल इंडिया रेडिओ म्युझिक कॉंपिटिशनमध्ये पुणे केंद्रात मी पहिला आलो. माझ्या वादनाचे ध्वनिमुद्रण दिल्लीला पाठविले तेथेही मला बक्षीस मिळाले.

सवाई गंधर्वचे निमंत्रण तुला आलं तेव्हा तुझी प्रतिक्रिया काय झाली? कारण देशाला वेड लावणारा हा संगीत सोहळा आहे. नाही का?

आश्चर्य तर वाटलंच. कारण ते अनपेक्षित होते. आनंद झाला पण मनावर दडपण आले. पण मनावर घेतले. आणि मी, सुभाष तयारीला लागलो. तो आणि मी अनेक वर्षे वाजवत आहोत. याच समारंभात माझ्या वडिलांनी १९६६ साली वाजविले होते. त्यामुळे त्यांची प्रतिमा उज्ज्वल ठेवण्याची जबाबदारी माझ्यावर होती.

या समारोहाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे १२ डिसेंबर १९८१ रोजी सुधीरचे सतारवादन झाले. त्याने 'यमन' राग वाजविला. आलाप व जोड आणि नखीचा झाला झाल्यावर त्रिताल मध्यलयीत गत वाजविली. इथेच त्याने रसिकमनांची दाद मिळविली.

त्या दिवशीच्या त्या कठीण कसोटीतून पार पडलेल्या सुधीरला आज अपेक्षापूर्तीचे समाधान आहे. तरीही तिथेच न थांबता तो पुढे जाणार आहे. त्याला आपणही शुभेच्छा देऊ या.

[अंजली परांजपे यांनी एस्. पी. रिव्ह्यूसाठी घेतलेली मुलाखत]

# श्रद्धांजली

## प्र. बा. गजेंद्रगडकर

भारताचे माजी सरन्यायाधीश व शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष डॉ. प्रल्हादाचार्य बाळाचार्य गजेंद्रगडकर यांचे दिनांक १२ जून १९८१ रोजी वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी ते ८० वर्षांचे होते.

कै. डॉ. गजेंद्रगडकर हे एक चतुरस्र व्यक्तिमत्त्व होते. विद्यार्थीदशेत एक हुशार विद्यार्थी म्हणून ते चमकले. विशेष प्राविण्यासह मॅट्रिक, बी. ए. नंतर 'दक्षिणा फेलो' संस्कृत व इंग्रजी घेऊन पहिल्या वर्गात एम. ए. आणि भगवानदास पुरुषोत्तमदास शिष्यवृत्ती आणि 'झाला वेदान्त' पारितोषिक मिळवून विद्येच्या क्षेत्रात उत्तुंग यशाचे शिखर त्यांनी गाठले. एलएल. बी. झाल्यावर काही वर्षे त्यांनी वकिली केली. त्यानंतर मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश व शेवटी सरन्यायाधीश म्हणून त्यांनी न्यायक्षेत्रात संस्मरणीय कार्य केले. भारत सरकारने नेमलेल्या विविध आयागांचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे.

शासनाने त्यांना 'पद्म-विभूषण' हा किताब देऊन त्यांच्या या कर्तबगारीचा गौरव केला.

शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्षपद कै. डॉ. गजेंद्रगडकर यांनी पाव शतकाहून अधिक काल भूषविले. आपल्या अध्यक्षपदाचे कारकीर्दीत शिक्षण प्रसारक मंडळीच्या प्रगतीवर त्यांचे सूक्ष्म लक्ष असे आणि मंडळीच्या सर्वसाधारण सभांना अध्यक्ष या नात्याने उपस्थित राहून त्यांनी मंडळीस वेळोवेळी मार्गदर्शन केले.

नामांकित कायदेतज्ज्ञ, उत्तम वक्ते आणि विचारप्रवर्तक लेखन करणारे प्रज्ञाचक्षू पंडित म्हणून डॉ. गजेंद्रगडकर विख्यात होते. सामाजिक समरसता या विषयाच्या बाबतीत त्यांना विशेष आस्था होती.

त्यांच्या दुःखद निधनाने भारताचे आणि विशेषतः शिक्षण प्रसारक मंडळीचे अपरिमित नुकसान झाले आहे.

[ शि. प्र. मंडळीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या दुखवट्याच्या ठरावातून ]

## के. ना. वाटवे

१९३४ साली डॉ. वाटवे स. प. महाविद्यालयात प्रो. श्री. म. माटे यांच्याबरोबर मराठीचे अध्यापन करू लागले. प्रा. माटे थोडे उशिरा आले. डॉ. वाटवे प्रथम आले. त्यामुळे डॉ. वाटवेच मराठी विभागाचे प्रमुख होते. आणि प्रो. माटे यांचे स्थान दुय्यम होते. तथापि या दोन महारथींनी एस. पी. कॉलेजच्या मराठी विभागाला स्पृहणीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये प्राविण्य संपादन करून डॉ. वाटवे थांबले नाहीत. त्यांचे ग्रंथलेखन अखंड चालू होते. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी 'संस्कृत सुबोधिनी' या नावाची क्रमवार पाठ्यपुस्तके नवीन प्रणालीला अनुसरून लिहिली. ती फार लोकप्रिय झाली. संस्कृत व्याकरणातील पांडित्य त्या पाठ्यपुस्तकांमध्ये दाखविल्यानंतर डॉ. वाटवे यांनी पीएच. डी. परीक्षेसाठी 'रसविमर्श' हा गाजलेला ग्रंथ लिहिला. रस सिद्धांताचे विवरण करणारे जे ग्रंथ मराठीमध्ये झाले, त्या ग्रंथांमध्ये 'रसविमर्श' या ग्रंथाचे स्थान वरचे आहे. आधुनिक मानसशास्त्रीय सिद्धांताचा उचित उपयोग करून रसशास्त्राचे विस्तृत विवेचन करणारा हा मराठीतील पहिलाच ग्रंथ होय.

पुणे विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर १९५४ सालापयत डॉ. वाटवे एम. ए. च्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवीत. मराठी अध्यापनाच्या या काळात त्यांच्या परमप्रिय संस्कृत

विद्येचा व्यासंग कधीही थांबला नाही. संस्कृतमधील पंचमहाकाव्यांचा व संस्कृत नाटकांचा रसास्वाद घेणारे ग्रंथ त्यांनी तन्मयतेने लिहिले.

डॉ. के. ना. वाटवे यांच्या निधनाने अभिजात संस्कृत साहित्याचा मार्मिक व गाढ व्यासंग केलेल्या व त्याबरोबरच प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा आधुनिक प्रणालीला अनुसरून सूक्ष्म अभ्यास केलेल्या एका थोर पंडिताला आणि जातिवंत रसिकाला आपण मुकलो आहोत. भवभूतीने पांडित्य आणि वैदग्ध्य ( रसिकता ) यांचे जे गमक सांगितले आहे ते या पुढच्या काळात अपवादात्मकच ठरणार आहे.

[ तरुण भारत ' मध्ये प्रसिद्ध झालेल्या डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या लेखातून ]

## श्री. द. भावे

वास्तवशास्त्राचे प्राध्यापक श्री. श्रीपाद दत्तात्रय भावे यांचे दि. १९-११-८१ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे निधनाने वास्तवशास्त्र विभागाची फार मोठी हानी झाली आहे.

प्रा. भावे यांनी या महाविद्यालयात १९२७ ते १९६० या प्रदीर्घ काळात आजीव सदस्य, विभागप्रमुख, उपप्राचार्य अशी अनेक प्रकारची जबाबदारीची कामे समर्थपणे पार पाडली. याशिवाय महाविद्यालयात काम करत असताना पदव्युत्तर संशोधनासाठी मार्गदर्शक, जिमखाना उपाध्यक्ष व वसतिगृहप्रमुख या नात्याने महाविद्यालयाची सेवा केली आहे.

वास्तवशास्त्र विभागप्रमुख म्हणून त्यांनी १९३१ ते १९५९ या काळात कार्य केले. त्यांच्या प्रमुखत्वाखाली विभागाची सतत भरभराट झाली. त्यांचे अनेक विद्यार्थी निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये नावलौकिकास चढले आहेत. सेवानिवृत्तीनंतरच्या काळात वाई येथे विश्वकोशासाठी वास्तवशास्त्र विषयावर लेखन केले. त्यांनी विभागाच्या विकासासाठी कार्यान्वित केलेल्या योजना व वास्तवशास्त्राचा सखोल अभ्यास यामुळे विभागातील प्राध्यापकवर्गास दीर्घकाळ स्फूर्ती मिळत राहील.

प्रा. भावे यांच्या अध्यापनकौशल्यामुळे ते महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून विख्यात होते. एक थोर अभ्यासक व निष्णात प्राध्यापक म्हणून प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना त्यांचे स्मरण सतत राहील.

**प्रा. कृ. रा. कुलकर्णी**
प्रमुख, वास्तवशास्त्र विभाग

## रामभाऊ म्हाळगी

दिनांक ६ मार्च, १९८२ रोजी पहाटे खासदार रामभाऊ म्हाळगी यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये कॅन्सरच्या विकाराने मृत्यू आला. मृत्यू एखाद्या व्यक्तीला असे अलगद उचलतो की, निर्ढावलेले मनसुद्धा आक्रोश करू लागते. दिनांक ६ मार्च, १९८२ रोजी रामभाऊंच्या चाहत्यांना मृत्यूपुढे शरणागती पत्करावी लागली.



जुलै, १९८१ मध्ये मा. प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर, उपप्राचार्य प्रा. स. रा. राईलकर व मी असे खासदार म्हाळगी यांच्या पुण्यातील घरी त्यांना १ ऑगस्ट टिळक पुण्यतिथीचे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रण देण्यासाठी गेलो होतो. नुकतीच वयाची साठ वर्षे पूर्ण करून त्यांनी एकसष्टाव्यात पदार्पण केले होते, म्हणून महाविद्यालयातर्फे अभीष्टचिंतन आम्ही केले. सुमारे तासभर विविध विषयांवर त्यांनी चर्चा केली, व महाविद्यालयाचे व शिक्षण प्रसारक

मंडळीचे जे प्रश्न दिल्ली दरबारी सोडवावयाचे असतील त्यात आपण सर्व प्रकारे सहाय्य करू असे निश्चित स्वरूपाचे आश्वासनही त्यांनी आम्हास दिले. त्यावेळचा त्यांचा उत्साह व आनंद पाहता त्यांना कर्क रोगासारख्या व्याधीने पछाडले असेल याची पुसटशीसुद्धा शंका आली नाही. पाच सहा महिन्यांत त्यांच्यावर मृत्युलेख लिहावा लागत आहे. हा केवढा दैवदुर्विलास.

खासदार रामभाऊ म्हाळगी हे स. प. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी. स्वकर्तृत्वाने स. प. महाविद्यालयाचे जे असंख्य विद्यार्थी जीवनाच्या विविध क्षेत्रांत आज तळपत आहेत त्यांत श्री. म्हाळगी हे एक होते.

सर्वसामान्य मध्यमवर्गातील कुटुंबात त्यांचा जन्म झाला. घराण्याची परंपरा अशी काही त्यांचे पाठीशी नाही. असे असूनही परिस्थितीचे अचूक ज्ञान, प्रखर राष्ट्रवाद, अंगीकृत कार्यावर असलेली अव्यभिचारी निष्ठा, सततात्याग, विचारी, व लोकशाहीत महत्त्वाची असणारी प्रतिस्पर्ध्यांनाही मत असते, याची जाण. आणि सर्वांत महत्त्वाचे निष्कलंक चारित्र्य या गुणांचा त्यांनी विविध प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यासाठी सुयोग्य उपयोग करून घेतला. त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने आता आकार घेत होते. विधानसभेप्रमाणेच लोकसभेच्या कामावरही त्यांचा ठसा उमटू लागला होता. आणखी काही अवसर लाभला असता तर बॅरिस्टर नाथ पै, प्रा. हिरेन मुखर्जी अशा खासदारांच्या मालिकेत त्यांचे नाव सहज बसले असते.

भारतीय जनतेने राज्यपद्धती म्हणून लोकशाही पद्धती स्वीकारली आहे. रामभाऊंचा या लोकशाही पद्धतीवर पूर्ण विश्वास होता. लोकशाहीवर दृढ विश्वास असणाऱ्याला विधानसभा व लोकसभा यांसारख्या संस्था या सर्वश्रेष्ठ असतात. तेव्हा रामभाऊंनी या संस्था हेच आपल्या कामाचे प्रधान क्षेत्र मानले व या दोन संस्थांच्या माध्यमातून सर्व सामान्यांचे असंख्य प्रश्न त्यांनी सोडवून घेतले.

विरोधी पक्षाचा आमदार-खासदारही सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवू शकतो हे रामभाऊंनी आपल्या कार्यामुळे सिद्ध करून दाखवले आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांत व लोकांत मिसळण्याचे, त्यांच्या सुखदुःखाशी, रागालोभाशी, आशा-आकांक्षांशी आणि वृत्ति-प्रवृत्तीशी समरस होण्याचे एक तंत्रच त्यांनी बनविले होते. आपल्या कामाचा आलेख ते आपल्या मतदारांपुढे सतत मांडत. त्यामुळे खासदार म्हाळगी हे आपले, आपल्यातील कोणी आहेत याची जाण त्यांच्यात निर्माण झाली होती. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी जो जनसमुदाय जमला होता त्यावरून ते सर्वांचेच होते हे स्पष्ट झाले आहे.

एका सेवाव्रती, सत्प्रवृत्त माणसाला आपण मुकलो आहोत. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही प्रार्थना.

**पां. वा. केळकर**
कार्यालय अधीक्षक

## ज. पां. नाईक

स्वातंत्र्योत्तर कालातील भारतीय शैक्षणिक क्रांतीचे एक प्रमुख अध्वर्यू श्री. ज. पां. नाईक यांचे, रविवार दि. ३० ऑगस्ट १९८१ रोजी कॅन्सर या दुर्धर व्याधीने दुःखद निधन झाले. 'नाईकसाहेब' या नावाने ते त्यांच्या निकटवर्तीयांत व 'जे. पी.' म्हणून महाराष्ट्रात व भारतातही त्यांच्या असंख्य चाहत्यात, स्नेहीजनात व सहकारी वर्गात परिचित होते. शिक्षणक्षेत्रात विद्वत्ता, नियोजन व प्रशासन या तिन्ही बाबतीत त्यांनी अजोड कार्य केले. उच्च कोटीची प्रतिभा, कर्तृत्व व संघटना कौशल्य यांचा संगम त्यांच्या ठायी झालेला होता.

अविकसित देशातील शिक्षणाचे स्वरूप, नियोजन, कार्यपद्धती आणि अंतिम उद्दिष्टे काय असावीत हा त्यांच्या अखंड चिंतनाचा एक प्रमुख विषय होता. या विषयाला भारताच्या मर्यादेपलीकडे जाऊन त्यांनी जगातील नवस्वतंत्र अविकसित देशांचा समग्रलक्षी संदर्भ दिला. गारगोटीसारख्या कोल्हापूर जिल्ह्यातील एका खेड्यात ग्रामीण विद्यापीठाची संकल्पना श्री मौनी विद्यापीठाच्या रूपाने साकार करीत असताना काय किंवा राष्ट्रीय शिक्षण आयोगाचे सदस्य-सचिव म्हणून संपूर्ण देशाचे शिक्षण-नियोजन करीत असताना काय हाच आंतरराष्ट्रीय संदर्भ त्यांच्या मनात होता. यामुळेच साहजिकपणे जागतिक शिक्षणतज्ज्ञांना त्यांचे शिक्षणविचार मौलिक वाटले.

विविध ज्ञानक्षेत्रांत चाललेल्या संशोधनात सुसूत्रता, योजनाबद्धता व विशेषेकरून समाजाभिमुखता आणणे ही महत्त्वाची तत्त्वे 'इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च' या अखिल भारतीय संस्थेचे पहिले सदस्य- सचिव

या नात्याने काम पाहात असता त्यांनी प्रामुख्याने अंगीकारली.

' जे. पी. ' हे एक आदर्श संघटक होते. शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांबाबत आस्था असणाऱ्या असंख्य जिज्ञासूंना, कार्यकर्त्यांना त्यांचे सतत आवाहन असे. या लोकांची शक्ती संघटित करणे, त्यांच्या उत्साहाला योग्य ती दिशा लावणे, त्यांच्या कार्यात सुसूत्रता व योजनाबद्धता आणणे व त्यांच्या शिक्षणविषयक कल्पनांचे शास्त्रीय व व्यावहारिक अशा दोन्ही कसोट्यांवर मूल्यमापन करणे व अशा रीतीने संस्कारित झालेल्या शक्तींना संघटनांमध्ये गुंफणे व या पद्धतीने सरकारी व बिनसरकारी क्षेत्रात विविध संस्था कार्यप्रवण बनवून शिक्षणाच्या अखंड चाललेल्या प्रक्रियेला सामर्थ्य व दिशा प्राप्त करून देणे हे असामान्य कार्य ' जे. पी. ' नी अविरतपणे अखेरपर्यंत केले.

गांधीवादाचा प्रभाव त्यांच्या विचारांवर निश्चित होता पण ते ग्रांथिक गांधीवादी कधीच नव्हते, उलट आधुनिक तंत्रज्ञान व औद्योगीकरण या जगातील अविकसित देशांपुढे ठाकलेल्या आव्हानांच्या आणि संधींच्याही संदर्भातच त्यांनी गांधीप्रणीत तत्त्वांना नवा आशय दिला व त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यातून त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी नवी क्षितिजे धुंडाळली. विज्ञानाची काटेकोर शिस्त पण त्याबरोबरच अविकसित देशातील सर्वसामान्य जीवनाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी लागलेली अखंड तळमळ व या विषयाला संपूर्णतया बांधिलकी ही त्यांच्या विचारातून व कृतीतून सतत जाणवत असत. त्यांचा भर हा रुक्ष तत्त्वचर्चेपेक्षा समस्या-निराकरण ( Problem-Solving ) यावर असे. याबाबतीत त्यांचे विचार व कार्यपद्धती समजावून घेणे हा एक उच्च प्रतीचा बौद्धिक आनंद असे.

अशाच आनंदाचा अनुभवाचा आपल्या महाविद्यालयातील अध्यापकांना प्रत्यय येण्याचा योग दि. ४ ऑगस्ट १९७९ रोजी आलेला होता. त्या दिवशी प्राध्यापक चर्चामंडळाचे त्या वर्षीच्या कार्यक्रमांचे उद्घाटन जे. पी. नी केले. " **शिक्षण व महाविद्यालयीन अध्यापक** " या विषयावर बोलताना त्यांनी व्यक्त केलेले विचार संस्मरणीय होते. अध्यापकांना उद्देशून ते म्हणाले होते, " आपली शैक्षणिक पात्रता वाढवण्याची एकही संधी सोडता कामा नये. तसेच आपले व्यक्तिमत्त्व अधिक संपन्न करणे हे अन्य कोणत्याही व्यावसायिकापेक्षा शिक्षकाला अधिक आवश्यक आहे. एखादा छंद, एखाद्या कलेतील आस्था, प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडवण्यासाठी बौद्धिक शक्तीचा केलेला वापर या गोष्टींचे आकर्षण बुद्धिमान विद्यार्थ्याला केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा कितीतरी अधिक असते. तिसरी गोष्ट, शैक्षणिक पात्रतेबरोबरच शिक्षण व तद्विषयक राजकीय, आर्थिक व सामाजिक समस्या हाच एक स्वतंत्र विषय मानून त्याचा विशेष अभ्यास सातत्याने करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. "

' जे. पीं. ' च्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे सतत भान व त्यांच्या शिक्षणविषयक कल्पनांचा सतत पाठपुरावा हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल यात शंका नाही.

**प्रा. अरुण भागवत**

## S. G. Hulyalkar

Members of the Poona Philosophy Union and students and teachers of the S. P. College Philosophy Association, and admirers of Professor S. G. Hulyalkar who have assembled here to-day deeply mourn the sudden passing away of Professor S. G. Hulyalkar on Tuesday, the 15th December, 1981.

Professor S. G. Hulyalkar developed the activities of the S. P. College Philosophy Association founded by Professor S. V. Dandekar. He was the Chairman of this association from 1943 to 1963. During this long period of twenty years, he directed the many-sided activities of the association and gave continuous encouragement to students for further reading, writing and research in philosophical topics. With the introduction of Marathi as a medium of instruction, he took the initiative and prepared text-books in Marathi on Logic, Psychology etc. and did his best to make Philosophy and allied subjects interesting and easily

assessible to average students. Even after his retirement from active service, he continued close and constant contact with the College Philosophy-Association and showed keen interest in its activities, progress and new developments. His remarkable qualities as a teacher of Philosophy and as an organiser were a very important main source of strength and inspiration to the workers. He loved the Association like a parent and it was equally warmly reciprocated by students and colleagues.

Professor S. G. Hulyalkar along with other equally eminent teachers of Philosophy in Poona, was one of the founder members of the Poona Philosophy Union which was founded in the year 1945. He took all the responsibilities of making necessary provisions for holding meetings of the union of the S. P. College, a centrally situated place for all. He actively supported all the programmes and plans of the Union. He gave the organising and executive leadership as the local Secretary to make the Poona Session of the All India Philosophical Congress in 1951 a great success.

He used to take active interest in discussions and always emphasised the social relevance of the work to the Union.

In the sad demise of Professor S. G. Hulyalkar, we have a deep sense of loss of a good friend with a noble mind and generous heart, an active and enthusiastic supporter of our concerns, a guide whom we could approach any time for consultation and above all a loving and a lovable person with zest in life, enthusiasm for all socially useful activities and dynamism and skill to carry out the accepted plans.

[ From the condolence resolution passed in the meeting held under joint auspices of Poona Philosophy Union & Our Phiosophy Association ]

## Dr. ( Mrs. ) Durgabai Deshmukh

Mrs. Durgabai Deshmukh, wife of Mr. C. D. Deshmukh, passed away on 9th May 1981. In her death, India has lost a dedicated social worker. The Andhra Mahila Sabha, an organization, founded by her, runs a number of institutions in the field of Education, Health and Welfare for women, children and the handicapped. These centres,located in Hyderabad and Madras, have been rendering immense service to the needy.

Mrs. Deshmukh came under the magic spell of Mahatma Gandhi' when she was 12 years old. Later, she joined the London School of Economics and studied under Harold Laski. Her life was dedicated to the Cause-service to the nation and service to the poor.

The President of India, in his condolence message to Mr. C. D. Deshmukh, rightly described her as 'a veteran freedam fighter and a dedicated social worker'

Prof. **B. N. Kulkarni**
*Vice-Principal*

## Prof. A. B. Shah

Prof. A. B. Shah taught Mathematics in our college for a few years. The range of his interests was, however, surprisingly wider. A confirmed rationalist, he crusaded against obscurantism and superstition. For a number of years, he edited **Quest** on behalf of the Congress for Cultural Freedom. The quarterly re-appeared as **New Quest** in the post-emergency era and is dedicated to the cause of free discussion of the important issues national or otherwise. His last work, **Religion and Society in India** is a living proof of his unabated zest for social reform. In his death, we have lost a spirited champion of democracy and secularism. May his soul rest in peace.


Prof. **B. N. Kulkarni**
Vice-Principal

---

ख्यातनाम साहित्यिक

**अच्युत बर्वे**


हे आपले माजी विद्यार्थी.
१६-४-१९८२ रोजी
त्यांचे दुःखद निधन झाले.
श्रद्धांजली !



कै. न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर
माजी अध्यक्ष, शि. प्र. मंडळी



कै. प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर




कै. डॉ. के. ना. वाटवे
भूतपूर्व प्रमुख, मराठी विभाग



कै. उपप्राचार्य श्री. द. भावे
भूतपूर्व प्रमुख, पदार्थविज्ञान


## प्राध्यापकांनी टिपलेली विविध निसर्गचित्रे




प्रा. फडके ( पदार्थविज्ञान )



प्रा. फडके ( पदार्थविज्ञान )



प्रा. फडके ( पदार्थविज्ञान )



प्रा. सौ. साने ( मराठी )




महाराष्ट्राचे नवे राज्यपाल
व आपले कुलपती
श्री. लतीफ



महाराष्ट्राच्या नव्या शिक्षणमंत्री
सौ. पाटील



श्री. शरद तळवलकर
मराठी रंगभूमीवरील
हास्यरस



सवाई गंधर्व संगीत समारोहात
सुधीर फडके
( आपला आजी विद्यार्थी )



छत्रपती पारितोषिक विजेती
विद्युत भागवत
( जिम्नॅस्टिक )

# साहित्य विभाग

# Antibiotics-Present & Future

Neeta Joshi, F. Y. J. C.

[ First prize in the essay competition organised by ' All India Association of Microbiologists ' ]

## Introduction

Antibiotics are chemical substances produced by various species of micro-orgaisms that suppress the growth of other organisms and may eventually destroy them.

The concept that substances derived from one living organism can kill another ( antibiosis ) is almost as old as science of microbiology. The application of antibiotic therapy, without recognition of it as such, is considerably older. Chinese, over 2500 years ago applied moulded curd of soyabean to treat boils and carbuncles. Pasteur and Joubert in 1877 noted that Anthrax bacilli grew rapidly when innoculated into sterile urine but failed to multiply and soon died if one of the common bacteria of the air was introduced in the urine at the same time. They stated that this observation might hold great promise for therapeutics.

The prophecy came true and the Golden age of antimicrobial therapy began with the discovery of penicillin by Scottish scientist Fleming in 1928 ( He received Nobel Prize in 1945 ) and subsequent production of penicillin in 1941 on a mass scale for clinical trials. Though discovery of penicillin was accidental subsequent search for such agents has been a highly planned, scientifically designed effort. These 40 years have introduced dozens of antimicrobial agents with clinical utility.

The history of antimicrobial agents has thus been dynamic, characterised by emergence of new challenges, followed by investigations, discovery and production of new drugs.

## Classification of Antibiotics & Their Actions

The organism susceptible to the inhibitory or lethal effect of an antibiotic constitutes its " spectrum ". According to their spectra antibiotics can be classified as narrow and broad spectrum antibiotics.

An ideal antibiotic should have effect only on the infecting organism with minimum damage to the host tissues and side effects on the host systems. However such an antibiotic nearly does not exist.

Antibiotics are called bactericidal when they destroy organisms and bacteriostatic when they stop growth of the organisms and the body defences kill the organisms. However in higher dosage most of the bacteriostatic antibiotics become bacteri-

cidal.

Antibiotics are classified in two major ways –

( a ) Antibiotics for systemic action.

( b ) Antibiotics for topical action.

The other style of classification is according to the spectrum of their action e.g. 1 ) Those acting on Gram positive organisms. 2 ) Those effective against Gram negative organisms etc.

The effectivity of antibiotics is studied in two ways – Culture studies and inhibition of growth of organisms in the laboratory and clinical trials on patients. Organisms found to be sensitive in laboratory test do not necessarily get killed in human body and vice versa.

**Antibiotics in Human Diseases**

Antibiotics used in human diseases are Penicillins, Streptomycin, Tetracyclines, Erythromycin ( Group ), Neomycin ( Group), Tyrothricin (Group), Nystatin, Amphotericin, Griseofulvin, Kanamycin, Gentamycin, Cephalosporins, Rifamycins, Chloramphenicol, Hamycin and many others. The list is still increasing and is not fully completed in view of limitations of this essay.

Diseases that can be treated are Bacterial, Spirochetal, fungal, candidial, Mycobacterial and several other groups of infections involving several tissues and organs in the human body. Individual diseases that can be treated are not ennumerated because of lack of space.

Diseases caused by viruses are however not amenable to therapy. True antiviral antibiotic is still to be discovered. In viral diseases antibiotics have been used to control super-added infections.

Side effects of antibiotic therapy range from simple nausea, vomiting, headache upto aplastic anaemia, anaphylactic shocks and varieties of drug rashes. In view of this, selection of an antibiotic should be such that the beneficial effects should distinctly outweigh the possible serious side effects.

**Role of Antibiotics in Veterinary Medicine**

Antibacterials have been used for a sufficiently long time for the treatment and prevention of disease and as growth promotors in animals.

Swann report recommended that antibacterials suitable for addition to animal feeds without prescription should be restricted to –

( i ) Those that are of economic value in livestock production.

( ii ) Those that have little or no application as therapeutic agents in man or animals.

( iii ) Those that will not impair the efficacy of a prescribed therapeutic antibiotic through the development of resistant strains.

The diseases treated by antibiotics in domestic animals include Calf scours and pneumonia, Calf enteritis and septicaemia, Metritis and pyelonephritis and the antibiotics used are Penicillin, Tetracyclines, Erythromycin, Lincomycin, Tylosin, Cephalosporins, Chloramphenicol etc.

A number of antibacterials like Carbadox, Emtryl, Flavomycin, Nitrovin, Virginomycin etc. have come to be

described as "growth promoters" and can be added to the feed or water supply by the farmer without veterinary supervision.

As in human being besides the oral route intramuscular, intravenous and subcutaneous routes can be employed to treat acute clinical conditions. As in human beings the selection of antibiotics is done on the basis of clinical examination knowledge of common organisms which produce those diseases and the clinical experience of the doctor in charge.

Precise laboratory information about the organisms is obtained whenever required and possible.

Present commercial demand of rapid return of the animal to health does not permit delay.

## Role of Antibiotics in Diseases of Plants

Antibiotics have produced morphological effects on plants and both growth stimulation and inhibition have been observed. In addition subtle physiological changes and genetic modifications have also been reported.

Internal protection of a plant against invading pathogens as well as eradication of established infections has been achieved by antibiotics.

Cycloheximide, though having a narrow spectrum, is effective against some pathogens in very low concentrations. Griseofulvin is another useful antifungal antibiotic.

In bacterial diseases tetracycline neomycin, magnamycine, chdortetracyline etc. are used.

In fungal diseases cycloheximide, Griseofulvin, Endomycin, Gramicidin, Helixin B, Bacitracin etc. are used.

Methods of applications are sprays, dusts, dips, soil and sand applications, paste applications etc.

## Future of Antibiotics

When antibiotics were initially introduced, particularly penicillin, it was thought to be panacea for all diseases.

At present approximately 30% of hospitalised patients receive one or more courses of antibiotics and millions of fatal infections have been cured. Besides morbidity is minimised in a majority of disorders.

However the frequent indiscriminate use of these powerful weapons have blunted them and now we are facing the major problem of development of resistant strains of organisms.

When the antimicrobial activity of an antibiotic is first tested, the pattern of sensitivity and resistance is defined. However later on organisms by ingenious alterations obtain a capacity to survive in presence of antibiotic. This phenomenon of acquired drug resistance varies from organism to organism and from drug to drug.

To give an example-80% of hospital and community strains of Staphylococous aureus have become resistant to penicillin. Strains of gonococci have produced penicillinase, an enzyme that inactivates penicillin.

The resistance developed by the orga-

nisms can be absolute or relative. It is relative higher dosage of antibiotic becomes beneficial.

Organisms develop resistance by the mechanisms of mutation, transduction, transformation and conjugation.

Future of antibiotics will be a game of wits between the scientists and the organisms each trying to surpass the other. There is still a scope for developing antiviral antibiotics a challenge we must accept.

Let us hope that we succeed in altering chemical structures of our existing antibiotics as well as developing new drugs so that we are always ahead of the organisms.

It is worthwhile remembering famous words of Anon-" The Greatest and noble pleasures man can have in this world is to discover new truths and the next is to shake off old prejudices. "

**References**

1. Pharmacology and Pharmacotherpeutics-Satoskar, Kale and Bhandarkar, 7th Edition 1980-Popular Prakashan-Bombay.
2. The Pharmacological Basis of Therapeutics-Editors-L. S. Goodman and A. Gilman ( 1980 ), Macmillan Publishing Co. New York.
3. Antibiotics and Antibiosis in Agriculture-Editor-M. Woodbine, University of Nottingham-( 1977 ).
4. Antibiotics-Their chemistry and Non-medical uses-by Herbert Goldberg ( 1969 ), D. Van Nostrand Company, New York.

## A Glance at NCC

( NCC-means National Cadet Corps. )

u/o **Chavan Bharat Nhanu**, S. Y. B. A.

Motto-" Unity And Discipline. " in Hindi it is " Ekta Aur Anushasan. "

Note- I would like to bring to the notice of my dear colleagues and all my fellow Cadets that NCC is a vast organisation which has three wings namely Army wing, Naval wing and Air wing, which cannot be summed up in this article. I am therefore restricting myself to NCC-Army wing.

History-In July 1946 NCC Commitee was constituted under the chairmanship of Pandit H. N. Kunzru to suggest ways and means of inculcating discipline in the youth of the country and to impart to them service training so as to help expansion of armed forces in a national emergency. The Committee submitted its

report in March 1947 which was accepted by the Government of India affer consulting the State Governments.

1948-Decision of the Govenment of India to implement the cadet corps scheme. Passage of the NCC Act by the Parliament Inauguration of cadet corps on July 15.

**Organisation** - NCC started functioning in 1948 as a small organisation. It was placed under the Command of the Director of NCC under the Ministry of Defence. Colonel Bewoor was the first Director of NCC. The states showed greater enthusiasm for NCC and there was a phenomenal expansion with the increase in the number of cadets on the rolls of the organisation, the rank of the Director General was also upgraded. Now the corps is commanded by a Major General. He is an officer of the army and is assisted by the officers of the Navy and Air Force. He works in close co-operation with the three. Service chiefs under the Director General NCC are the NCC Directorates which are generally responsible for the administration of the coıds in the states. There are present16 NCC Directorates in the states. Each Directorate is commanded by Brigadier/Colonel. Under each Directorate are a few NCC Gp. HQ's Commanded by Lt. Cols.

Membership :—The membership of NCC is open to students on rolls of the Schools and colleges. They must be between 13 to 26 years of age. There is no service liability. There are two divisions of the corps-the Senior and the Junior. The Senior and Junior division both have boy and girl cadets on the rolls. Senior Division is in the colleges and the Junior Division in Schools. The training is spread over a period of 3 years. On completion of this training the boy cadet can appear in Certificate 'C' and the Girl in certificate G-11.

Duty and Discipline :— "To obey God's orders as delivered by Conscience that is Duty to obey man's orders as issued by rightful authority that is Discipline. The foundation of both alike is denial of self for a higher good. Unless the Lesson of duty be first well learned. Discipline can be but imperfectly understood."

## Aims of NCC-

( 1 ) Development of Leadership Character, Comradeship, Spirit of sportsmanship and the ideal of Service.

( 2 ) To create a force of Discipline and trained man power which as an National Emergency could be of assistance to the country.

( 3 ) To provide training for students with a view of developing in them officer-like qualities, thus also enabling them to obtain commission in the Armed Forces.

Interesting Events-The selected cadets for the following camps, as mentioned below are sent to various parts of India at the Govt. expense.

| No. | Events | Duration. days |
|---|---|---|
| ( 1 ) | Annual training Camp | 12 |
| ( 2 ) | Advance leadership Course | 21 |
| ( 3 ) | Basic leadership Course | 12 |

( 4 ) Para training Course 35
( 5 ) Basic mountaineering 32
( 6 ) Advance mountaineering 32
( 7 ) Army Attachment 21
( 8 ) Rock climbing 21
( 9 ) Water-Ski-Course 14
(10) Pre-Pre-RD. Camp 12
(11) Pre-R. D. Camp 12
(12) R. D. Camp 21

Mountaineering expedition, Cycle expedition, Social Service and Blood donation.

The main aims of the above mentioned Camps are :—

( 1 ) Impart collectively training to the NCC Cadets with Special emphasize on development of qualities of Leadership and Spirit of Adventure.

( 2 ) Give opportunity to NCC cadets and appointment holders to exercise command and control.

( 3 ) Give opportunity to the NCC Cadet to live together under hardship.

( 4 ) Give opportunity to NCC cadet to collective Spirit of comradeship and unity among themselves.

( 5 ) To take part in organised sports and develop a spirit of healthy competition.

**Facilities for A cadet**

( 1 ) Free Uniform.

( 2 ) Special camp kit for various camps.

( 3 ) Refreshing and washing allowance.

( 4 ) Soap yellow one half bar a month.

( 5 ) Bus fair to camp/course.

( 6 ) Travelling DA ( A ) Rs. 3/- and Rs. 4/- a day by Road and Train.

( 7 ) Free accomodation and Medical care in camps.

( 8 ) Rs. 42/- to a cadet of Army Attachment.

( 9 ) Rs. 400/- and Rs. 525/-towards course fee of mountaineering and water-Ski.

(10) Free Blazer and a set of uniform to R. D. cadet.

(11) 3 Scholarships of Rs. 100/-each by chiefs of Staff. Army, Navy and Air-Force to Best-cadets at R. D. Camp.

(12) Four Scholarships of Rs. 300/- and Rs 200/- by Maharashtra State to Senior Division and Junior Division cadets. Respectively adjuged Best at Group Level.

**Incentives**

( 1 ) Commission in Army : 32 Vacancies reserved for 'C' Certificate holder.

( 2 ) Commission in Navy : 6 Vacancies reserved for 'C' Certificate holder.

( 3 ) Commission in Air Force : 10 % Vacancies reserved for 'C' Cert. holder in Aeronautical Engg. ADM Branch and Acectent Branch.

( 4 ) Pilots shortfall after accomodating NDA cadets goes to 'C' certificate holder.

( 5 ) A 3 rd class graduate with 'C' certificate can be gazetted officer in CRT.

( 6 ) For selection of SI in BSF weightage af 5, 10 and 15 marks is given for 'A' 'B' and 'C' Certificate respectively.

( 7 ) 'C' Certificate holder is given preferrnce for Recruitment in Central, Industrial Force, Indo-Tibetian border

force and many other central and state Govt. departments including IAS and allied services.

Special Bulletin : Every year a no. of selected cadets are sent to 'Republic Day Parade' camp at New Delhi. During the camp this selected band of cadets meet honourable P. M., Defence minister, Chief of Army Staff, Naval Staff and Air Staff and Director General of NCC. On 26 th January, while proudly marching past the dias with their chests up, they get an unique opportunity of saluting the President of India. They have every reason to be proud. Now many of us can get a chance to participate in any of the functions of 'Republic Day at New Delhi.

Another good news for NCC cadets is that, last year, One - officer and Twenty-one cadets went to Canada, Under the "Youth Exchange Programme." This year this number is likely to swell to 250 Cadets. They would be going to different Europeon countries. Do you like to be one of those ? If yes, do not let grow grass under your feet". Join NCC-today.

☆ ☆

# The Most Beautiful

**Sateeshchandra Joshi**, T. Y. B.Com.

Each human being has its own characteristics liking and disliking. He thinks in different manners. So these things are relative in each of the individuals. He strives hard for such a place which will provide him the relief in his tired, unpleasant, hard and faster life. Beauty spots or rather picnic spots are those places which can or are capable of providing such a relief to hectic life of his.

It is a lawn in the man's life of desert. It is fall of the happiness, freshness etc. By watching, travelling through and visiting these places man forgets himself, he enters into a heavenly happiness which he is unable to experience in a real walk of life.

Nature has donated many such gifts to man's life. And the RAINBOW is one of the loveliest gift which is a significant of love of nature. It's a real representative of devotion, love of nature which can be seen with bear eyes. And love is something which can be seen and experienced.

Love itself is a heavenly concept. It is one of the several feelings of human life. "How many colours does a rainbow own ?"

"Yes. Right !" "Seven !" which is also in case of love- Mothers love their

children, A brother loves his sister. A teacher loves his students. A patriot loves his country. A human being loves animals, and of course the most important, human being loves the other.... These are the loveliest colours of the Rainbow of a Man's life. Yes, it's the word love.

And the Rainbow of nature is also the same. Without life & love human being is no more. To love someone is the characteristic feature of human's mind; from which or with the help of which he tries to give off the depth of the nature.

The beauty of the rainbow is simply beyond description. It's a kind of challenge to human being. It as if challenges the man to create such a thing in his life which is simply impossble for him. But the rainbow is not meant for teaching the human being at large but it is meant for an encouragement for human development morally as well as scientifically.

And friends, this is the most beautiful thing which I have ever seen in my walk of life. Although it is an impossible task to create the beauty of the rainbow in a life period. Undoubtedly, Rainbow is the motive force of a merry, happy life. So to look at such a creation, donation is a supreme heavenly experience. Rainbow is thus a mirror of a human life to taken its own look. A happy figure....

Love everybody the world would
Turn into a paradise....
And that is the most beautiful....
A dream or a reality.... it is upto you
my dear friends.

* *

# India In Space Research

S. P. Rawatale, F. Y. B. Sc.

19th June 1981 was indeed a golden day in the history of Indian Science. On this day, the first Indian made telecommunication satelite ' APPLE ' was launched which is a landmark in research programme of our country : Indian Scientists have proved their capability to match the talent of their contemporaries in advanced countries.

Before ' APPLE ' we sent Aryabhata, Bhaskara, and Rohini Satellites in the space. They were Scientific Satellites. These Satellites were conducting experiments and taking photographs. "APPLE" is the first Indian telecommunication Satellite.

The project ' APPLE ' was initiated more than five years ago. In April 1975 ' European Space Agency ' ( ESA ) had invited proposal for payloads for Asianes flight. ' Indian Space Research Organisation ' ( I. S. R. O. ) proposed ' APPLE '.

The project was accepted by E. S. A. in December 1976. The cost of the project was 17 million Rupees. It was built in nearly three and half years. The construction was made at I. S. R. O. Satellite Centre at Bangalore. ' APPLE ' is the abbreviation of ' Asian Passenger Payload Experiment '.

On 19th June 1981 ' APPLE ' was launched from 'European Space Agency's' launchpad at Kourou on the Atlantic Coast in French Guyana. The Indian Scientists were worried due to failure of the earlier ' Rohini-2 mission ' Asiane rocket which lifts of ' APPLE ' is Europe's most powerful rocket. Jamming of one of the two U. S. A. designed Solarpannels did sent out a wave of disappointment, but I. S. R. O. Scientists successfully tackled the ticklish situations and proved that they have mastered the space technology. Their efforts were crowned with success when on July 16th, after 28 days drama. ' APPLE ' was finally positioned into its parking slot at 102° East longitude. It is nearly 36,000 Km. above the earth surface and is fixed in space over Sumatra in Indonesia. It is put in a circular orbit and takes exactly 24 hours to make one round of earth, the time which earth takes to make one revolution on it's axis. It is orbiting right over the equator. It appears to be fixed in space and that is a necessary condition for telecommunication purposes. The qo cm-dish antennae for APPLE is pointing towards Nagpur, which is the geographical centre of India. On reaching its alloted position, APPLE'S vioce, C-band communication transponder was switched on. APPLE'S life is only two years.

I. S. R. O. and Posts and Telegraphs Department will now conduct telecommunication experiments, which will facilitate knowledge and useful experience for Scientists. Indian telephone Industries are developing a ' Transportable Remote Area Communication Terminal' (TRACT) for use of Post & Telegraph Departments. This terminal can be set to function within six hours anywhere. Even in cyclonic storms and floods. It can establish communication links via the satellite immediately for organising relief work in case of emergency. It can also be used as a temporary earth stations.

A number of other experiments are planned to be carried out on APPLE will interconnect, computers and dirtribute T. V. programmes. These experiments include multiple approach a far wider coverage of national broadcasts and events on realtime mode, wagon bracking for Indian-Railways, Banking operations telephone and teleprinter links etc. It will be possible to videophones in this country.

By successful launching of APPLE, Indian Scientists have gained more confidence. I. S. R. O. is now going to launch a series of telecommunication satellites under the programme I. N. S. A. T. which will be a multipurpose domestic satellite system. I. N. S. A. T.s master control facility which will provide tracking and elementry support to INSAT is

in progress at Hassan. This facility will control and manage the satellite during orbit raising and on the orbit phase. Some of the hardwares such as platforms for collecting meteorological data and reception systems of T. V. programmes are designed and fabricated by the space applications centre at Ahmedabad.

The launching date for 'Indian National Satellite' ( INSAT ) has been tentatively fixed at 8 April 1982. The Satellite is being built by the 'Ford Aerospace and Communications Corporation USA' It will be launched by the 'National Aeronautics and Space Administration (NASA) from Cape canaveral. INSAT is expected to function for seven years. It will be positioned at 74⁰ East longitude.

INSAT-1 will be the multipurpose domestic Satellite system which will bring tangible benefits of space technology to the common man. 'APPLE' is providing certain experimental capabilities in Communications. INSAT will facilitate nation wide television and radio broad casting, round the clock weather fore-casting and telephone connections even to remote areas. The Post and Telegraph Department is establishing thirty one earth stations out of which 28 stations are fixed and 3 transportable stations for establishing telecommunication via-Satellite. Others who will make the use of the capabilities of INSAT are Oil and Natural Gas Commission, All India Radio, Door-Darshan and Meteorological Department. The Oil and Natural Gas Commission will use INSAT-1 for search of oil and gas under ground and water.

The television and radio programmes which will be telecast and broadcast through 'INSAT' will cover the six States i.e. Uttar-Pradesh, Maharashtra, Gujarat, Bihar, Orisa and Andra Pradesh.

The Meteorological Department is setting up a meteorological data centre at Dehli. This Centre is for processing data received at a number of data collection platforms. Secondary Data Connection Centres are being set up all over the country, in both land and sea. The number of centres set up will be twenty.

By launching 'APPLE' India joined those five countries which have capability of designing, building and positioning their own geostationary communication Satellites. These five countries are the U. S. A., the Soviet Union, Canada, West Germany and France. So every Indian must be proud of the progress made by Indian Scientists in Space research and must wish a bright future suceess in coming years.

Three cheers for ISRO !

# ओ, संगीतके बादशहा !– अलविदा ऽ

**दीपक वसंत करंदीकर**, तृतीय वर्ष वाणिज्य

५ जानेवारी १९८२ रोजी त्या परमेश्वराने एका " संगीत रत्ना "ला आपल्या संग्रही ठेवण्यासाठी या जगातून कायमचे नेले. तो संग्राहक अजब आहे!

" संगीत रत्न " सी. रामचंद्रांना ही एक भावपूर्ण श्रद्धांजली.

रामभाऊंच्या सूरगंगेच्या असंख्य लाटांची प्रत्येकी दखल घेणे अशक्य आहे. तरी काही मौक्तिकमाला आपल्या आगळेपणाने उठून दिसणाऱ्या, आपल्या जादूई सुरावटीने अजूनही रोमांचित करणाऱ्या ! त्यांच्या " शाम ढले खिडकीतले ", " शोला जो भडके...., संडे के संडे..." इत्यादींनी आजच्या " रंबा हो संभा "च्या डिस्को जमान्यातील युवक-युवतींना कधी वेड लावले तर कधी," धीरेसे आजा रे अँखीयनमें...., कैसे आऊं जमुनाके तीर...." इत्यादीने आजचे फास्ट म्युझिकही स्तब्ध केले. काय जादू, मोहिनी व अमरत्व आहे या संगीतात भरलेले की जे निर्मिलय एका आगळ्या जादुगाराने !

आण्णांचे संगीत हे वैशिष्टयपूर्ण जसे होते, तसेच रुचिपालट करणारेही होते. त्यांची पाश्चिमात्य सुरावटीची गाणी जशी लोकप्रिय झाली, तशीच त्यांची अभिजात गाणीही लोकांनी उचलून धरली. त्यामुळेच ग. दि. माडगूळकर म्हणत असत की, " सी. रामचंद्र हे जसे बबर्ची आहेत, तसेच ते उत्तम बावर्चीही आहेत. आणि म्हणूनच ते त्यांच्या संगीतात मटणाचा झणका आणू शकतात. तशीच बासुंदीपुरीची लज्जतही...." चित्रपट संगीतावर हल्ली पडलेल्या पाश्चिमात्य संगीताच्या प्रभावाने ते उद्वेगाने म्हणत, " आजच्या चित्रपट संगीतात निर्माण झालेला पाश्चिमात्य संगीताचा भस्मासूर पाहून, त्या काळात हे संगीत येथे आणण्यात मी फार मोठी चूक केली आहे " पण माझ्या मते ही त्यांची चूक नाही, तर त्यांचे अंधानुकरण करणाऱ्या आजच्या संगीतकारांची आहे.

१९४५ ते १९६५ हा त्यांचा भरभराटीचा काल. त्या काळी त्यांनी बांधलेली प्रत्येक चाल ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील देखणेपणा व गोडवा घेऊन जन्मास येत होती. त्यांच्यातील कलावंत कीर्तीची, वैभवाची, लोकप्रियतेची शिखरे एकामागून एक काबीज करीत होता, आणि त्याचप्रमाणे त्यांच्यातील माणूसही मोठा होत होता, उंच होत होता. कोपरगाव येथील पुणतांबे गावी १२ जानेवारी १९१८ रोजी जन्मलेला रामचंद्र नरहर चितळकर नावाचा महत्त्वाकांक्षी व कलागुणी माणूस पुढे भारताचे आभूषण बनला. स्वतः स्वरसाम्राज्यात रमला, आणि त्याने रसिकांनाही रमविले.

सी. रामचंद्रांच्या मते संगीत ही साऱ्या विश्वाची भाषा आहे. या सुरावटीच्या साम्राज्याला सीमा नसतात, हे अगदी सत्य आहे. नाही तर " अल्बर्ट हॉल "मध्ये हिंदी–मराठी भाषांमधील गाण्यांना टाळया पडल्याच नसत्या व तेथील शो हाऊसफुल झालेच नसते. संगीत कोणा ठराविक वर्गाची मिरासदारी नाही. ते जसे महालवाल्यांसाठी तसेच ते मोहल्लेवाल्यांसाठीही आहे. त्यातून चित्रपटाची लोकप्रियता ही आम जनतेवर अवलंबून असते. आणि म्हणून सामान्यांसाठी संगीत ही त्यांची मूळ कल्पना होती. त्यामुळेच अनेक वर्षांनी पुन्हा प्रदर्शित होणारा ' अलबेला ' नवनवीन विक्रम मोडतो आहे. त्यातील बेमिसाल गाण्यातील ही कमाल होय, खरं ना ?

आण्णा जास्त खूष असत व मूडमध्ये असत ते स्वर व मद्यापेक्षा त्यांच्या गतवैभवाच्या काळात ते रमले की. त्यावेळी त्यांच्या अंगावरील चिरगुटाची राजवस्त्रे होत. घर राजमहाल होई. काळाला मग थारा नसे. मद्याच्या घोटाच्या पायऱ्यांवरून मग हा सूरांचा सम्राट ऐटीने चालायचा.

सूर व सुराही सी. रामचंद्रांच्या जीवनातील महत्त्वाची जीवनद्रव्ये होती. सूर नसते तर राम चितळकर यांचा सी. रामचंद्र हा झालाच नसता. व सुरा नसती तर सी. रामचंद्रांच्या संगीताचे मनोरे उभे राहिलेच नसते, असे ग. वा. बेहेरे यांनी म्हटले आहे.

" — सरगम " हे १९७७ मध्ये त्यांनी आपले

आत्मचरित्र लिहिले. त्यातील हे विचार--

" मला वाटते, मानवी आयुष्ये ही ईश्वराच्या मुखातून पाझरलेली गीते आहेत. प्रत्येकाची सुरावट वेगळी, ताल वेगळा, सारखेपणा आढळला तर तो अपवाद. प्रत्येक गीताचा सूरविस्तार स्वतंत्र, भावदर्शनही वेगळे. मी स्वतःला एक नम्र कलावंत समजतो. "

अण्णांची "अनारकली" व नौशाद यांचा "बैजू बावरा" हे दोन चित्रपट एकाच वेळी प्रदर्शित झालेले व तोबा गर्दी खेचणारे चित्रपट. ते अतिशय गाजले, ते त्यातील संगीतामुळेच. यातच आपल्याला विश्वबंधुत्वाचा व समतेचा भाव दिसून येतो. तो असा--

" नौशादभाई म्हणजे एका मुसलमानाने, हिंदू पार्श्वभूमीवरील चित्रपट हाताळताना "मन तरपत हरि दर्शनको आज" हे नितांत सुंदर भजन पेश केले तर सी. रामचंद्र यांच्यासारख्या हिंदूने मुसलमानी पार्श्वभूमीवरील "अनारकली" हाताळताना "दुवा कर गमे दिल खुदासे दुवा कर", "ये जिंदगी उसी की है, "जाग दर्दे इष्क जाग" इत्यादी गाणी अजरामर केली. ती रसिकांच्या काळजाचा ठोका चुकवतात, मोहरून टाकतात. धर्म, जातपातीच्या भिंती केव्हाच ढासळतात.

" ऐ मेरे वतन के लोगों.... " या गीताने तर सर्वांवर कळसच चढविला. चिनी आक्रमणाच्या काळातील हे गीत लताबाईंच्या गोड गळयातून ऐकून, पंडित नेहरूजींच्या डोळयांतही अश्रू तरळले ! हे सर्वश्रुत आहेच. १९६५ साली सी. रामचंद्र हे चित्रपटसृष्टीतून निवृत्त झाले व नंतर त्यांनी तरुण गायकांना शिकविण्यासाठी ॲकॅडमी काढली. माडगूळकरांच्या 'गीत गोपाल' चे कार्यक्रम केले. तसेच 'भूलाये न बने' चेही कार्यक्रम केले.

जीवनाचा प्रत्येक क्षण ते नवीने, रसिकतेने जगले. त्यांचे मस्त, धुंद, कलंदर जीवन पाहिले की मला 'तुझे आहे तुजपाशी' मधील काकाजी आठवतात. आण्णांचा जीवन-दृष्टिकोण असा होता की--

" लुत्फे मैं तुझसे क्या कहूं जाहिद,
हाय कंबख्त, तूने पीही नहीं "

जीवन हा अनेक प्रकारच्या फुलांचा बाग आहे, आणि व्यक्तींनी मधमाशांप्रमाणे असले पाहिजे. त्यांनी सर्व फुलांतील मध गोळा केला पाहिजे. अण्णा त्यांच्या स्वतःच्या स्वभावाने गर्विष्ठ वाटत. पराकोटीचे स्वाभिमानी वाटत. पण हे त्यांच्या कर्तृत्वाने शोभून दिसे. तो रुबाब, तो गर्व होता एका बादशहाचा.

सी. रामचंद्र गेल्याचे कळले तेव्हा मला वाटलं.. अरेरे, वाईट झालं....मस्तीत आयुष्य जगणारा एक कलंदर कलाकार आपल्यातून निघून गेला, तो त्यांच्या संगीतरूपाने अजरामर होऊनच ! तीन तपाहून अधिक काळ रसिकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेल्या सूरांच्या कलंदर बादशहाला मी विनम्र अभिवादन करतो, तेव्हा माझ्या ओठांतून सहज शब्द उमटतात, "तुम क्या जाने तुम्हारी यादमें हम कितना रोये । " दैवाने त्यांना जगातून अवचितच उचलून नेले. पण त्याने अमाप नुकसान झाले ते आपल्यासारख्या रसिकांचे ! या संगीतप्रभूचे संगीत म्हणजे प्रत्यक्ष जीवनरस होता आणि आहेही. त्यांच्या जीवनरसाचे वर्णन असे करता येईल की--

" पानी रे पानी तेरा रंग कैसा ?
जिसमें मिला दे उसके रंग जैसा । "

ते कधी पवित्र तीर्थ, कधी शक्तिवर्धक गोरस, कधी तरतरी आणणारा चहा, कधी विविध स्वादयुक्त रंगीबेरंगी सरबत, तर कधी बेहोशी आणणारी शराब, अशा नाना स्वरूपात आढळते.

आता आण्णांना भेटायचे झाले तर ते त्यांच्या रेकॉर्डसमध्येच. कारण जरी त्यांचे शरीर हे त्यांच्या मालकीचे असले तरी त्यांची कला ही रसिकांचीच आहे. त्यामुळे जरी ते शरीराने गेले तरी त्यांच्या कलेने ते अजरामरच आहेत. अण्णा गेल्याने त्यांच्या रसिकांचा स्वर जरी कणसुरा झाला तरी त्यांचा मधाळ आवाज व त्यांची कला अजरामरच राहील. अलविदा ऽ

◇ ◇ ◇

# सुरात हरवलेला महान संगीतकार— सी. रामचंद्र

**प्रतिभा भालचंद्र वाळिंबे**, प्रथम वर्ष वाणिज्य

बुधवार दिनांक ५ जानेवारी १९८२ चा दिवस उजाडला तो सी. रामचंद्रांच्या दुःखद निधनाची बातमी घेऊनच त्यांचे नाव रामचंद्र चितळकर असे असले तरी सिनेजगतात 'सी. रामचंद्र' या नावाने ते विख्यात होते. सिनेजगतावर १९४५ ते १९६५ ही दोन दशके त्यांच्या संगीताने मोहिनी घातली होती. एकूण दीडशे चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. ते संगीत दिग्दर्शक असलेल्या सुमारे २५ चित्रपटांनी रौप्य महोत्सव साजरा केला होता. 'समाधि' मधील 'वो दूर जा रहे है,' 'तुम क्या जानो, हम क्या जाने','अलबेला' तील 'धीरे से आजा रे' हे संगीत कधीच न विसरण्यासारखे आहे. सी. रामचंद्रांनी खरोखर दीर्घकाळ टिकणारे संगीत दिले. 'आझाद' मधील 'ना बोले ना बोले' या गाण्याची लोकप्रियता कधीच कमी होणार नाही.

पाश्चिमात्य संगीतातील उडत्या चाली हिंदी संगीतात आणण्याचे आणि त्या लोकप्रिय करण्याचे श्रेय सी. रामचंद्रांनाच द्यावे लागेल. परंपरागत हिंदी संगीतात असा बदल करणे हे एक धाडसाचेच होते. पण सी. रामचंद्र त्यात यशस्वी झाले, इतकेच नव्हे तर त्यांच्या या प्रवाहमुक्त चालींपासून अनेक नव्या संगीतकारांनीही चाकोरी सोडण्याची प्रेरणा घेतली. 'ये जिंदगी उसकी है,' या अनारकलीतील शास्त्रीय संगीतावर आधारित त्यांचे गीत, जसे सर्वांच्या ओठांवर होत तसंच 'इना मिना डिका' ही चालही प्रचंड लोकप्रिय ठरली होती.

गीतांनी लोकांमध्ये आत्मविश्वास नि उत्साह निर्माण करता येतो हे सी. रामचंद्र यांनी आपल्या 'ए मेरे वतन के लोगों' या गाण्याने सिद्ध केले. त्यांनी लाखोंच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त केले आहे. सी. रामचंद्रांच्या संगीताची व्याप्ती अमर्याद होती. स्वतः सी. रामचंद्र हे चांगले गायकही होते. 'अलबेला'तील 'भोली सूरत' या गाण्यान लोकांना गुणगुणायलाच नव्हे तर नाचायलाही लावले.

त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीतील संगीताचे एक युगच संपले आहे. सी. रामचंद्रांनी कधी कुणाची नक्कल केली नाही. जिद्द आणि कर्तृत्व या दोन गुणांमुळे ते मोठे झाले. ते सर्वोत्तम संगीतकारच नव्हे तर प्रेम करावे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. हा माणूस नेहमीच सिंहासारखा राहिला. अनेक नवोदितांना त्यांनी प्रोत्साहन दिले. सी. रामचंद्र १९६५ नंतर सिनेसंगीत क्षेत्रातून निवृत्त झाले. त्यानंतर उदयोन्मुख व तरुण कलावंतांना संगीत शिक्षण देण्यासाठी त्यांनी एक संगीत अकादमी स्थापन केली.

सूर हे सी. रामचंद्रांच्या आयुष्यातले एक महत्त्वाचे जीवनद्रव्य होते. सूर नसते तर रामचंद्राचा, सी. रामचंद्र हा कलावंत कधीच झाला नसता. पाच पंचवीस वर्षे लळत लोंबत जगण्यापेक्षा कलावंताने धूमकेतूप्रमाणे प्रकाश देत देत विलीन व्हावे हेच खरे. खरे तर, हे कलावंत अस्तंगत झाले म्हणजे जातात तरी कुठे? कारण अरसिक परमेश्वराला त्यांच्याजवळ येण्याची हिंम्मत नाही किंवा असुरांना या सुरांच्या राजाची महती कळणारच नाही. मला वाटते, तारांगणात अनेक तारे लुकलुकतात त्यांपैकी एखाद्या ताऱ्यावर हे कलावंत जात असतील.

सी. रामचंद्रांचे संगीत ही चिरकाल टिकणारी आठवण आहे. त्यांच्या रचनांमध्ये संगीताचा मौलिक ठेवा आहे. कलावंतांची शरीरे जरी त्यांच्या मालकीची असली, तरी कला मात्र त्यांच्यासाठी नसते. असंख्य रसिकांच्या प्रेमाने या कलेचा ताबा घेतलेला असतो, म्हणूनच कलावंत शरीराने नाहीसा झाला तरी कलेच्या रूपाने कायम जनमानसातच राहतो.

# गुण गावे कलावतीचे !!

स्मिता जोशी, बारावी शास्त्र

अरे संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर

या ओळी कानांवर पडल्या म्हणजे बहिणाबाईंची आठवण होते. त्यांची काव्ये आजतागायत प्रसन्न टवटवीत आहेत. त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रतिभा नुसती झिरपते आहे. असे सरस आणि सोज्वळ काव्य मराठी भाषेत फार थोडे आहे. जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे त्यांच्या काव्याला तेज आहे. एका निरक्षर आणि अशिक्षित स्त्रीने हा काव्यखजिना रसिकांसाठी खुला केला हे पाहून आश्चर्य वाटते. प्रतिभा हे कवीला निसर्गाचे देणे आहे. कोकिळेने तोंड उघडले की आपोआप संगीत वाहू लागते. प्राजक्ताची कळी उमलली की ती सुगंधाचेच उच्छ्वास टाकू लागते. तसे जातीच्या कवीचे आहे. त्याचे हृदयच ताल धरून बसलेले असते. त्यामुळे त्याच्या जिभेवर येणारा शब्द मुळी नाचतच येतो. सृष्टीतले सौंदर्य आणि जीवनातले संगीत तो अंतःचक्षूंनी उपभोगत असतो. डोंगराच्या कपारीतून जसा एखादा झरा उचंबळत असतो तसे बहिणाबाईंचे काव्य उसळ्या घेत असते.

बहिणाबाईंनी तर शाळेचे कधी तोंड पाहिले नाही. 'विठोबाचे अन् रामाचे मंदिर हाच माझ्या शाळा' असे त्या म्हणत. रोजचे घरातले अन् शेतातले काम करता करता त्यांनी गाणी रचली. बहिणाबाईंच्या प्रतिभेची जात फार निराळी आहे. त्यांच्या कल्पनेची भरारी कोणत्याही जुन्या स्त्रीगीतात आढळून येत नाही. मोटेचे पाणी थारोळ्यात पडलेले पाहून

वसांडली मोट
करे धो धो थायन्यात
हुंदडत पानी
तसं तान्हं पाळण्यात !

हे मनोहर चित्र जिची प्रतिभा पाहू शकते, किंवा ऐन तारुण्यात सौभाग्य गमावले असताना

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुसोनिया गेलं कुंकू
रेखा उघडी पडली.

असे वैधव्याचे हृदयभेदक करुण काव्य जिच्या मुखातून प्रकट होते तिचे कवित्व सामान्य आहे असे कोण म्हणेल? सकाळी उठून बहिणाबाई घरोट्यावर म्हणजे जात्यावर बसून दळू लागल्या की जात्यातून पीठ पडू लागायचे अन् इकडे त्यांच्या ओठातून काव्य सांडू लागायचे-

अरे घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पिठी
तसं तसं माझं गानं
पोटातून येतं व्होटी !

स्वयंपाकघरात जाऊन त्या चूल पेटवायला बसल्या अन् चूल पेटता पेटेनाशी झाली आणि तिच्यातून नुसताच धूर बाहेर पडू लागला म्हणजे त्या काव्यामध्येच संतापून त्या 'चुल्ह्या' ला म्हणत.

पेट पेट धुक्कयेला
किती घेसी माझा जीव
अरे इस्तवाच्या धन्या
कसं आलं तुला हीव !

पुढे भाकरी टाकताना हाताला चटके बसू लागले म्हणजे संसाराची रहस्य काव्यरूपाने त्यांच्या मुखावाटे प्रकट होत.

अरे संसार संसार
खोटा कधी म्हणू नये
राऊळाच्या कळसाला
लोटा कधी म्हणू नये

काव्य जणू काही त्यांच्या रक्तातच भिनले होते. रस्त्याच्या कडेला कडुलिंबाच्या झाडावरच्या पिकल्या निंबोळ्या पाहिल्या की त्यांची कल्पनाशक्ती त्याच्यातील

सौंदर्याचे रसपान करू लागते.

कडू बोलता बोलता
पुढे कशी नरमली
कडू निंबोणी शेवटी
पिकसिनी गोड झाली !

समोरून पंढरीच्या दिंडीतला एखादा भाविक वारकरी येताना दिसला की बहिणाई त्याला गहिवरून प्रश्न करतात–

अरे, वारकऱ्या तूले
नही ऊन वारा थंडी
झुगारित अवघ्याले
आली पंढरीची दिंडी.

शेतकऱ्याचे जीवन कष्टाचे. पण जीवनाबद्दल कृतज्ञता बाळगून शेतकऱ्याने पंढरीच्या विठोबावर भार टाकावा असे बहिणाबाईंचे सांगणे होते.

शेतामधी गये घाम
हाडं मोडीसनी
आता घ्या रे हरीनाम
टाया पिटीसनी.

मानवी जीवनाकडे बघण्याचे एक स्पष्ट आणि प्रभावी तत्त्वज्ञान *बहिणाबाईंकडे* होते. म्हणून त्यांच्या काव्याचा सर्व आविष्कार सुभाषितांचा आहे. मराठी वाङ्मयात अमर होतील अशी अनेक सुभाषिते त्यांच्या काव्यात जागोजागी विखुरलेली आढळतात. त्यांच्या काव्यातून भाषेची आणि विचारांची देदीप्यमान श्रीमंती प्रकट होते. जग हे मिथ्या आहे आणि संसार म्हणजे माया आहे ह्या विरक्तीच्या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्रातल्या गोरगरिबांचे फार नुकसान झाले आहे. त्यांना ह्या अडाणी शेतकरी कवयित्रीने 'संसार' ह्या लहानशा कवितेत फारच सुंदर अन् सामर्थ्यवान संदेश दिला आहे.

मानवी जीवनाचे रहस्य शुद्ध प्रेम आहे. स्वार्थ नाही. जीवन हे 'हृदयाचे देणे-घेणे' आहे असा मोलाचा सल्ला त्या देतात. त्यांना सर्वांत जास्त कशाची चीड असेल तर ती माणसाच्या स्वार्थातून निर्माण झालेल्या त्याच्या कृतघ्नपणाची ! त्या माणसाला संतापून म्हणतात, "माणसा, तुला नियत नाही रे. तुझ्यापेक्षा गोठ्यातली जनावरे बरी. तू फक्त स्वतःचा मतलब साधतोस. केवळ लोभामुळे तू माणूस असूनही पशूसारखा वागतोस–" त्यांची ही तळमळ 'मानसा, मानसा कधी व्हशील रे मानूस ?' ह्या काव्यातून आढळून येते.

गडकरी, कोल्हटकरांसारख्या प्रगल्भ विनोदपंडितांना शोभेल असला कोटिबाज आणि उपरोधिक विनोद बहिणाबाईंनी आपल्या काव्यात सहज केला आहे.

भाऊ 'घमा' गाळी घाम
'गणा' भगतगणांत

ही शब्दांची मौज जाता जाता त्या साधू शकतात. तथापि त्यातून पीठ 'येते' त्याला 'जाते' का म्हणतात, जो जमिनीत 'उभा' आहे त्याला 'आड' का म्हणतात किंवा ज्या दिवशी आपण गुढी 'उभारतो' त्या दिवसाला 'पाडवा' का म्हणतात ही बहिणाबाईंची विनोदी पृच्छा मार्मिक नाही असे कोण म्हणेल ? माणसांना हासवून शहाणे करावयाचे हाच विनोदाचा प्रधान हेतू आहे. बहिणाबाईंच्या विनोदात नुसता उपरोध नाही. त्यात सहानुभूतीचा आणि कारुण्याचा ओलावा ओथंबलेला आहे. त्या दृष्टीने 'खोकली माय' ही कविता वाचण्यासारखी आहे.

रचनेच्या आणि भाषेच्या दृष्टीने बहिणाबाईंचे काव्य अत्यंत आधुनिक आहे. प्रत्येक काव्यात एक संपूर्ण घटना किंवा विचार आहे. त्याचा प्रारंभ आणि अखेर परिणामाच्या दृष्टीने नाट्यात्मक व्हावा ह्याबद्दलच त्यांचा कटाक्ष आहे. शब्दांचा वा विचारांचा फार विस्तार न करता थोडक्यात एखादी भावना जास्तीत जास्त प्रभावाने कशी व्यक्त करता येईल याकडे त्यांनी विशेष लक्ष दिलेले जाणवते. रसाच्या व ध्वनीच्या दृष्टीने कुठेही ओढाताण किंवा विरस न होईल अशा कौशल्याने त्यांनी सोपे आणि सुंदर शब्द योजिले आहेत. त्यांच्या खानदेशी वऱ्हाडी भाषेने तर काव्याची लज्जत द्विगुणित झाली आहे. 'ळ' च्या जागी 'य' 'ण' च्या जागी 'न' वापरल्याने काव्याला प्रासादिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

मानवतेला त्यांनी दिलेल्या अमर काव्यखजिन्याने मराठी वाङ्मयात त्यांचे स्थान अढळ करून ठेवले आहे !

✧ ✧ ✧

# पक्षांतर– भारतीय लोकशाहीचा कॅन्सर

**नथूराम धायगावे**, प्रथम वर्ष साहित्य

भारतासारख्या खंडप्राय आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीप्रधान देशातील लोकशाहीला लागलेला पक्षांतर-रूपी कॅन्सरचा रोग नष्ट केल्याशिवाय येथील लोकशाही निकोप, सबल आणि खऱ्या अर्थाने लोकांची राजवट ( लोकशाही ) बनणार नाही. कारण पक्षांतरामुळे जनहित दक्षतेचा आणि नीतिमत्तेचा पूर्णपणे ऱ्हास झाला आहे. जनप्रतिनिधी म्हणून विधिमंडळामध्ये निवडून गेलेले राजकीय नेते स्वतःस राजे– महाराजे समजून सत्तेचा उपभोग घेत आहेत. त्यामुळे महात्माजींनी मिळविलेल्या राजकीय स्वातंत्र्याचा सामान्य माणसाच्या जीवनावर काहीही सुपरिणाम झाला नाही.

'पक्षांतर' ही सर्वात मोठी नैतिक आणि सामाजिक गुन्हेगारी आहे. तिचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. आज दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत सर्व पातळ्यांवर पक्षांतरे घडत आहेत. पक्षांतराची कारणे येथील पक्षपद्धती आणि जनवृत्तीमध्ये दडलेली आहेत.

## राजकीय पक्षांचा इतिहास

भारतातील पक्षांतराची समस्या समजून घेताना येथील राजकीय पक्षांची वृत्ती आणि विचारसरणी पाहिली पाहिजे.

भारतामध्ये असणारी बहुपक्षांतर्गत एकपक्ष प्रबळ पद्धती ( One party dominance ) सुद्धा पक्षांतराला उत्तेजन मिळण्यास कारणीभूत झाली आहे. वास्तविक द्विपक्ष पद्धती संसदीय शासनाच्या यशासाठी योग्य आहे. परंतु अशी पक्षपद्धती भारतात यशस्वी होऊ शकली नाही. जनता पक्षाच्या निर्मितीने द्विपक्ष पद्धतीच्या विकासासाठी ( विषयी ) वाटणारी आकांक्षा सुद्धा आता फोल ठरली आहे. हा राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष सुद्धा पक्षांतरानेच गारद झाला. आणि पर्यायाने १९७७ पूर्वीप्रमाणे काँग्रेसच्या रूपाने भारतात एकपक्ष प्रबळ पद्धती आज सुद्धा दिसून येत आहे. इतर सर्व विरोधी पक्षांचा विकास तत्त्वहीनतेमुळे, पैशाच्या, कार्यकर्त्यांच्या तुटवड्यामुळे आणि जनतेच्या अवकृपेमुळे खुंटला आहे.

भारतात सर्वप्रथम सुमारे एक शतकापूर्वी ( १८८५ साली ) राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेस) रूपाने राजकीय पक्षांची मुहूर्तमेढ रोवली गेली. प्रारंभी या पक्षात स्वातंत्र्याच्या प्रेरणेने एकत्र आलेले सर्व जातीधर्मांचे, सर्व पातळ्यांवरचे, सर्व प्रदेशांतले आणि सर्व विचारप्रणालींचे लोक होते. त्यामुळे काँग्रेस ही साऱ्या राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारी अशी सर्वव्यापी संघटना होती. राष्ट्रीय हित आणि पूर्ण स्वातंत्र्य हे काँग्रेसचे ध्येय होते. भिन्नभिन्न धर्मांच्या नेत्यांकडे काँग्रेसचे नेतृत्व होते. तेथे धार्मिक श्रेष्ठत्वाला थारा नव्हता. परंतु १९०६ साली मुस्लिम नेत्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून 'मुस्लिम लीग' या पहिल्या धार्मिक पक्षाची स्थापना केली. त्यांच्यामध्ये काँग्रेस ही फक्त हिंदूंचीच संघटना असून ती मुस्लीमांच्या हिताकडे लक्ष देत नाही. अशा प्रकारे धार्मिक कारणांवरून या देशातील पहिले सामूहिक पक्षांतर पार पडले. परंतु या पक्षांतरातूनच पुढे खंडप्राय अशा हिंदुस्थानाचे 'भारत–पाक' असे दोन तुकडे पडले आणि देश दुबळा बनला. पुढे १९०७ साली काही हिंदुनेत्यांना वाटले की, काँग्रेस ही अल्पसंख्याकांच्या आहारी गेली असून काँग्रेस हिंदूंचेही हित साधू शकणार नाही. आणि म्हणून हिंदूंच्या हितरक्षणासाठी 'हिंदू महासभा' या पक्षांची स्थापना झाली.

साधारणतः १८८५ ते १९३५ पर्यंत काँग्रेस ही एक चळवळ होती. तिला १९३५ नंतर खऱ्या राजकीय पक्षांचे स्वरूप आले. १९३५ नंतर काँग्रेसने राजकीय पक्ष म्हणून अनेक राज्य प्रतिनिधी मंडळांच्या निवडणुका लढवून त्या जिंकून ब्रिटिश शासनाविरुद्ध आपले वर्चस्व सिद्ध करून दाखविले. पुढे १९४५ मध्ये काँग्रेसमधील साम्यवादी नेत्यांनी काँग्रेसवर भांडवलशहांच्या हातातील बाहुले असा शिक्का मारून काँग्रेसमधून बाहेर पडून आपल्या वेगळ्या साम्यवादी ( Communist ) पक्षाची स्थापना केली. तर स्वातंत्र्यानंतर लगेचच १९४८ मध्ये लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी समाजवादाच्या ध्येयपूर्तीसाठी समाजवादी पक्षाची स्थापना केली. त्या पक्षातूनही पुढे 'प्रजा-

समाजवादी' हा नवा पक्ष निर्माण झाला. १९५१ साली शामाप्रसाद मुखर्जींच्या नेतृत्वाने काही नेत्यांनी प्राचीन भारतीय संस्कृतीच्या प्रेमातून भारतीय जनसंघाची स्थापना केली.

**आदर्श पक्षांतर :**

ज्येष्ठ नेते सी. राजगोपालाचारी यांनी १९५९ मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडून वैचारिक पातळीवरून आपल्या 'स्वतंत्र पक्ष' या पक्षाची स्थापना केली. भारतीय लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी द्विपक्ष पद्धतीची निकड त्यांनाच प्रथमतः जाणली आणि काँग्रेसला पर्याय म्हणून आपला पक्ष काढला. परंतु दुर्दैवाने त्यांचे हे स्वप्न साकार होऊ शकले नाही.

वरील पक्षइतिहासावरून असे दिसून येईल की, खऱ्या काँग्रेस पक्षाशिवाय इतर पक्ष ही पक्षांतराची पिल्ले आहेत.

**इंदिरा राजवट : दलबदलूंची राजवट :**

१९६७ साली सत्ताधारी काँग्रेसचे बहुमत कमी झाले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी विविध राज्यांमध्ये पक्षांतराला प्रोत्साहन देऊन लोकशाहीविरोधी पायंडा पाडला. त्यावेळी ९५ नेत्यांनी पक्षांतरे केली. त्यातच पुढे १९६९ साली काँग्रेसमधील दोन प्रबळ गटांत संघर्ष माजून पक्षाचे विभाजन झाले. वृद्धांच्या गटाचे वर्चस्व संघटनेत होते. त्या गटाचे नेतृत्व स. का. पाटील, मोरारजी देसाई आणि कामराज यांच्याकडे होते तर पंतप्रधान इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील तरुणांच्या गटाचे संसद आणि राज्यविधी मंडळामध्ये बहुमत असल्याने केंद्र आणि राज्यसरकारे टिकली.

**यशवंतरावांची पक्षांतर कमिटी :**

१९६७ सालानंतरचा पक्षांतराचा कहर लक्षात घेऊन संसदेने १९६९ साली ना. यशवंतरावांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी ( समिती ) नेमली होती.

या कमिटीने काही शिफारशी सादर केल्या होत्या. त्या अशा :– ( १ ) पक्षांतरास बंदी घालावी, ( २ ) मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या कमी असावी, ( ३ ) पक्षांतर किंवा भ्रष्टाचार केल्यास प्रतिनिधींस परत बोलाविण्याचा अधिकार ( Recall ) जनतेकडे असावा, ( ४ ) राजकीय नेत्यांमध्ये राष्ट्रप्रेम, जनसेवेची वृत्ती आणि सदाचार असावा, ( ५ ) जनतेने योग्य अशा उमेदवारांनाच निवडून द्यावे.

परंतु यांपैकी एकही शिफारस अमलात येऊ शकली नाही. किंबहुना त्या कमिटीच्या अध्यक्षांनीही ती पाळली नाही. कारण यशवंतरावांनी स्वतःच आतापर्यंत तीन वेळा पक्षांतर केले आहे.

पुढे काँग्रेस ( Indicate ) हीच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ठरली. अशा प्रकारे पक्षांतराला राजमान्यता मिळून हेच नेते दिमाखाने मिरवू लागले. याच काँग्रेसने १९७१ च्या पाचव्या लोकसभेत प्रचंड बहुमत मिळवून निर्विवाद सत्ता काबीज केली.

काँग्रेसच्या आणीबाणीतील दडपशाहीला कंटाळून भारतीय लोकदल, भारतीय जनसंघ, समाजवादी आणि संघटना काँग्रेस या पक्षनेत्यांनी तुरुंगात असतानाच जनता पक्ष या नव्या राजकीय पक्षाची स्थापना करून १९७७ ची लोकसभा निवडणूक लढविली आणि जनता पक्ष सत्तेवर आला.

परंतु जनता पक्षाला जनतेने दिलेली मते ही त्या पक्षाच्या बाजूने नसून आणीबाणीच्या जाचाला कंटाळून आणीबाणीविरोधी अशा प्रकारची मते होती. या नकारात्मक मतदानामुळेच सत्ता प्राप्त झालेल्या जनता नेत्यांना ती सत्ता टिकविता आली नाही. जनता पक्षाने प्रारंभीचे सुमारे बारा महिने आदर्श अशा स्वरूपाचा कारभार केला. परंतु हाच त्यांचा जन्मसिद्ध हक्क असल्याने राष्ट्रहितापेक्षा गटांच्या हिताला आणि खुर्चीला महत्त्व देऊन दलबदलूंचे सम्राट चौधरी चरणसिंगांनी जनता पक्षातून पक्षांतर करून पंतप्रधानपद प्राप्त करून ते औट घटकेचे राजे बनले. या चरणसिंगांनी किमान ११ वेळा पक्षांतर केले आहे. त्यामुळेच त्यांना भारतीय लोकांनी Chair Sing किंवा[1] Master of Summer Sault या पदव्या बहाल केल्या आहेत. चरणसिंगांप्रमाणेच मधु लिमये, राजनारायण, जॉर्ज फर्नांडीस इत्यादी अनेक नेत्यांनी पक्षांतर करून जनता पक्षास अल्प मतात आणले.

इंदिरा गांधीनी आपल्या गनिमी काव्याने चरणसिंगांच्या हाती तुरी देऊन सत्ता प्राप्त करून घेतली. जानेवारी ८० मध्ये इंदिराजी सत्तेवर येताच सत्तांतरितांचा लोंढा काँग्रेसकडे लागला.

'किस्सा कुर्सीका' या चित्रपटाचे निर्माते अमृत नाहटा यांनी संजय गांधी विरुद्धची साक्ष बदलली आणि काँग्रेसचा ध्वज स्वीकारला. आणि हेच नाहटा पक्षांतर योग्य नाही असे म्हणतात, त्यांनी स्वतः तीनदा पक्ष बदलले आहेत.

भारतीय राजकीय नेते जितके भ्रष्टाचारी तितकेच चतुर आहेत. इंदिरा लाटेनंतर अनेक ज्येष्ठ नेत्यांनी वेगवेगळ्या विचारांनी पक्षांतरे केली. काहींना इंदिराजींच्या

ठिकाणी साक्षात देवता दिसली, तर काहींच्या मते इंदिराजींना पर्याय नाही, त्याच या देशाच्या आधारस्तंभ आहेत. त्यामुळेच हरयाणाचे मुख्यमंत्री भजनलाल राज्याच्या प्रगतीसाठी ( स्वतःची खुर्ची टिकविण्यासाठी ) इंदिराजींच्या भजनी लागले.

हीच पक्षांतराची लाट आज महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर आलेली आहे. महाराष्ट्रातील सर्वांत मोठा विरोधी पक्ष असणाऱ्या काँग्रेस ( एस ) या पक्षाचे ९० टक्के कार्यकर्ते त्यांचे नेते यशवंतराव चव्हाण यांच्या आवाहनाला साद देऊन काँग्रेसमध्ये दाखल झाले आहेत.

या पक्षांतरितांचे आधारस्तंभ असणाऱ्या यशवंतरावांची अवस्था मात्र त्रिशंकूसारखी झाली आहे. पक्षांतरासाठी त्यांनी नवी शक्कल लढविली आहे. त्यांच्या मते काँग्रेसमध्ये जाणे हे पक्षांतर नाही. कारण आयुष्यभर काँग्रसच्या ( जीवावरच त्यांनी सत्ता भोगली) साठीच तनमनधन खर्च करून त्यांनी कार्य केले असल्याने ते सदैव काँग्रेसजनच आहेत. परंतु काँग्रेस ( इंदिरा ), काँग्रेस ( अरस, रेड्डी, स्वर्णसिंग किंवा शरद ) हे वेगवेगळे राजकीय पक्ष आहेत. त्यामुळे पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणे स्वगृही परतणे नव्हे तर ते पक्षांतरच आहे. यशवंतराव मात्र नेहमीच आपल्या लबाडीला सुद्धा विचारांचा मुलामा देऊन स्वसमर्थन करण्यात पटाईत आहेत.

### पक्षांतराचे दुष्परिणाम :

पक्षांतर हा भारतीय लोकशाहीचा कॅन्सर या शीर्षकातूनच पक्षांतराचे दुष्परिणाम किती भयंकर आहेत याची कल्पना येऊ शकेल. पक्षांतरे अशीच चालू राहिल्यास लोकशाहीला धोका पोहोचण्याची शक्यता आहे.

(१) प्रतिनिधींची जनतेशी बांधीलकी न राहाता, सत्तेशी बांधीलकी राहते. पक्षांतर करून जनतेने, जनतेच्या कल्याणासाठी निवडून दिलेले प्रतिनिधी जनतेशी द्रोह करतात. कारण अनेकदा व्यक्ती न पाहता पक्ष पाहून मतदान केले जाते. ज्यावेळी तो प्रतिनिधी पक्षत्याग करतो तेव्हा तो मतदारांच्या भावना, तत्त्वे विचारात घेत नाही. केवळ स्वार्थ, अधिकारप्राप्ती, द्रव्यप्राप्ती याला जास्त महत्त्व दिले जाते. आणि लोकशाहीतील लोकांचे राज्य या मूलभूत विचाराला फाटा देऊन जनतेशी असणारी बांधीलकी तोडली जाते. त्यातूनच हुकूमशाही वृत्तीची वाढ होते.

( २ ) व्यक्तीच्या कर्तृत्वापेक्षा तिच्या गटाला महत्त्व :- पक्षांतरे घडवून अनेकदा स्थिर असणारी सरकारे कोसळविण्याचा डावसुद्धा असू शकतो. अशा वेळी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात येणाऱ्या नेत्याची पात्रता, कर्तृत्व यापेक्षा त्याचे पाठीमागे किती आमदार, किती खासदार आहेत याला महत्त्व येते. त्यामुळे खऱ्याखुऱ्या विद्वान जनसेवक आणि कर्तृत्ववान नेत्यांना अधिकारपदे न मिळता गुंड, गटबाज आणि हुकूमशाही वृत्तीच्या नेत्यांनाच महत्त्व मिळते. त्यामुळेच पाठीराख्यांची बोगस यादी दाखवून चरणसिंगासारखे पुढारी सर्वोच्च स्थानावर विराजमान होतात.

( ३ ) अस्थिर शासन – पक्षांतराच्या सहाय्याने सत्तेवर आलेले शासन हे स्थिर राहू शकत नाही कारण अशा सरकारांमध्ये भिन्न विचारांचे नेतृत्व असते, त्यांच्यात सामूहिक शिस्तीचा अभाव असतो. त्यांची तत्त्वे, कार्यक्रम आणि कृती भिन्नभिन्न असतात. फक्त सत्ता उपभोगल्याच्या एकाच ध्येयाने ते एकत्र आलेले असतात. त्यामुळे जेव्हा तत्त्वांचा किंवा ठोस कृतीचा प्रश्न येतो तेव्हा त्यांच्यातील एकता दुभंगते आणि शासन अस्थिर बनते.

या कारणावरूनच मोरारजी आणि चरणसिंगाचे शासन कोसळले.

( ४ ) ध्येयधोरणातील असातत्य :- पक्षांतरामुळे एक सरकार जाऊन दुसरे सरकार येते त्यामुळेच पहिल्या सरकारचे धोरण, किंवा तत्त्वे बदलली जातात. अशा लवचिक किंवा सतत बदलणाऱ्या धोरणांचा देशाच्या परराष्ट्रीय किंवा देशांतर्गत धोरणावरही दुष्परिणाम होतो.

( ५ ) अपरिपक्व प्रशासक :- विशिष्ट राजकीय पक्षांमध्ये विभिन्न धार्मिक, जातीय, प्रादेशिक किंवा राजकीय गटांचे नेते असतात. सर्वांना समान प्रतिनिधित्व देण्यासाठी अशा नेत्यांचे कर्तृत्व, बुद्धी यापेक्षा गटबाजीला महत्त्व देऊन पदाचे वाटप होते, अन्यथा असे गटबाज लोक नेतृत्वाविरुद्ध बंड पुकारतात, गटबाजीमुळे अनेक अननुभवी, कमी शिक्षित, कर्तृत्वशून्य किंवा भ्रष्ट किंवा राजकारण्यांच्या हाती सत्ता जाते. त्यामुळे भ्रष्टाचारास उत्तेजन मिळते.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. अंतुले यांनी पक्षांतरास प्रोत्साहन देण्याचे कारण सत्ता टिकविण्यामध्येच आहे.

( ६ ) जनतेचा प्रतिनिधी आणि शासनावरील विश्वास उडतो. जनतेने विशिष्ट कालासाठी विशिष्ट पक्षाच्या प्रतिनिधींना काही अपेक्षेने निवडून दिलेले असते. परंतु हे नेते जेव्हा आपापसांत भांडत राहतात, जनतेच्या पैशाचा दुरुप-

योग करतात किंवा पक्षबदल करून निष्ठा विकतात तेव्हा अशा नेत्यांवर आणि त्यांच्या सरकारवर सामान्य माणसाचा विश्वास राहात नाही.

याची प्रचिती १९८० साली आली आहे. जनता नेत्यांच्या भांडणाला आणि पक्षांतराला कंटाळून जनतेने इंदिरा काँग्रेसला निवडून दिले.

परंतु जेव्हा सनदशीर मार्गाने जनतेचे हेतू साध्य होत नाहीत तेव्हा जनता हिंसक किंवा क्रांतिकारक मार्गाचा अवलंब करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**पक्षांतर थांबविण्याचे उपाय :**

पक्षांतरासारखे लोकशाहीस काळिमा फासणारे प्रकार पुढील उपाय योजून थांबविता येतील.

( १ ) पक्षांतर बंदी कायदा :– दलबदलू राजकारणास आळा घालण्याचा हा कायदेशीर उपाय आहे. दलबदलू राजकारणाचा भारतीय जनतेस उबग आला असल्याने या कायद्यासाठी लोकमत तयार आहे. परंतु राजकीय नेते स्वार्थासाठी याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

वास्तविक भारतातील सध्याची परिस्थिती अशी आहे की, सारी सत्ता आणि राज्यघटना पंतप्रधान इंदिरा गांधींच्या हातात आहे. राष्ट्राध्यक्षांना त्यांनी रबरी शिक्के बनविले आहे. भारतीय घटनेतील ३९ वी घटना दुरुस्ती याच इंदिराजींनी अवघ्या ७ दिवसांत घडवू आणली. त्यावेळी त्यांना कसलीही अडचण आली नाही. मग पक्षांतरबंदीचा कायदा त्या का पास करू इच्छीत नाहीत ? हा खरा प्रश्न आहे. या ठिकाणी त्यांना पक्षांतराला उत्तेजन देऊन विरोधी पक्ष शक्तिहीन करून स्वतःची अनिर्बंध सत्ता गाजवायची आहे.

त्यामुळे पक्षांतरबंदीकायदा नजीकच्या काळात येण्याची शक्यता फारच कमी आहे. आणि जरी असा कायदा पास झाला तरी त्याला काही मर्यादा आहेत. या कायद्यामुळे फक्त केंद्रीय आणि राज्यविधिमंडळातील प्रतिनिधींना सत्तेवर असताना पक्षांतर करता येणार नाही. परंतु विधिमंडळात नसलेले अनेक राजकीय आणि सहकारी नेत्यांनी पक्षांतराची मोकळीक असल्याने एकूण पक्षांतराला आळा बसणार नाही.

( २ ) नैतिक मूल्यांचे आचरणः– समाजातील इतर क्षेत्रात ज्याप्रमाणे नैतिक मूल्यांना स्थान आहे त्याप्रमाणच राजकारणासारख्या सत्तेच्या खेळातही काही नैतिक मूल्ये स्थिर झाली पाहिजेत. कारण जे कायदा करू शकत नाही ते नैतिकता करू शकते. राजकीय पक्षांची तत्त्वज्ञाने स्थिर असावीत, परंतु भारतातील सर्व राजकीय पक्षांची तत्त्वज्ञाने एकाच साच्यातील आहेत. विशिष्ट तत्त्वाशी बद्ध राहून राजकीय नेत्यांनी निःस्वार्थीपणे कार्य केले पाहिजे. राजकीय नेत्यांनी स्वतः होऊन काही पथ्ये पाळावीत की जेणेकरून राजकारण हा गुंडांचा खेळ न ठरता खऱ्या समाजसेवकांचा प्रांत बनेल आणि लोकांचे राज्य येईल.

( ३ ) प्रभावी लोकमताची आवश्यकता:– जागृत किंवा प्रभावी लोकमत हा लोकशाहीचा मूलभूत पाया आहे. जागृत लोकमताशिवाय लोकशाही ही आभासात्मक असते. तिच्या नावाखाली हुकूमशाही कृत्ये घडतात. अशी आभासात्मक लोकशाही आज भारतात आहे. त्यामुळे पक्षांतरासारखे अयोग्य धंदे येथे चालतात. या लोकशाहीच्या रक्षणासाठी लोकमत जागृत बनविण्याच्या कामी निःस्वार्थी राजकारणी आणि विचारवंत यांनी पुढे आले पाहिजे. आणि लोकशिक्षणातून लोकजागृती घडवून लोकांना स्वतंत्र विचारांची प्रेरणा दिली पाहिजे.

जेव्हा या देशातील सामान्य माणूस जागा होईल तेव्हाच पक्षांतर, भ्रष्टाचार यांसारखे लोकशाहीविरोधी प्रकार थांबतील आणि तेव्हाच महात्माजींच्या स्वप्नातील रामराज्य साकार होईल.

# आजकालचे धर्मांतर

**रामचंद्र पाटील,** तृतीय वर्ष वाणिज्य

( क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठान, कोल्हापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या निबंधस्पर्धेतील तृतीय क्रमांकाचा पारितोषिकप्राप्त निबंध )

दुसऱ्या महायुद्धापूर्वी समाजशास्त्रज्ञ चीनसंबंधी म्हणत असत की चिनी ड्रॅगन जागा झाला तर तो साऱ्या जगाला हादरवून सोडेल. भारतासंबंधी पाश्चात्य समाजशास्त्रज्ञांची हीच धारणा आहे. भारत गेली हजार वर्षे औद्योगिकदृष्ट्या मागास असला, तसेच वर्ण–जातीसारख्या अनेक समस्यांनी वेढलेला असला तरी त्याची सुप्त शक्ती जागृत झाल्यास तो जगावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करेल अशी भीती त्यांना वाटते. म्हणूनच हे विराट राष्ट्र वेगवेगळ्या संकल्पनांच्या आधारे विघटित कसे करता येईल, या हेतूने त्याच्या विविधतेचा फायदा घेऊन कमकुवत, परावलंबी छोट्या राष्ट्रांची साखळी भारतीय उपखंडात निर्माण करण्याचा महाशक्तींचा प्रयत्न आहे.

हिंदुत्व हा भारताचा आत्मा आहे. हा आत्माच गुदमरवून कसा टाकता येईल? नष्ट कसा करता येईल? किमान हिंदूंची संख्या कमी कशी करता येईल? हाच त्यांचा दृष्टिकोन राहिला. त्यातूनच हिंदू समाजातील कमकुवत घटकांचे सर्व मल्याबुऱ्या मार्गांनी धर्मांतर व नंतर राष्ट्रांतर हे त्यांचे सूत्र राहील.

१९५६ मध्ये नागपूरला डॉ. आंबेडकरांनी ३ लाख अनुयायांसह बौद्ध धर्मात प्रवेश केला. त्यावेळी देशात फारशी खळबळ माजली नाही. धनंजय कीर यांनी आपल्या आंबेडकर चरित्रात म्हटले आहे 'प्रमुख नेते आणि विचारवंत यांनी आंबेडकरांच्या बौद्ध धर्मस्वीकाराकडे दुर्लक्ष केले'. बौद्ध धर्म हा व्यापक हिंदुत्वाच्या, हिंदुधर्माच्या व्याख्येत बसणारा एक पंथ आहे अशी आपली सर्वसाधारण समजूत आहे. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरप्रसंगी नागपूरला उपस्थित असणाऱ्या बौद्धपंडितांनी अशाच अर्थाचे मतप्रकटन केले आहे. महास्थविर चंद्रमणी आणि इतर भिक्षू यांनी आंबेडकरांच्या धर्मांतराच्या दीक्षा समारंभाच्यावेळी जे पत्रक प्रसिद्ध केले होते त्यात हिंदूधर्म आणि बौद्ध धर्म ह्या एकाच वृक्षाच्या फांद्या आहेत असे म्हटले होते. म्हणून हरिजनांचे बौद्ध होणे आपण धर्मांतर मानले नाही, पंथांतर मानले. नेहरूंनी एका ठिकाणी म्हटले आहे, 'हिंदुधर्माच्या उदरात एक तेजस्वी विश्ववाद आहे. निरनिराळ्या व परस्परविरोधी विचारांचा समावेश करण्याएवढा हिंदुधर्म विशाल आहे. यापूर्वी हिंदुधर्माने मोठी स्थित्यंतरे पचविली आहेत. बौद्ध धर्म जन्माला आल्यावर हिंदुधर्माने त्याच्याशी स्पर्धा केली नाही. त्याला शोषून घेतले परंतु मुस्लिम किंवा ख्रिश्चन झाल्यावर मात्र तो भिन्न परंपरेचा अभिमानी होतो व त्याचे राष्ट्रीयत्व संपते.

हरिजन धर्मांतर करण्यास का उद्युक्त झाले ते आपण पाहू. सामूहिक धर्मांतर करण्यासाठी हरिजनांना प्रलोभने दाखविण्यात आली असे म्हटले जाते. परंतु काही हरिजनांनी स्वेच्छेनेही धर्मांतर केले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण हरिजनांना आजपर्यंत सवर्ण हिंदुंकडून अन्यायाचीच वागणूक मिळाली हे एक कटू सत्य आहे. तसे अस्पृश्यतेसारख्या वाईट प्रथांमुळे हिंदु समाजाचा एक घटक नेहमीच बाजूला राहिला. अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे हे कोणीही मान्य करेल. शहरात आता अस्पृश्यता फारशी जाणवत नाही. परंतु खेड्यात मात्र अजूनही अस्पृश्यता पाळली जाते ही वस्तुस्थिती आहे. साताऱ्यात शंकराचार्यांनी चातुर्वर्ण्याचा पुरस्कार केला. सध्याच्या काळात चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणे योग्य नव्हते.

या सर्व परिस्थितीला राजकीय नेतेसुद्धा जबाबदार आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. कारण स्वातंत्र्यलढ्यापासून त्यांनी वस्तुस्थितीकडे डोळेझाक केली. परमेश्वर आणि परमेश्वरप्राप्तीचा मार्ग ही वैयक्तिक बाब राहावी. त्यामुळे या देशातील वेगवेगळ्या धर्मसमूहाने

परस्परांशी शत्रुत्व करण्याचे कारण नाही. ही आदर्श स्थिती झाली. परंतु या आदर्श स्थितीकडे राजकीय नेत्यांनी जाणूनबुजून दुर्लक्ष केले. एकीकडे सामाजिक विषमतेचे चटके बसत असतानाच आर्थिक दुर्दशेच्याही झळा हरिजनांची ससेहोलपट करीत आहेत. त्याचाच गैरफायदा घेण्याची संधी मुस्लिम-खिश्चनांमधील धर्मांध वर्गाला मिळाली. पाच पंचवार्षिक योजना राबवूनही शासनाला हरिजनांची गरिबी हटवता आली नाही.

लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या तत्त्वांचे आपण पुरस्कर्ते असल्याचा दावा राज्यकर्ते करतात. ही तत्त्वे हिंदूंची बहुसंख्या असेल तरच अबाधित राहणार आहेत. आज शेजारच्या पाकिस्तानपासून दूरच्या मुस्लिम धर्माधिष्ठित देशांमध्ये लोकशाहीची केवढी विटंबना चालू आहे हे सर्वांसमोर आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतात सुसंस्कृत, लोकशाही मानणारा समाज दिसतो. त्याला धर्मांतराने हादरा बसणार आहे. म्हणूनच धर्मांतराचे संकट सर्वदूर पसरू नये अशी भूमिका राज्यकर्त्यांनी जाहीरपणे मांडणे आवश्यक आहे.

आपण स्वतः धर्म मानला किंवा नाही मानला तरी लोकशाहीमध्ये संख्येच्या गणिताला फार महत्त्व असते. ही गोष्ट धर्मनिरपेक्ष लोकांनाही विसरता येत नाही. मुसलमानांची संख्या जर प्रमाणाबाहेर वाढली तर या देशात पाकिस्ताने निर्माण होतील हा धोका सेक्युलरवाद्यांनीही ओळखला आहे. भारतामध्ये तसा धोका आसाममध्ये निर्माण झाला आहे. केरळमध्येही तशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. मुसलमानांची संख्या प्रमाणाबाहेर वाढल्यास ते भाग भारतातून फुटून निघतील. हा धोका सर्वांनीच ओळखायला हवा.

हरिजनांचे सामूहिक धर्मांतर राष्ट्रांतर ठरेल असे का म्हटले जाते ते आपण पाहू. राष्ट्रसेवा दल पत्रिकेच्या १९६७ च्या दिवाळी अंकात हमीद दलवाई यांचा 'भारतीय मुसलमानांचे अंतरंग' या नावाचा एक लेख आहे. या लेखात व त्यानंतर अनेक व्याख्यानांतून हमीद दलवाईंनी मुसलमानांच्या पाकिस्तान-धार्जिणेपणाची जाणीव आपल्याला करून दिलेली आहे. या लेखात त्यांनी म्हटले आहे, 'अलिगड विश्वविद्यालयाच्या एका प्राध्यापकाने माझ्याशी बोलताना क्युबेकमधील वाढलेल्या फ्रेंच लोकसंख्येचे उदाहरण देऊन भारतातील मुसलमानांनाही क्युबेकमधील फ्रेंचांप्रमाणे आपल्याला भारतात आणखी एक स्वतंत्र भूमी निर्माण करता येईल!' असे उद्गार काढले. हे उद्गार मुस्लिम मनोवृत्तीचे यथार्थ दर्शन घडवितात. दहापैकी नऊ मुसलमानांच्या मनात अशा प्रकारची आणखी पाकिस्ताने निर्माण करण्याची भावना असते असेही या लेखात हमीद दलवाईंनी म्हटले आहे. ही वस्तुस्थिती असल्याने मीनाक्षीपूरमचे धर्मांतर हे राष्ट्रांतर ठरते. १९ फेब्रुवारी १९८१ रोजी तामीळनाडूच्या तिरुनेलवेली जिल्ह्यातील मीनाक्षीपूरम गावच्या १४३ दलित कुटुंबांनी हिंदु धर्माचा त्याग करून इस्लाम धर्माचा स्वीकार केला हे सर्वांना माहीतच आहे.

धर्मांतरामुळे हरिजनांचे प्रश्न सुटणार नाहीत असे वाटते. उलट त्यामुळे धर्मांतर केलेल्यांच्यासमोर अनेक समस्या उभ्या राहतील. कारण धर्मांतर ही केवळ सूडाची एक प्रतिक्रिया आहे. तो सामाजिक दोषनिवारणाचा पर्याय नाही. धर्मांतरामुळे हरिजनांचा प्रश्न सुटणार तर नाहीच परंतु सामाजिक संतुलन मात्र बिघडेल. इस्लाम धर्मातही भरपूर विषमता आहे. त्यामुळे समतेच्या अपेक्षेने जे हरिजन दलित या धर्मात जातील त्यांचा भ्रमनिरास होण्याची शक्यता अधिक आहे. इस्लाम धर्मात शिया, सुन्नी, शेख, सय्यद, मोगल, पठाण हे सर्व उच्चवर्णीय जमातीचे आहेत. ते स्वतःला उच्चवर्णीयच समजतात. शिया ही जमात अगदी वेगळी जमात आहे. त्यांची राहणीही वेगळी आहे. सुन्नी मुसलमान ही जमात मागाहून मुसलमान झालेली आहे असे मुसलमान समाजात सांगितले जाते. या दोन्ही जमातींत कसलेच ऐक्य नाही. छोट्या-छोट्या गावीसुद्धा शेख, सय्यद, तांबोळी, पिंजारी, बागवान, मेमन, खोजा, खाटीक, कसाई, धावड अशा जाती आहेत. धावड समाजाची मशीद वेगळी असते. या जातीजातींत लग्ने होत नाहीत. बिहारमध्ये हरिजन-मुस्लिम ही एक जात आहे. त्यामुळे इस्लामचा स्वीकार केल्यामुळे हरिजनांचा सामाजिक दर्जा कसा काय सुधारणार? ज्या कुराणाने गुलामगिरी ही संस्था मान्य केली आहे तो धर्मग्रंथ समतावादी कसा मानायचा? तामीळनाडूच्या समनाड जिल्ह्यातील इलमनूर गावात नुकताच इस्लाम धर्माचा स्वीकार केलेल्या लोकांबरोबर खानदानी मुसलमान एका मशिदीत नमाज पढायलाही तयार नाहीत असे ११ ऑगस्ट १९८१ च्या 'इंडियन एक्स्प्रेस' मधील बातमीवरून स्पष्ट दिसून येते. धर्मांतर केल्याने

कणखरपणा येत नाही हे दलितांनी लक्षात घेतले पाहिजे.

हरिजन पुरुषांनी सूडाच्या भरात घेतलेल्या धर्मांतराच्या निर्णयाने हरिजन स्त्रिया कोणते संकट ओढवून घेणार आहेत याची तरी त्यांना कल्पना आहे का ? मीनाक्षीपूरमला धर्मांतरित झालेल्या स्त्रियांना लगेच बुरखे पुरविण्यात आले. पैगंबरांनी-सुद्धा स्त्रियांना कनिष्ठ दर्जाचेच मानले. इराणमध्ये खोमेनी धर्माच्या नावाखाली काय करत आहेत ? पाकिस्तानमध्येही महिलांच्या आवाजाला रेडिओवर बंदी घालण्यात आली आहे. पाकिस्तान महिला हॉकी संघ धर्मगुरूंच्या धमकीने परदेशी पाठवू शकत नाही. तर इकडे महाराष्ट्रात अकोला जळगावमध्ये मुस्लिम महिलांना सिनेमा पाहण्यास प्रतिबंध करण्यात येतो. या सर्व बाबी समानतेच्या निदर्शक आहेत का ?

हिंदु-धर्मात अन्याय झाले तर त्याविरुद्ध सुधारक बोलू तरी शकतात, पण कुराणातील दोषांवर टीका करण्याचे धाडस कोणी मुसलमान करू शकेल असे वाटत नाही. ज्या देशामध्ये इस्लाम प्रभावी आहे तिथे व्यक्तिस्वातंत्र्य, धर्म-स्वातंत्र्य यांची नामोनिशाणी राहिली आहे का ?

धर्मांतराने आपले प्रश्न सुटणार नाहीत असे सांगणारे हरिजन नेतेही पुढे येऊ लागले आहेत. माणसातील विषमता नाहीशी करून माणसाला माणुसकीने वागणे शिकविण्यास धर्मसंस्था अपुरी पडते. आज धर्मव्यवस्थेने शोषणव्यवस्थेचे स्वरूप घेतले आहे असे आपल्याला म्हणता येईल. त्यामुळे मुस्लिम, खिश्चन, बौद्ध होऊन दलितांचे प्रश्न सुटणार नाहीत.

काहींना असे वाटते की कायद्याने धर्मांतराला बंदी घालण्याची आवश्यकता नाही. कारण कायद्याने प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्य दिले आहे. तसेच प्रचलित कायद्यांची नीट अंमल-बजावणी झाली तरी सक्तीने, धाकदपटशाने होणारे धर्मांतर थांबविता येईल. परंतु काहींच्या मते असा कायदा होणे आवश्यक आहे. कारण सामूहिक धर्मांतर आपल्या संविधानात संमत ठरत नाही. संविधानाच्या पंचविसाव्या कलमाने कुणाही नागरिकाला आपल्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून कोणताही धर्म स्वीकारण्याचे तसेच त्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे आणि या धर्माचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. पण कुणाही व्यक्तीला अन्य कुणा-लाही बाटविण्याचे स्वातंत्र्य दिलेले नाही. सदसद्विवेकी बुद्धी हा शब्द एकवचनात वापरण्यात आला आहे. म्हणजेच सामूहिक धर्मांतर घटनेने संमत ठरविले नाही. मध्य प्रदेश, ओरिसा व अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या सरकारांनी धर्मांतरविरोधी कायदे केले. नंतर सर्वोच्च न्यायालयाने हे कायदे संविधानाच्या दृष्टीने वैध ठरविले म्हणूनच केंद्र सरकारने धर्मांतरविरोधी कायदा करावा असे काहींना वाटते.

मुस्लिम धर्मातही अनेक सुज्ञ व्यक्ती अशा असतील की ज्यांना अशा तऱ्हेने होणारे धर्मांतर पसंत नसेल. अशांची मदत घेऊन ही मीनाक्षीपूरमची लाट थोपवता आली तर नेहमीचा हिंदु-मुस्लिम कटुतेचा प्रश्नही उद्‌भवणार नाही. हिंदु-मुस्लिम-खिस्ती या सर्व धर्मातील सुज्ञ व विवेकी मंडळींनी राष्ट्रवादी दृष्टीकोणातून संयुक्तपणे असा प्रयत्न करणे केव्हाही श्रेयस्कर ठरेल.

भगवान परशुराम, आद्यश्री शंकराचार्य, चैतन्य महाप्रभु, आद्य मध्वाचार्य यांनी आपल्या कार्याने भारतीय समाज एकसंघ, सुसंघटित आणि सामर्थ्यसंपन्न व्हावा असा प्रयत्न केला. सामाजिक ऐक्याचे सूत्र बदलत्या काळातही बळकट राहील अशी शिकवण या महापुरुषांनी आपल्या आचारातून दिली. आजही निरनिराळ्या पीठांचे शंकराचार्य विविध मठाधीश यांनी समाजाला ऐक्याची प्रेरणा दिली पाहिजे. तसेच समाजाच्या विविध घटकांत समानतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न सर्व पीठांच्या शंकराचार्यांनी केला पाहिजे. विश्व-हिंदु परिषद, हिंदू एकता मंच यासारख्या संस्था परिणामकारक कार्य करू शकतील.

गरीब, मागासलेल्या समाज बांधवांच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी योजनापूर्वक परिश्रम केले गेले पाहिजेत. धर्मांतराच्या कार्यासाठी भारतात परदेशातून येणारा प्रचंड पैसा सरकारने थोपविला पाहिजे. यासाठी सर्वांनी एकत्रित-रित्या सरकारवर दबाव आणला पाहिजे. इतर कायदे सर्व धर्मांच्या लोकांसाठी एकाच पद्धतीने लावून त्यांची सर्वत्र सारखी अंमलबजावणी होते आहे, याकडे जागरूकतेने लक्ष पुरविले पाहिजे.

धर्मांतराचा प्रश्न सोडविण्यासाठी मनाची ताकद हवी. जीवनाकडे मानवी मूल्यांच्या दृष्टिकोणातून पाहायला हवे. धर्माच्या आश्रयाने समाजात सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा मिळ-विण्याचा प्रयत्न झाला म्हणूनच समाजाला बांधील जीवना-तून मुक्त करून त्याचा नैतिकतेशी संबंध जोडला पाहिजे. तसेच हिंदू समाजाला खऱ्या अर्थाने एकता हवी असेल तर

त्यांनी पारंपरिकता सोडली पाहिजे. इस्लाम धर्मात गुलामगिरी, मानवी स्वातंत्र्याची गळचेपी आहे. तेव्हा धर्मांतर करताना दुसऱ्या खोड्यात का पडता हेही सांगितले गेले पाहिजे.

आपल्या देशाच्या परंपरेपैकी कोणते ग्राह्य आहे, कोणते त्याज्य आहे याचा विचार केला पाहिजे. सदैव आपल्या परंपरांवर हल्ले करणे योग्य नाही. तसेच ' जुने ते सोने ' असे म्हणून सर्व परंपरांना चिकटून बसणेही श्रेयस्कर ठरणार नाही. हिंदु-धर्माची वैचारिक बैठक बदलली पाहिजे व वास्तवाशी सुसंगत असलेल्या हिंदुधर्माची पुनर्रचना केली पाहिजे.

राखीव जागांच्या सरकारी धोरणाला सर्वांनी पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे. आपल्या घरगुती वैयक्तिक जीवनातूनही एकात्मतेचा प्रत्यय आला पाहिजे. आपल्या मित्रपरिवारांमध्ये, आपल्या ग्रंथसंपदेत, आपल्या घरांतल्या तसबिरींमधून एकात्मतेची प्रतिबिंबे उमटली पाहिजेत.

आपल्या देशातील गरिबी, विषमता, अस्पृश्यता इत्यादी समस्या लवकरात लवकर सोडविल्या पाहिजेत. सर्व पक्षांनी आणि संस्थांनी एकत्र येऊन समान धोरण ठरविले पाहिजे. सर्वांच्या संघटित प्रयत्नानेच या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. मीनाक्षीपुरम येथील धर्मांतरामुळे आपल्या समाजात खळबळ माजली आहे. यातून जर काही मूलगामी सुधारणा समाजात घडून आल्या तर वाइटातूनही काही चांगले घडू शकते, याचा आपणा सर्वांना अनुभव येईल.

दलित समाजातून पुढे आलेल्या लढाऊ वृत्तीच्या युवकांनी हिंदु-धर्माच्या रक्षणाची व सुधारणेची जबाबदारी घेतली तर त्याचा अधिक उपयोग होणार आहे. त्यांच्याच प्रयत्नाने धर्मांतराची लाट थोपविली जाईल. सवर्ण हिंदूंनी इतरांवर दोषारोप करण्यापेक्षा मूळ प्रश्नाचे योग्य मूल्यमापन केले पाहिजे. वर्णव्यवस्थेने हिंदुधर्म मोडकळीस आला आहे हे विधान खरे आहे. धर्म व कर्मानुसार अस्तित्वात आलेली वर्णव्यवस्था यांत फरक आहे. दुर्दैवाने वर्णव्यवस्थेचे प्राबल्य वाढून उच्चनीच भेदभाव निर्माण झाला व अस्पृश्यतेचा कलंक पवित्र वैदिक धर्माला चिकटून बसला. हा कलंक नाहीसा करून मानवजातीच्या कल्याणासाठी वैदिक धर्मातील चिरंतन तत्त्वे पुन्हा प्रस्थापित करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. दलितांनीसुद्धा आपले नेतृत्व पारखून घेतले पाहिजे. केवळ प्रलोभनांना भाळणाऱ्या व सत्तेसाठी हपापलेल्या नेतृत्वापासून सावध राहिले पाहिजे. माणसासाठी धर्म आहे, धर्मासाठी माणूस नाही हे विसरून चालणार नाही.

केरळमधील ' इलावा, ' या अस्पृश्य जमातीने श्री. नारायण गुरू यांच्या प्रेरणेने मुस्लिम व ख्रिश्चन लोकांच्या आक्रमणापासून हिंदुधर्माचे रक्षण करण्याचा भार आपल्या शिरावर घेतला आहे. त्यामुळे भारतात सर्वत्र विखुरलेले हरिजन व सर्व जातीतील दलित तरुण या संकटाचा मुकाबला करतील अशी लक्षणे दिसू लागली आहेत. म्हणूनच निष्कारण घबराट न माजवता शांत चित्ताने व दृढपणे या आपत्तीला सामोरे जाणे योग्य ठरणार आहे. म्हणूनच कोणाला काहीही वाटले तरी धर्मांतराचा हा प्रश्न हिंदूंच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे असे मला वाटते. म्हणूनच हिंदूंनी सावध भूमिका घेणे ही आजची गरज आहे.

◆ ◆ ◆

# "G" बदलला तर !

**संजीवनी संत**, बारावी शास्त्र

परवाचीच गोष्ट ! L. R. मध्ये बसले होते पेपर वाचीत. कधी नव्हे ते इंग्रजी पेपर वाचायची हुक्की आली. 'झट मँगनी पट् ब्याह' प्रमाणे लगेच 'Times of India' उचलला आणि केली वाचायला सुरुवात. पहिलंच title वाचलं, "The changing conceptes of "G". मग तेवढा पॅराग्राफ वाचून पूर्ण केला आणि माझ्या मनात एकच विचारचक्र सुरू झाले.

खरंच ! 'G' च जर बदलला तर काय होईल ? आधीची किंमत आहे. ९·८ आणि आता ती झाली. ६·६७२ म्हणजे आता ती हळूहळू कमी होऊ लागलीय. पण जेव्हा "G=0" होईल तेव्हा ?....

मज्जाच मजा होईल. आपण रस्त्यावर चालण्याऐवजी हवेतच तरंगत जाऊ. कारण पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण नाहीसे झालेले असणार ! आपल्या काल्पनिक इच्छा अस्तित्वात उतरतील. मला तर बुवा खूपच आनंद होईल. कल्पनेनेच किती बरं वाटतंय ! चालण्याचा मुळी त्रासच नको. पक्ष्यांसारखी हवेतून सफर करायची. मग फळे घ्यायला मंडईत जायला नको. कारण झाडाची फळे सहज काढता येतील, फक्त आपण तिथपर्यंत जायचं !

कोणतीच वस्तू जिथल्या तिथं राहणार नाही. टेबल्स, खुर्च्या, पलंग, गॅस, बाद्या, स्टोव्ह, पुस्तकं साऽऽरं सारं काही हवेतच. चाललंय आपलं इकडून तिकडे. किती विनोदी होईल नाही दृश्य ? पातेली, डबे मुळी माळयावर राहणारच नाहीत. थोडक्यात, सर्व वस्तूंना कसं स्वातंत्र्य मिळाल्यासारखं होईल.

हे झालं आपलं रोजच्या व्यवहारातलं. पण........ PHYSICS संपूर्णपणे 'G' वर परावलंबी. त्याचं काय होईल ? सगळंच ताळतंत्र बिघडेल. अहो, प्रत्येक दोन steps नंतर जिथे त्याला 'G' ची प्रार्थना करावी लागते तिथे 'G' च नाहीसा झाला तर कसं होईल ?

रॉकेटस्, उपग्रह आकाशात सोडण्यासाठी जी ऊर्जा लागते तिचे calculation 'G' द्वारेच करण्यात येते. अर्थात गुरुत्वाकर्षणच जर नाहीसे झाले तर satellites चा प्रश्नच उद्भवणार नाही. म्हणजे या आधुनिक गतिमान युगात स्वतःच्या उन्नतीला मोठा अडथळा निर्माण होईल.

गुरुत्वाकर्षण जर नष्ट झाले तर आपल्याला एका प्रकारे उपयुक्तही ठरेल. रेल्वे, बसेस, रिक्षा यांची गरजच भासणार नाही. म्हणजे इंधनाची प्रचंड प्रमाणात बचत होईल. याचा वापर आपल्याला दुसऱ्या ठिकाणी करता येईल. अरे हो ! पण यापुढे बेकारी वाढेल नाही का ? मशिन्सच नकोत म्हणजे कामगारही नकोतच. मग त्यांनी काय हो धंदा करायचा ? हा प्रश्न सहजच डोळयांसमोर उभा राहणारा आहे.

'G' नाहीसा झाला म्हणजे कुठलीच वस्तू पृथ्वीकडे आकर्षित होणार नाही. अन् यामुळे उल्कापातासारखे संहारक प्रकार संपुष्टात येतील.

म्हणे, मंगळावरच्या तबकडया इथे येतात आणि आश्चर्यकारक धक्के देऊन जातात. त्यांनाही येथे येणे सहजच अशक्य होईल. आपण आपले पूर्णपणे स्वतंत्र राहू शकू.

गुरुत्वीय बलच जर हतबल झाले तर साऱ्या बिल्डिंग्ज सुद्धा इकडे तिकडे नाचायला लागतील. रोज कॉलेजला जायचं म्हणजे दोन तास आधी निघावं लागेल. रोज आपले नवीनच ठिकाणी कॉलेज ! वर्गातील बाकसुद्धा आपला स्थिरपणा सोडून अस्थिर बनतील. आणि पुन्हा घरी यायचं म्हणजे दोन तास ! नवीन वेळ न् नवीन ठिकाण ! मंडई, दुकाने, गिरण्या, शाळा सगळेच कुठे कुठे जायला सुरुवात करतील. आणि मग प्रत्येकाला शोधून काढायचं म्हणजे नाकेनऊ येईल.

उद्यानात किंवा पिक्चरला जावंसं वाटलं तरी ते शोधायचं म्हटल्यावर उत्साह पारच गळून जाईल. नाही म्हणजे नवीन नवीन तसं मजेशीर वाटेल पण नंतर मात्र इतका वैताग येईल की त्याची नुसती कल्पना सुद्धा नको !

कारखान्यांतील मशिन्स बाहेर पडतील. त्या अवाढव्य यंत्रांचा वाटेत सगळयांना अडथळा निर्माण होईल. आणि

हो! टकरींवर टकरी होत राहतील. इतक्या, की कोणी भेटलं की पहिला प्रश्न, "काहो, किती टेंगळं न् किती जखमा?"

त्यामुळे आता असं वाटायला लागलं की नको बुवा ती गम्मत! मजेपेक्षा सजाच अधिक! बरं आहे आत्ता आहे तेच! उपयोगापेक्षा दसपट तोटे माझ्यासमोर फर धरून नाचू लागले. मग माझं मीच मनाशी 'असं काही होणार नाही' म्हणून निश्चित केलं आणि फार मोठ्या महत्त्वाच्या कामगिरीतून सुटल्यासारखं मला वाटायला लागलं....उगाचच!

◇ ◇ ◇

# ही आपलीच करामत का?

**सी. एस्. चोळकर,** द्वि. व. साहित्य

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. यातून प्रथम समाज निर्माण झाला. नंतर एकात्मतेची भावना निर्माण होऊन छोटी गावे, शहरे निर्माण झाली. शहरांच्या किंवा गावांच्या स्थळांची निवड ऐतिहासिक किंवा भौगोलिक कारणांवर अवलंबून असते. तसेच त्यांची नावेसुद्धा याच पार्श्वभूमीवर आधारलेली असतात. अशा प्रकारच्या गावांच्या नावाची पार्श्वभूमी किती मनोरंजक असते हे खालील काही उदाहरणांवरून आपल्याला समजेल.

( १ ) देवगिरी :– देवगिरीचे राज्य करणारे यादवांचे घराणे फार मोठ होते. हे राजे स्वतःला श्रीकृष्णाचे वंशज मानीत. या ठिकाणी देवगिरीच्या किल्ल्यावरील देवस्थानाला लोक खूप मानीत म्हणून त्या गावाला देवगिरी हे नाव पडले.

( २ ) विजयनगर :– हरिहर, बुक्क हे दोघे प्रसिद्ध पराक्रमी भाऊ स्वतंत्र राज्य स्थापन करण्यासाठी योग्य ते गाव शोधत होते. चारी बाजूंनी नैसर्गिक संरक्षण असलेले 'हंपी' हे ठिकाण त्यांनी राजधानीसाठी निवडले, व स्वतंत्र राज्य इ. स. १३३६ साली स्थापन केले. म्हणून 'हंपी' या गावाला विजयनगर हे नाव मिळाले.

( ३ ) पैठण :– गोदावरी तीरावरील हल्लीच्या पैठणला पूर्वी 'प्रतिष्ठान' हे नाव होते. नंतर येथून पैठणी, शालू तसेच तलम कपड्यांचा व्यापार होत असे. येथील पैठण्या या जास्त लोकप्रिय होत्या म्हणून पैठण हे नाव पडले.

( ४ ) मुंबई :– मुंबादेवी वरून हे नाव पडले. नंतर इंग्रजांनी स्वतःच्या सोयीसाठी Bombay असे केले. परंतु दोन्ही नावे प्रचलित आहेत.

( ५ ) डेहराडून :– या गावाची भौगोलिक रचना नावाप्रमाणे आहे. डेरा = डोंगर व डून = दरी. दोन डोंगरांतील दरीत हे गाव वसलेले आहे म्हणून डेहराडून हे नाव पडले.

( ६ ) वडगाव :– येथे पूर्वी वडाची झाडे खूप असावीत म्हणून नाव पडले.

( ७ ) दारव्हे :– या गावात प्रत्येक दारात उंबराचे झाड आढळते. म्हणून दारव्हे नाव पडले असावे.

( ८ ) घोडनदी :– हे कोकणातील एक गाव आहे. या गावातल्या नदीवर पूर्वी घोड्यांना पाणी पाजले जाई. म्हणून या गावाला घोडनदी हे नाव पडले असावे.

( ९ ) केनिया :– केनिया या पर्वतावरून या प्रांताला केनिया हे नाव पडले.

( १० ) ब्लँटायर :– ही न्यासालँडची राजधानी आहे. न्यासा हे सरोवर व व्हिक्टोरिया फॉल्स हा जगविख्यात धबधबा लिव्हिंग्स्टनने शोधून काढले. त्याचे स्मारक म्हणून त्याच्या स्कॉटलंडमधील त्याच्या जन्मस्थानाचे ब्लँटायर हे नाव ह्या राजधानीला देण्यात आले.

( ११ ) ऱ्होडेशिया :– सेसिल् ऱ्होडस या गृहस्थाने प्रथम येथे वसाहत केली म्हणून या प्रांताला ऱ्होडेशिया असे नाव देण्यात आले.

( १२ ) जायरे :- आफ्रिकेतील विषुववृत्तानजीक उत्तरेकडच्या भागात हा देश आहे. याला हे नाव पडले कारण इथे वन्य प्रदेश खूप आहे.

( १३ ) तनजानिया :- हा प्रदेश पण आफ्रिका खंडात आहे. या प्रदेशात भरपूर प्रमाणात गवत आढळते म्हणून याला तनजानिया हे नाव पडले.

( १४ ) पाटणा :- ' कुसुमपूर ' हे पहिले नाव. नंतर बुद्धाचे निर्वाण झाल्यावर बिंबिसार राजाचा पणतू अशोक याने आपली राजधानी राजगृह नगरीहून यथे आणली. त्याच्या कित्येक पिढया होऊन गेल्या. नंतर पाटलीपुत्राची राजवट येथे खूप वर्ष होती म्हणून याला पाटलीपुत्र नाव पडले. पुढे इंग्रजांनी स्वतःच्या सोयीसाठी हे नाव बदलून पाटणा असे केले.

( १५ ) ' बोल्ड कोस्ट ' :-या प्रांतात नद्यांतील वाळूत सोने मिळत असे व हे सोने तिकडील लोक गोळा करून परदेशी व्यापाऱ्यांना विकत असत व त्याबद्दल काचेचे मणी घेत, म्हणून या प्रांतास गोल्ड कोस्ट असे नाव पडले.

( १६ ) गिनीचे आखात :- गोल्ड कोस्टमधील सोन्याच्या गिनी इंग्लंडमध्ये बनविल्या जात म्हणून ह्या जवळील आखातास हे गिनीचे आखात नाव पडले असावे.

( १७ ) फ्री टाऊन :- सिरालिऑनची राजधानी फ्रीटाऊन होय. गुलामगिरीतून मुक्त झालेल्या गुलामांच्या वसाहती आहेत. म्हणूनच याचे नाव ' फ्रीटाऊन ' स्वातंत्र्याचे शहर असे पडले आहे.

( १८ ) कायरो :- जुन्या फ्युरुट ह्या राजधानीच्या शहराजवळ नवीन राजधानी स्थापावयाची होती. हिंदी लोकांप्रमाणेच अरबी लोकही ग्रह, ज्योतिष वगैरेवर विश्वास ठेवणारे आहेत. त्याप्रमाणे मुहूर्त ठरला. परंतु मुहूर्त साधण्यापूर्वीच एक कावळा दोरीवर बसल्यामुळे मुहूर्त साधला नाही. पण त्यावेळी मंगळाचे अधिष्ठान होते. म्हणून नवीन शहराला या ग्रहाचे नाव ' काहिरा ' म्हणजे ' यशस्वी ' असे देण्यात आले. हेच हल्लीचे कायरो शहर होय.

( १९ ) काफा :- हरर येथील ' काफा ' या ठिकाणी कॉफीच्या प्रचंड लागवडी आहेत. या झाडामुळेच या गावाला ' काफा ' असे म्हणतात. या भागात कॉफीची झाडे लावावी लागत नाहीत. आहेत तीच इतकी असंख्य आहेत की हजारो टन कॉफी नुसती वेचल्यावाचून जमिनीवर पडून राहाते.

( २० ) अमेरिका :- कोलंबसाने अमेरिकेच्या तीन वेळा सफरी केल्या. परंतु एका सामान्य खलाश्याप्रमाणे या नव्या जगाच्या शोधकाला मरण आले. अमेरिगो व्हेस-प्युसी हा कोलंबसाची जहाजे प्रवासात आवश्यक असलेल्या सामग्रीने भरण्याच्या कामगिरीवर होता. म्हणून त्याला अमेरिकेला जाणे सोपे झाले. कोलंबसला सापडलेली भूमी हिंदुस्थान नसून नवे जग आहे हे प्रथम त्याने जाहीर केले. त्यामुळे ज्यावेळी ह्या भूमीला नाव देण्याचा प्रश्न उद्‌भवला त्यावेळी कोलंबसाच्या ऐवजी त्याचेच नाव अमेरिगो-अमेरिका खंडास देण्यात आले.

प्रथम कोणत्याही गावाला जेव्हा नाव दिले गेले असेल त्यावेळी मानवाने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला होता असेच म्हणावे लागेल. कारण ज्याप्रमाणे चाकाचा शोध, अग्नीचा शोध ह्या मानवाच्या उत्क्रांतीचे टप्पे मानले जातात, तशीच हीसुद्धा असामान्य गोष्ट नव्हे काय ? ह्या नावांच्या साहाय्यानेच आपण आज जगातील खंड, देश, शहरे ओळखू शकतो. हा सुद्धा एक मानवाच्या उत्क्रांतीचा टप्पाच नव्हे काय ?

✦ ✦ ✦

# हिंदू कालगणना

**अजेय फाटक**, प्र. व. शास्त्र

आपण भारतीय आहोत, पण आज अनेकांना आपल्या हिंदू कालगणनेची माहितीच नसते. आपण करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीवर जसा देशाचा परिणाम होत असतो तसाच तो कालाचाही पण असतो. योग्य स्थळी आणि योग्य काळी जर एखादी क्रिया केली तरच ती फलप्रद होऊ शकते. पांडुरंगाचे दर्शन केव्हाही होऊ शकते. परंतु आषाढी एकादशीला त्याचे महत्त्व विशेष मानले आहे. आपले जन्म-मृत्यूसुद्धा कालाधीन आहेत. नऊ महिने पूर्ण होण्यापूर्वी अवेळी जन्म होणे हे आयुष्याच्या दृष्टीने चांगले नाही. इतके आपले जीवन कालसापेक्ष आहे. आयुष्य याचा अर्थच 'काल' असा आहे. असा हा काल श्वासोच्छ्वासाच्या रूपाने आपल्या जीवनाशी एकरूप झाला आहे. म्हणून कोणत्याही धार्मिक कृत्याच्या आरंभी संकल्पापासून कालगणनेची सुरुवात करतात. प्रत्येक भारतीयाला म्हणूनच आपल्या कालगणनेची, पंचांग पाहण्याची माहिती अत्यंत जरुरीची आहे. या दृष्टीने संकलित माहिती थोडक्यात दिली आहे :-

भारतीय कालगणना आणि इंग्रजी पद्धतीशी तिची तुलना—

६० विपळें = १ पळ
६० पळें = १ घटिका
२ घटिका = १ मुहूर्त
३० मुहूर्त किंवा ६० घटिका=१ दिवस (अहोरात्र)
१५ दिवस = १ पक्ष
२ पक्ष = १ महिना
२ महिने = १ ऋतू
३ ऋतू = १ अयन
२ अयने = १ वर्ष

इंग्रजी पद्धतीप्रमाणे—

६० प्रतिविपळे = १ विपळ
२॥ विपळे = १ सेकंद
२॥ पळे किंवा ६० सेकंद = १ मिनिट
२४ मिनिटे = १ घटिका
२॥ घटिका किंवा ६० मिनिटे = १ तास
७॥ घटका किंवा ३ तास = १ प्रहर
८ प्रहर किंवा २४ तास = १ दिवस
३० दिवस = १ महिना
१२ महिने = १ वर्ष
किंवा ३६५ दिवस = १ वर्ष

ही आपली व्यवहारातील कालगणना. आपले उत्तरायण म्हणजे देवांचा एक दिवस ( उत्तर ध्रुवावर सहा महिने व सहा महिने रात्र असते) आपले दक्षिणायन म्हणजे देवांची एक रात्र. २ अयनांचे आपले १ वर्ष म्हणजे देवाचे अहोरात्र होय; आणि आपली ३६० वर्षे म्हणजे देवांचे १ वर्ष होय.

कृत, त्रेता, द्वापार आणि कली अशी युगे. ४ हजार वर्षे झाली की १ कृतयुग. तीन हजार झाली की त्रेता युग, एक हजार झाली की द्वापार आणि कलियुगाची १ हजार इतकी देववर्षे झाली की ही चार युगे होतात.

एक युग संपले की लगेच दुसरे युग सुरू होते असे नसून मध्ये काही काल जातो. याला संधिकाल असे म्हणतात. या संधिकालाला 'रुपुस्त' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. कृत युगाचा रुपस्त म्हणजे मागचा व पुढचा मिळून दोन्ही बाजूंचा संधिकाल प्रत्येकी ८०० देववर्षे, त्रेता युगाचा ६०० देववर्षे, द्वापारयुगाचा ४०० देववर्षे आणि कलियुगाचा २०० देववर्षे मिळून या चारी युगांचा संधिकाल दोन हजार देववर्षे होतो.

ही दोन हजार वर्षे आणि त्रेता, द्वापार व कलि यांची सुरुवातीला दिलेल्या संख्येनुसार दहा हजार वर्षे मिळून एकूण चारी युगांची वर्षे झाली १२ हजार ! ही १२ हजार वर्षे अर्थातच देवांची होत. देवांची १२ हजार वर्षे म्हणजे मनुष्यांची ( ३६०×१२०००=४३,२०,००० ) त्रेचाळीस लक्ष, वीस हजार वर्षे होतात. आपल्या चालू पंचांगातील युगाची कालगणना याच पद्धतीने केलेली आहे. देवांचीही

१२ हजार वर्षे म्हणजे माणसाचे एक महायुग अथवा देवांचे एक युग होते. देवांची अशी ७१ युगे लोटली की एक मन्वंतर होते. अशी मन्वंतरे चौदा आहेत. शिवाय पहिल्या मन्वंतराचे आरंभी व शेवटी आणि त्यापुढे प्रत्येकाच्या शेवटी रुपुस्तासह कृतयुगाएवढा एकेक असे १५ संधिकाल जातात. हे १५ संधिकाल व चौदा मन्वंतरे मिळून देवांची एक हजार युगे किंवा ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो, आणि पुनः अशीच एक हजार (युगे) लोटली की ब्रह्मदेवाची एक रात्र होते. या गणनेप्रमाणे, ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे मनुष्याची चार अब्ज बत्तीस कोटी वर्षे होतात. यालाच 'कल्प' अशी संज्ञा आहे. कल्प म्हणजे ब्रह्मदेवाचा १ दिवस व १ रात्र होय. असले (४,३२,००००००० वर्षांचे) ३६० दिवस व ३६० रात्री मिळून त्याचे एक वर्ष होते. अशी शंभर वर्षे हे ब्रह्मदेवाचे आयुष्य मानले आहे. याचा अर्थ, ब्रह्मदेवाची नुकतीच पन्नाशी उलटली असून, श्वेतवाराह नावाच्या कल्पास सुरुवात झाली आहे. या कल्पाच्या चौदा मन्वंतरांपकी ६ मन्वंतरे गेली. सातवे वैवस्वत मन्वंतर सुरू आहे. या मन्वंतराच्या ७१ महायुगांपैकी २७ महायुगे लोटली असून २८ व्या महायुगातील कलियुगाचा पहिला चरण (चौथा भाग) आता चालू आहे. कलियुगाची समाप्ती होण्यास अद्यापि ४,२६,९६४ वर्षे इतका कालावधी बाकी आहे. हा सर्व कालाचा सूक्ष्म तपशील रोज आपल्या डोळ्यांसमोर राहावा या दृष्टीने आपल्या संकल्पाची हेतुतः रचना केली आहे. आता हे सर्व ध्यानी घेऊन पुनः एकदा आपला संकल्प म्हणा—

"श्रीमद्‌भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य, अद्य ब्रह्मणो द्वितीये परार्धे, विष्णुपदे, श्रीश्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वंतरे, अष्टविंशतितमे युगे युग चतुष्के, कलियुगे, प्रथमचरणे, जंबुद्वीपे, भरतखंडे, श्री शालिवाहन शके, बौद्धावतारे, दंडकारण्यदेशे, अस्मिन्वर्तमाने, अमुक नाम संवत्सरे, अमुक अयने, अमुकऋतौ, अमुकमासे, अमुक पक्षे, अमुक तिथौ, अमुक वासरे, अमुक दिवस नक्षत्रे, अमुकस्थिते वर्तमाने चंद्रे, अमुकस्थिते श्रीसूर्ये, अमुकस्थिते देवगुरौ, शेषेषु ग्रहेषु यथायथ राशिस्थानस्थितेषु सत्सु एवंगुण विशेषेण विशिष्टायां शुभपुण्यतिथौ."

या संकल्पानुसार विचार केला तर विश्वोत्पत्तीचा काल अब्जावधी वर्षांहून अधिक मागे जातो. म्हणूनच हे विश्वचक्र अनाद्यनंत आहे असे म्हणतात.

व्यवहारात युगगणनेशी संबंध येतो. पुनः पुन्हा होणारे कालचक्राचे जे फेरे त्यांस सामान्यतः युग असे म्हणतात. अशा चार युगांची वर्षे अशी—

कृत युग – १७,२८,०३० वर्षे
त्रेता „ – १२,९६,००० „
द्वापार „ – ०८,६४,००० „
कलि „ – ०४,३२,२०० „

ही चार युगे मिळून एक महायुग होते, आणि एक हजार महायुगांचा एक कल्प होतो.

कल्पाच्या अंती जो प्रलय होतो त्यास 'कल्पान्त' असे म्हणतात. प्रस्तुत कल्पाची २७ महायुगे होऊन २८ व्या महायुगातील कृत, त्रेता व द्वापार अशी ३ युगे पूर्ण होऊन चौथे कलियुग चालू आहे.

कलियुगात एकूण सहा शककर्ते राजे होतील असे आपल्या ऋषींनी लिहून ठेवले आहे.

या सहा शककर्त्यांपैकी तीन होऊन गेले, आणि तीन अजून व्हावयाचे आहेत. या शककर्त्यांची नावे व त्यांचा शक किती वर्षेपर्यंत चालेल याची गणना अशी आहे.

१ ला – इंद्रप्रस्थ म्हणजे दिल्ली येथे युधिष्ठिर शक – ३०४४ वर्षे
२ रा – उज्जयिनी येथे विक्रम (संवत्) १३५ वर्षे
३ रा – पैठण येथे शालिवाहन शक १८००० „
४ था – वैतरणेच्या काठी विजयाभिनंदन शक – १०००० „
५ वा – बंगाल देशात नागार्जुन शक – ४,००,००० „
६ वा – कर्नाटकात करवीर येथे कल्कि शक ८२१ „
एकंदर कलियुग वर्षे ४,३२,२०० „

ह्यांपैकी सध्या शालिवाहन शक चालू आहे. शक ह्या शब्दाचा अर्थ आज काल असा समजतात, पण मुळात हा शब्द कालवाचक नसून तो कुलवाचक असा आहे. प्राचीन काळी शककुलोत्पन्न म्हणजे शक या नावाने ओळखले जाणारे सार्वभौम राजे होऊन गेले. त्यांच्या कारकीर्दीच्या वर्षांस शकनृपकाल असे म्हणत. त्यांची कारकीर्द संपल्यावर पुढे शालिवाहन राजांचा काळ सुरू झाला. त्यास शालिवाहन शक असे लोक म्हणू लागले. तेव्हा शक हे प्रथम एका कुलाचे नाव होते व ते पुढे परंपरेने कालवाचक बनले.

शककर्ता राजा म्हणजे सार्वभौम राजा.

हल्ली भारतात चालू असलेले शक—

( १ ) शालिवाहन शक, ( २ ) विक्रम संवत्, ( ३ ) इंग्रजी शक (ईसवीसन), (४) यवनी शक (१ हिजरीसन, २ फसली सन व अरबी सन ), ( ५ ) पारशी शक, ( ६ ) सप्तर्षिशक, ( ७ ) बंगालीशक, ( ८ ) मगीशक, ( ९ ) कोल्लम, (१०) श्री शिवराजशक.

हे सर्व वाचून कदाचित कुणी विश्वास ठेवणार नाही पण आपण जर पृथ्वीच्या उत्पत्तीचा इतिहास व पृथ्वी कशी तयार झाली हे बघितलं तर हे आपल्याला नक्की पटेल.

◆ ◆ ◆

# चिमणी

**प्रताप देशमुख**, प्र. व. वाणिज्य

परवा बालगंधर्व पुलावरून जाताना सहजच माझे लक्ष एका गोष्टीकडे वेधले गेले. ती एक चिमणी होती. पुलाच्या कठड्यावर बसून ती आपल्या इवल्याशा डोळ्यांनी रहदारीचे निरीक्षण करीत होती. कुणाचेही तिच्याकडे लक्ष नव्हते पण, तिचे मात्र सर्वत्र लक्ष होते.

चिमणी ! तसा पाहायला गेला तर हा दुर्लक्षित पक्षी. ' एक घास चिऊचा एक घास काऊचा ' किंवा चिमणीचं घर होतं मेणाचं.... ' वगैरे गोष्टींमध्येच काय ती आपल्याला हिची आठवण येते. इवलासा, काळे, पांढरे करडे ठिपके अंगावर असलेला हा पक्षी ! बारकीशी चोच नी मण्यासारखे डोळे इकडे-तिकडे करीत जगाचं निरीक्षण करताना पाहिला की हसू आल्याशिवाय राहात नाही. पाऊस पडायला लागला की या चिमण्यांची धडपड पहावी, आपल्या घरट्याकडे लवकरात लवकर जाण्याची घाई; आपली अंडी आणि पिले घरट्यात सुखरूप असतील ना ? अशा प्रकारची काळजी; पावसामुळे बसल्या ठिकाणापासून निघण्याची असहाय्यता, पाऊस थांबण्याची वाट पाहात एकमेकींत चाललेल्या ' गप्पागोष्टी ' वगैरे पाहण्यात जी मजा असते ती आगळीच ! संध्याकाळी घरी परतण्याची चिमण्यांची घाई पाहिली की लोकल पकडण्यासाठी धावणाऱ्या मुंबईकरांची आठवण पटकन् मनात तरळून जाते. घरी जाताना मारलेल्या गप्पा, घरी गेल्यावर पिलांना पंखांच्या पर्समधून आणलेला दाण्यांचा खाऊ देताना, ' घरातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केलास ना ! भावंडाकडे लक्ष देत होतास का ? ' वगैरे बोलून आपल्या पिलांची कानउघाडणी करणारी चिमणी आपल्याला ऑफिसातून येणाऱ्या आयांची आठवण करून देत नाहीत का ?

एखादी गोष्ट रोज दिसल्यावर आपण तिच्याकडे दुर्लक्ष करतो. चिमणीच्या बाबतही तसंच होतं. रोज आपल्याला खूप चिमण्या दिसतात. एखाद्या ' बुजूर्ग ' वडाच्या झाडावर तर चिमण्यांची इतकी वस्ती असते की त्याला काही सीमाच नाही. संध्याकाळी हा वृक्ष त्यांच्या चिवचिवाटाने नुकताच जागा झाल्यासारखा वाटतो. चिमणी म्हणजे फार फार तर मुठीएवढा पक्षी ! कित्येकांना तो क्षुद्र वाटतो. पण मला मात्र तसे कधीच वाटत नाही. तसे पहायला गेले तर या अफाट विश्वात मानवी जीवन ही किती क्षुद्र वस्तू ! काळाला माणूस चिमणीएवढाच लहान वाटत असेल. मग माणसाने चिमणीला क्षुद्र म्हणून का हिणवावे ?

अशा या चिमणीकडे जरा,लक्षपूर्वक नी डोळसपणे पाहिले तर तिचे अनेक गुण आपल्याला दिसून येतात. पावसाळा संपेपर्यंत घराची चिंता नसावी म्हणून ' मेणाचं ' घर बांधणारी ती गोष्टीतली चिमणी प्रसंगावधान नि हुशारी दाखवते. ' थांब माझ्या बाळाला पावडर लावू दे ' वगैरे म्हणत ती मुलांची काळजी घेण्याची दक्षता तर दाखवतेच पण ' कावळेभाऊ 'ला पावसात तिष्ठत ठेवण्याचा खट्याळपणाही काही कमी नसतो. तशी चिमणी ही फारच घाबरट नी

सावध असते. खिडकीत बसून ती घरातले निरीक्षण करते नि जरा हालचाल झाली की भुर्ऽकन उडून जाते. आपली घरटी असलेल्या झाडावर घार किंवा साप दिसला तर सर्वजणी मिळून विचित्र आवाजात ओरडतात. भूकंप, वादळ, ग्रहणे यांची कुणकुण चिमण्यांना आधीच लागलेली दिसते. यांची घर बांधण्याची जागा व घरे आपल्याकडून अभावितपणे दाद मिळवून जातात. पहाटे सूर्योदयापूर्वी या चिमण्यांची चिवचिव संपली की एखादा जाणकार सतारीया आपल्या आवडत्या सतारीवर राग ललत किंवा भैरव तर छेडीत नाहीना असा संभ्रम निर्माण होतो.

एरवी शांत नि निरुपद्रवी असणाऱ्या या चिमण्यांची मारामारी पाहाण्याचा योगही मागे एकदा आला होता. शाळेत असताना तिसऱ्या मजल्यावरील पत्र्याची छपरे असलेल्या वर्गात हे युद्ध आम्ही पाहिले, नि त्यामुळे आमचे नुकसानही काही कमी झाले नाही ! प्रदर्शनासाठी दिवसभर मान मोडून काढलेल्या सर्व चित्ररांगोळया या चिमण्यांनी मिनिटासरशी खलास करून टाकल्या होत्या. त्यावर एक चिमणी मरून पडलेली आढळली. पहिल्या दोन महायुद्धांचे परिणाम इतिहासकार काहीही लिहोत, पण या महायुद्धामुळे आम्हाला मात्र नवीन चित्ररांगोळया काढायची वेळ आणली मात्र !

अशी ही चिमणी नार्सीससारखी स्वयंलुब्ध, डेस्डिमोनासारखी बोलक्या डोळयांची, चंद्राच्या रोहिणीसारखी किंचित लाजरी, कस्तुरी-मृगासारखी स्वतःच्या गंधाच्या शोधात वेडयासारखी फिरणारी. हिच्याजवळ कोकिळेचा कंठ नाही, गरुडाची भरारी नाही, मोराचा तोरा नाही की कावळयाचा कावेबाजपणाही नाही. पण तरीही आपल्या चिवचिवाटातून माधुर्याचा स्वप्न-राग उधळणारी ' चिमणी' माझ्या मनाला नेहमीच मोह पाडते.

✧ ✧ ✧

# संस्थान

सुधा ना. भावे, तृतीय वर्ष वाणिज्य

' संस्थान कोठावळे ' या नावाने प्रसिद्ध असणारी कोठावळयांची चाळ सर्वांना ठाऊक आहे. स्टेशनवर उतरावं, टांगेवाल्याला सांगावं. " कोठावळे चाळ चलो " घोडा थेट तिथं. मात्र टांगेवाला आधी पैसे घेई. याचं कारण या चाळीच्या जवळपास राहणाऱ्या लोकांची चालुबाजी. व्हायचं काय, या चाळीच्या दाराशी टांगा उभा करायचा आणि पैसे घेऊन येतो सांगून या चाळीत शिरायचं व मागच्या दारानं आपल्या घरी निघून जायचं. टांगेवाला थोडा वेळ वाट पाही आणि शिव्यांची लाखोली वाही. सर्वांच्या आया-बहिणींचा उद्धार करी. अर्थात वात्रट मुलांना शिव्यांच्या भेंडया लावण्याचे कामी या वाङ्मयाचा उपयोग होई. एखादे दिवशी पहाटे रामपाऱ्यात हा प्रकार होई. मग सगळा दिवस खराब जाई.

तशी ही मूळची तीन मजली चाळ. तळमजला, पहिला मजला, दुसरा आणि मग तिसरा मजला असे तीन मजले. परंतु काही ठिकाणी तिसऱ्या मजल्याचा काही भाग पडलेला. काही ठिकाणी, तिसऱ्या बरोबर दुसऱ्याही मजल्यांनी स्थान सोडलेलं. अनेक ठिकाणी भगदाडं आणि छोटी छोटी खिंडारं, कुठूनही यावं-जावं. आव-जाव घर तुम्हारा. पूर्वी चाळीला एकच दरवाजा होता परंतु आता कुठल्याही खिंडारातून येण्या-जाण्याची मोकळीक होती. जिन्याची अवस्था केविलवाणी झाली होती. त्यातल्या त्यात सुस्थितीत असलेल्या एकाच जिन्यानं वरच्या मजल्यावर राहणाऱ्यांची ये-जा चाले. कधी कधी वन वे ट्रॅफिक.

निलव्याबाई म्हणजे एक अजब प्रकरण. त्या आंघोळ करून सोवळयानं ओलेत्यानं पाणी भरीत. हौदावरून घागर भरून कडेवर घ्यायची आणि कसलं तरी कानडी स्तोत्र म्हणायचं. एकंदर स्तोत्र म्हणण्याची तऱ्हा आणि उच्चार ऐकून पोर धूम पळत. चुकून एखाद्या कुलकर्ण्यांच्या मुलाचा धक्का लागला, तर चाळीतल्या समस्त कुलकर्णी कुटुंबांच्या

पितर-पौत्रांचा उद्धार होई. कानडी स्तोत्राच्या पार्श्वभूमीवर कानडी-मराठी मिश्र इरसाल, शेलकं, मौक्तिक मण्या-सारख्या, दंतहीन बोळक्यांतून पटापट बाहेर पडू लागत. या बोळक तोफेचा शत्रुसैन्य मागं हटवण्याच्या कामी थोडा फार नक्की उपयोग होईल, असं तांबटांच्या बेबीताई हळूच म्हणत. तोंडावर म्हणायची कोणाची छाती होती? क्षणार्धात श्रीमुखात बसली असती आणि त्यांच्या बोळक्यांशी बोल-णाऱ्याच्या तोंडानं साधर्म्यता साधली असती. जाऊ द्या, आपण कशाला कुणाबद्दल बोला. नसती आफत. तर हा पाणी भरण्याचा कार्यक्रम होईपर्यंत वन् वे ट्रॅफिक.

एकदा काय गम्मत झाली, शिरगणतीसाठी एक गृहस्थ आले. काम सुरू झालं. जी. टी. कुलकर्णी, टी. जी. कुलकर्णी, एम्. एन्. मांढरे, एन्. एम्. मांढरे. सगळाच गोंधळ, नक्की कुणाला कुणाचा फॉर्म ध्यानीच येईना. या दरवाज्यापासून सुरुवात केली की त्या दरवाज्यापासून, सारखा संभ्रम पडे. पुन्हा पुन्हा तिथेच. हा चक्रव्यूह, *अभिमन्यूलाच* काय पण प्रत्यक्ष त्याच्या पित्याला म्हणजे अर्जुनाला सुद्धा पार करताना नाकी नऊ आले असते. अतिशयोक्ती वाटणं साहजिक आहे. एकदा चाळीला भेट द्या. डोळे फाटतील. माणसाची शिरगणती तर झाली नाहीच पण खोल्यांची गिनतीही जमली नाही. कुणी तरी पाठीमागून हळूच म्हणाले, तुम्ही सकाळी सात-साडेसातला या म्हणजे समस्त मंडळी एका ओळीत उभी असलेली भेटतील. प्रत्येक जण घाईत. चटचट उरकेल शिरगणती. इथं भेद-भाव नाही. समान हक्क, स्त्री-पुरुषांना स्वतंत्र रांग नाही. बरं इथून हुकलेला माणूस बाथरूमच्या रांगेत निश्चित भेटेल.

तर या सर्व मजली चाळीत पूर्वी वरच्या मजल्यावर जाण्यासाठी चार जिने होते, पैकी दोन निकामी, एक चालू, एक बंद. त्याचं असं झालं, वरच्या मजल्यावर दूध घालण्यासाठी कोपऱ्यावरच्या जिन्याने दूधवाला भैया वर चालला होता. जिन्याच्या तोंडाशी घाग्रेकरांची भांडीवाली शेवंता भांडी घासत बसली होती, तब्येतीनं ठणठणीत, दिसायला जरा गोंडस, भांडी डोक्यावर घेऊन चालायला लागली की आऽऽहा! भैयाचा दिल खलास. हे रोज घडे तर ती भैयाच्या दिलाची धडकन वाढविणारी भांडीवाली पोझमध्ये बसून भांडी घासत होती. तोंडी ग्रामीण फिल्मी गाणं– "दिसला ग बाई दिसला, मला बघून गालात हसला" आता भैयाच तो. खराच हसला. तिच्या पुढ्यात बसला. तंबाखू मळली गेली, निम्मी भैयानं खाल्ली, निम्मी शेवंतानं खाल्ली. राखेनं दोन्ही हात घाण झालेले असल्या-मुळे भैयानं हळूच चिमूट तिच्या तोंडात टाकली. आणि मग काय? या तंबाखूची गोडीच न्यारी. एवढ्यात वरून खोले-बाईंनी हाक मारली. शेवंता ऽऽ आणि भैया तू? भैया गार. चरफडत जिन्यावर निघाला. पुटपुटणं चालूच होतं. कबाबमें हड्डी बीचमें आ टपकी. दाण दाण पाय आपटत निघाला. जिन्याच्या वरच्या दोनच पायऱ्या चढायच्या राहिल्या होत्या. आणि करकर असं काही तरी वाजलं व पाठोपाठ धप्प असा मोठा आवाज झाला. सगळीकडे धुरळा उडाला. काय घडलं ते कळेना आणि काय झालं ते दिसेना. शेवं-ताचा जीव कावराबावरा झाला. सगळीकडे एकच तर्क. एकच गिल्ला. दूधवाला भैया पडला. दूधवाला भैया पडला. वरती गॅलरीत, खाली अंगणात चिक्कार गर्दी झाली. एक दुसऱ्याला विचारी काय झालं हो? काही बायकांनी तर भैया मेला असं गृहीत धरून डोळ्याला पदर लावले. गंगु-बाई म्हणाल्या फार चांगला होता हो भैया. दूध चांगलं घालायचा, कधी कटकट नाही, कधी फटफट नाही. सदा हसतमुख– होय हो– इति शेवंता. पण त्या [illegible] प्रकरणी शेवंता बोलली नाही. जाधवांच्या मावशीना भैया मेला हे ज्यावेळी कळलं, त्यावेळी त्यांनी एक मोठा सुस्कारा सोडला. कारण तीन महिन्यांचं दुधाचं बिल थकलं होतं.

धुरळा कमी होताच काही लोक आत घुसले. भैया मेला नव्हता. तो वरच्यावर गॅलरीच्या गजांना वटवाघळासारखा लोंबकळत होता. जिन्याचा चक्काचूर झाला होता. सुदैवाने भैय्या खाली पडला नव्हता. दुधाचा कॅन खाली पडून मोठा आवाज झाला होता. दूध सगळीकडे सांडलं होतं.

"सांडलंना दूध? मेला थेंबभर कधी जास्त घालत नाही. माप सुद्धा डुचकळून घालतो, मेल्याची नजर कशी घाणेरडी! अहो मघाशी इथं तो आणि ती सटवाई तंबाखू.... एवढ्यात शेवंता दिसली आणि खोले बाईचं तोंड थांबलं!!

भैया वरच्या गॅलरीच्या गजांना लोंबकळत होता. व कोकलत होता. 'बचाव-बचाव.' तो बचावला तर आप-ल्याला दुधाचं बिल द्यायला लागणार याची जाधवांच्या मावशीला चिंता, तर इकडं दूध जमिनीवर सांडलेलं पाहून रानडे आक्का मांजराला घेऊन आल्या. वखवखल्यासारखं त्यानं दूध प्यायला सुरुवात केली. दुसऱ्या बाजूनं एक मर्तुकडं कुत्रंसुद्धा दूध चाटण्यात गर्क झालं होतं........

इकडे भैया लोंबकळत होता आणि सारखा कोकलत होता. त्याच्या धडपडण्यानं वरची गॅलरी हादरू लागली. भैया कोकलतोय, पण आता करायचं काय ? शेवंता सगळ्यांना ओरडून सांगत होती. काही तरी करा हो आणि वाचवा त्याला. तिचा जीव घाबराघुबरा होऊ लागला. कुणीतरी गर्दीतून म्हणालं, " एवढा पुळका आलाय तर आण तुझ्या नवऱ्याला बोलावून. सांग त्याला भैय्याला खाली काढ म्हणून. " हे बोलणं वर्मी लागलं. रागानं लालेलाल झाली शेवंता, पण काही बोलली नाही. झाकली मूठ सव्वा लाखाची. लोकांची धावपळ व बघ्यांची गर्दी वाढतच होती. जो तो भैया कसा लोंबकळतोय हे बारकाईनं निरीक्षण करत होता.

जिन्यापेक्षा गॅलरीची स्थिती बरी होती. बरी होती म्हणजे काय तिथल्यापुरेशी. इतर ठिकाणची अवस्था कठीणच होती. ठायी ठायी गजांनी आपलं स्थान सोडलेलं. कोणी काथ्या, कोणी रिबीनी कोणी सुतळी, कोणी तुटक्या नाडया, कोणी काही पातळांचे काठ, तर कोणी ठिकाणी चिंध्यादेखील बांधल्या होत्या. गजांना अहो बांधणार तरी काय काय आणि कुठे कुठे. काही दिवसांनी गज जाऊन त्याजागी बहुरंगी आणि बहुढंगी जाळंच तयार होणार असं एकूण स्पष्ट चिन्ह दिसत होतं. ही चाळ केव्हा बांधली गेली हे खुद्द मालकांनाही नीटसं माहीत नव्हतं. कोणी म्हणत ब्रिटिशांच्या कारकीर्दीत बांधली, कोणी म्हणत पेशव्यांच्या काळी चतुर्थ श्रेणीच्या नोकरांसाठी माधवराव पेशव्यांनी बांधली असावी. याच कारणास्तव राघोबादादा आणि माधवराव यांच्यात कुरबूर सुरू झाली. माधवरावांनी नोकरांची निवासाची सोय केली तर राघोबादादांना म्हणे तिथं निराळीच कोणाची तरी सोय करायची होती ! खरं-खोटं देव जाणे. लोक म्हणतात आपण ऐकायचं, आपण कशाला कुणाविषयी काय बोला. पण लोक जर बोलताहेत तर आपल्याला बोलायला काय हरकत आहे. पण नको ! आपली ग्रहदशा नाही धड, फट म्हणता ब्रह्महत्या व्हायची. नावडतीचं म्हणे मीठसुद्धा अळणी असतं ना ! काही लोक असंही म्हणतात की, आत्ताचे मालक माधवराव कोठावळे यांच्या आजोबांचे खापरपणजोबा कॉन्ट्रॅक्टर होते, त्यांच्या हातचं हे बांधकाम असावं असा पुराण-वस्तुसंशोधन खात्याचा कयास आहे म्हणे ! !

कोकलतंय कोण ? अरे हा भैय्या गॅलरीत लोंबकळतोय नाही का ? गर्दीचं प्रमाण बरंच वाढलं होतं. जो तो चिंतेत. भैय्याला सहीसलामत खाली काढावा कसा ? एवढ्यात मालक आले.... जिन्याचं नुकसान झालेलं पाहून त्यांचं पित्त खवळलं. त्यांना भाडेकरूंचा उद्धार करण्याची संधी आयतीच चालून आली होती. त्यांनी सातारी आणि कोल्हापुरी मिक्स बरसात सुरू केली. जो समोर दिसेल त्याला दोन दोन सणसणीत ऐकाव्या लागल्याच. जे आपल्याला उघडपणे बोलता येत नाही ते परस्पर ऐकायला मिळालं म्हणजे बरं असतं. या न्यायाने बहुतेक बायका दाराआडून या खमंग वाङ्मयाचा रसास्वाद घेत होत्या. पुन्हा मी नाही बाई यातली. आमच्याकडे नाही हो असं ऐकायची सवय. आमच्या घरी कधी " च्या आयला " सुद्धा म्हणत नाहीत मग पुढचं सोडाच. म्हणजे पुढचंसुद्धा या बाईला पाठ आहेच, तरी साजूकपणा. शेवंताच्या बाबतीत मात्र मालकांचा सॉफ्ट कॉर्नर....कारण उघड आहे. परमेश्वरानंच तिच्या बाबतीत सढळ हात सोडलाय....बाकी जिथं तिथं हाच अनुभव – हे सामर्थ्यच अचाट आहे. असो. पूर्वपुण्याई.

भाडेकरूंची दशपिंडी उरकल्यावर मालकाचा मोर्चा भैय्याकडे वळला. काय माजलाय साला खाऊन खाऊन रेड्यासारखा. आयला या चार चार मण जड वजनाच्या बारदानापायीच जिन्याचं वाटोळं झालं. आता खाली आदळला तर जमिनीची फरशी फुटायची. कोणी खाली काढू नका त्याला. लोंबकळू दे. नाही तरी म्हशी पिळायची सवय आहेच त्याला.

शेवंताचा जीव रुटुमुटू होत होता. शेवंतानं मालकांना हात जोडून विनंती केली. कसंही करा आणि त्याला खाली काढा....मला कशाला सांगते आहेस. तो तुझा नवरा येतोय त्याला सांग....हे शब्द कानी पडले मात्र, जी शेवंता गर्दीतून गायब झाली पुन्हा कुठे दिसली नाही.

इकडे भैय्याचं धूड लोंबकळत होतं. कोणी तरी एक छोटंसं स्टूल त्याच्या तिथं आणून ठेवलं. स्टुलावर पाय पोचवा. हं लांब करा, पाय हं. अजून लांब-सूचना झाल्या. स्टुल आणि भैय्या यादोहोंमध्ये चांगलं पंधरा सोळा फुटाचं अंतर. पाय पोचायचा कसा ? या धडपडीत भैय्याच्या उजव्या हातातला गज काडकन निसटला. पुन्हा आरडाओरड. हलकल्लोळ. भैय्याचा कंठशोष. एवढ्यात गोंधळेकरशास्त्री हातात दर्भ आणि समिधा घेऊन प्रवेश करते झाले,

किती भिन्न. काय काळाचं व वेळेचं महत्त्व !

छे ! हे जीवनाचे तरंग उद्भवतात. शेवटच्या क्षणी कसे त्या आठवणींचे गोडवे गावे ? आणि मग त्यांना केवळ मनाच्या कप्प्यात दडवायचा प्रयत्न करावा. शक्य आहे का ? ज्याप्रमाणे रबर जितका दाबतो त्याच्या दुप्पट वेगाने तो वर उडतो तसेच हे क्षण आज झाले आहेत. मग त्यांना वाट कशी द्यायची ? त्याला मार्ग नाही म्हणून केवळ भरकटत रहायचं. आणि ह्या शैशवाला बंदिस्त करायचं तेवढंच.

असा प्रत्येक क्षण येतो आणि जातो. उरतात स्मृती. त्याला विसावा, स्थिरता नसतेच. असं असूनसुद्धा आज बालहट्ट करायला आग्रही मन तयार होतं. मग स्मृती-लहरी दूर होतात. विरतात आणि काहींना दुसऱ्या क्षेत्रात प्रवेश करायची घाई झालेली असते. काही आपलं शिक्षण संपलं ह्या खिन्नतेत असतात. असे अनेक तरंग उमटतात, व्यक्तीनुरूप वेगवेगळे असतात याचा पुनःप्रत्यय येत राहतो.

कॉलेजची ॲडमिशन सुरू. लगेच त्या रांगा. ते संपलं की जरा मित्र–मत्रिणी ओळख. कुठे ग्राऊंडवर, मोकळ्या जागत असं बोलणं चालू की लगेच रखवालदाराची शिट्टी, त्याला बाजूला होऊन दिलेला प्रतिसाद, मग त्याला वाटणारा आनंद. मग ऑफिसमध्ये फॉर्म भरा, फी द्या, आयकार्ड वगैरे म्हणजे ऑफीसमध्ये राजे या भावात काम करून घेणे की एक महान कार्य अगदी केल्यासारखं बाहेर पडणं. हे सारं संपलं, राहिल्या केवळ स्मृती. जे हरवलं ते गवसतं पण आज गवसलेलंच हरवायची वेळ आलेली आहे. मग होते आठवण अळवाच्या पानावरील पाण्याच्या थेंबांची. दव म्हणजे जीवनाच्या स्मृतींचं चिन्हच का ?

हे होतंय तो येतात टेस्ट व ट्युटोरिअल्स्. ती एक मजेशीर बाब. किती अभ्यास केलेला पण कॉपी केल्याविना पेपरची सांगताच होत नाही अशी झालेली विद्यार्थ्यांची भावना. मग जरा त्यावर केलेली कारवाई. पण ते सुद्धा कसं चटकन लुप्त होतं. कारण लागलेली असते चाहूल जशी कोकिळेला वसंतऋतूची तशीच विद्यार्थी मित्रांना पिक-निक्स्ची.

काय तो उत्साह ! आनंदाला उधाण येत. त्याची तयारी चालू होते तो दिवससुद्धा पटकन उगवतो. तेथे घडत असते संमेलन. आज नसतं लेक्चर, की टेस्ट–ट्युटोरिअल. केवळ आनंद, मजा मजाच, सर्वांपासून दूर असलेला, गवसलेला निर्मळ आनंद, नयनमनोहर सृष्टीमातेच्या अंकावर खेळ-णारे बाल्य एवढीच भावना. पण त्याचा आनंद जीवनात सतत अनुभवायचा असतो. कस्तुरीचा गंध जसा दूरवर येत असतो तसा जीवनाच्या ह्या स्मृतींचा गंध अनेक काळापर्यंत दरवळला पाहिजे.

मग आठवतात लेडी रमाबाई हॉलच्या भोवतालचे अड्डे. सायकलस्टँड, ग्राऊंड, आंब्याच्या, जांभळीच्या झाडाखाली किंवा हिरवळीवरील ती मंडळी. गप्पागोष्टी. कुणाचंच बंधन नसत तिथं. ग्राऊंडवर खेळाच्या चाललेल्या प्रॅक्टीसेस, विद्यार्थी कवायत असा तो आगळा कार्यक्रम.

हे सारं संपतं व चालू होते परीक्षेची तयारी. मग विद्यार्थी अगदी विद्यार्थीच बनतो. शंकासुद्धा त्याच्याविषयी येत नाही की अभ्यास करतो का नाही. असं होतं तोच परीक्षा संपते व सुट्टी होते दीपावलीची की नवीन टर्मला नवे उत्साही वातावरण.

दीपावलीची सुट्टी संपून आलेला प्रत्येक विद्यार्थी ह्या काही मागील गोष्टींची सांगता करून लागतो तयारीला ' गॅदरिंगच्या '. तो कॉलेजच्या जीवनातील महत्त्वाचा क्षण असतो. तो गाठणे. ८/१५ दिवस नुसते हर्षमय वातावरण कॉलेजच्या आवारात दिसते.

मग हिवाळी टूर्नामेंटस चालू होतात आणि किती गोष्टी सांगाव्यात त्या थोड्याच. मग ह्या क्षण येतो ज्याची कल्पना नसते तो अकस्मात समोर येऊन ठाकतो. खरंच,

> गेले ते दिन गेले ।
> जीवनात न कळत आले ॥
> स्मृतिपटलावरी अवतरले ।
> तसेच ते बद्ध जाहले ॥

पण आज मन फार विषण्ण झाले. वाटतं त्या केवळ स्मृतींचा संचय असलेल्या, ज्याच्याशी त्या जडल्या आहेत, जेथे आजपर्यंत जीवनाचे विश्व थोडेफार पाहिले त्या माझ्या एस्. पी. ला अभिवादन.

गुड बाय ! गुड बाय ! ! गुड बाय ! ! !

☆ ☆

लग्न-मुंजी मंगलकार्ये कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने केली जातात

विवेकानंद हॉल

( मंगल कार्यालय )

१२०७ / क शिवाजीनगर, रँग्लर परांजपे रस्ता ( आपटे रोडजवळ ) पुणे ४

टेलिफोन – ५३६८५

कार्यालयाची वेळ – सायं. ५ ते ८

इंग्रजी, मराठी, हिन्दी टायपिंग
व
इंग्रजी शॉर्टहॅन्डसाठी

सरकारमान्य

शिवाजी इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

यशवंत मार्केट, वसंत टॉकिज शजारी
छत्रपती शिवाजी मार्ग
पुणे २

दिवसभर अठरा बॅचेस
कोणत्याही तारखेपासून प्रवेश घेता येतो.

# कविता

## जिंदगी

खेलना, कूदना
मजा मारना
इसको क्या कहता है ?
बचपन ।। १ ।।
घूमना, फिरना
प्यारे प्यार करना,
इसको क्या कहता है ?
जवानी ।। २ ।।
यात्राको जाना
घूम घूमके आना,
इसको क्या कहता है ?
बुढापा ।। ३ ।।
ये सब तीनों
मिल-जुल कर
क्या होती है ?
जिंदगी ।। ४ ।।

**जयश्री कुलकर्णी**, अकरावी साहित्य

## स्वातंत्र्यवेडे

( एक स्वातंत्र्यप्रेमी एका हुतात्म्यास उद्देशून म्हणतो- )

स्वातंत्र्यासाठी मरणारा तू एक वेडा
तुझ्याच मागे चालणारा मी एक वेडा
तू झगडलास पारतंत्र्यात स्वातंत्र्यासाठी
मला झगडायचंय विषमतेत समानतेसाठी
तू झगडलास विदेशी फिरंग्यांविरुद्ध
मला झगडायचंय देशी सरंजाम्यांविरुद्ध
तू राजकीय गुलामीतून आणलेस सार्वभौमत्व
मला आर्थिक दारिद्र्यातून आणायचंय स्वावलंबित्व
तू समाजवादाचा पाया रचलास महान
मला चढवायचाय त्यावर कळस छान
तू दलितांना दिलास स्वातंत्र्य-समतेचा विचार
मला स्वातंत्र्य-समता बनवायचाय एक आचार
तू अस्पृश्यतेला मानलेस हिंदूधर्मावरील कलंक
मी अस्पृश्यतेला मानतो आमच्या नरदेहावरील कलंक
तू जातीयतेविरुद्ध फुंकलीस तुतारी
मला तुझी इच्छा करायचीय खरी
तू अहिंसेने केलास आचार
मीही करतो अहिंसेचाच पुरस्कार
तू देशासाठी केलेस बलिदान
मीही राखीन देशाची शान

**नथुराम धायगावे**
प्रथमवर्ष साहित्य

## धन्य मी होईन कुंती

घन:श्याम असेल सखा
तर आनंदे मीरा होईन
लक्ष्मण असेल दीर
तर आनंदे सीता होईन ।। १ ।।
जनक जर असेल पिता
धन्य जानकी बनेन
कृष्ण जर असेल भ्राता
धन्य द्रौपदी बनेन ।। २ ।।
एवढेच म्हणावे वाटे अंती
पुत्र होणार असेल कर्ण
तर होईन मी धन्य कुंती
धन्य मी होईन कुंती ।। ३ ।।

## कारण कवचकुंडले नसतात

आजही समाजात
अनेक अर्भकांना
जन्मतःच अनाथ व्हावे लागते
त्यांना ' कर्णभोग ' भोगावे लागतात
पण ते ' कर्ण ' होऊ शकत नाहीत
कारण त्यांना कवचकुंडले नसतात ।।
कवचकुंडले नसतात ।।

**मधुमालती हरिसंगम** द्वि. व. शास्त्र

अर्थमूलम् सुखम् सर्वम् ।
जनसामान्यांच्या जिव्हाळयाची पुण्यातील एकमेव अग्रगण्य सहकारी बँक
अमृतमहोत्सवी ७५ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण.

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.,

६१२, सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ,
पुणे ४११ ०३०.
स्थापना : १९०६
दूरध्वनी : ४४५२७३, ४४४२२९

★ सातत्याने ऑडिट वर्ग ' अ '
★ सर्व प्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
★ विविध ठेव योजना

शाखा :-

१. लक्ष्मीपथ, पुण-३० ४४५२७३ ४४४२२९
२. पर्वतीदर्शन पुणे-९ ४४२३८६
३. खडकी, पुणे-३ ५३९३५
४. गोखलेनगर, पुणे-१६ ५७७२६
५. कोथरूड, पुणे-२९ ५७५९२
६. विठ्ठलवाडी, पुणे-३० ३१८२०
७. चिंचवड, पुणे-१९ ८४७९२
८. औंध, पुणे-७ ५१०७७

शशिकांत वि. बुगदे — व्यवस्थापक
वा. म. रिसबूड — सहा. व्यवस्थापक
शं. गो. बर्वे — कार्याध्यक्ष
डॉ. मु. ल. अभ्यंकर — उपकार्याध्यक्ष

फिरायला कोठेही चालेल
पण भेळ मात्र
स्वादमध्यच खायची हं !

## " स्वाद भेळ "

ओली व सुकी

ग्राहक पेठेच्या मागे, खजिनाविहीर चौक. सायंकाळी ४ ते ८॥

## श्रीहरी अर्जुन भोकर

✦ नदीची वाळू व बांधकामाच्या मळलेल्या चुन्याचे व्यापारी ★

बखळ नं. ७४८, सदाशिव पेठ,
शनीपार, पुणे ३०.

## थेंब

ह्या एका थेंबात बहरलेली माया आहे.
समृद्धीची आशा आहे.
भुकेल्या लेकरांना खाऊ घालायची शक्ती आहे
ह्या एका थेंबात त्यागाची भरती आहे
रंग लाल आणि मायभूमीची ओढ आहे
ह्या एका थेंबात कष्टाचे चीज आहे
सुखाचे क्षण म्हणून आनंदाचे अश्रू आहेत
ह्या एका थेंबात दुःखाची छाया आहे
अंतरलेल्या व्यक्तीची फार मोठी स्मृती आहे

**पौर्णिमा गोपाळ सप्रे**, प्रथम वर्ष साहित्य

## झिम्म पाऊस

काळ्या काळ्या मातीचा ग
स्पर्श चांदण्यात न्हाला
तिच्या स्वप्नांचा सौरभ
दाही दिशांत भरला.
तिनं रेशमाचं ऊन्ह
श्रावणात सांडियेलं
तिच्या एका दिठीसाठी
नभ दाटलं दाटलं.
तिच्या कोकिळ कंठात
फूल गंधगाणं झालं
एका एका गाण्यातून
तिनं रान जखडलं.
तिच्या मेंदीसाठी कुणी
एक ऋतू सजविला
आणि रानपाखरांचा
थवा नक्षी नक्षी झाला.
तिला हिर्व्या पानातून
शब्द आभाळाने दिला
तिच्या अंगणी येऊन
ढग थेंब थेंब झाला.
तिच्या चालीला गं डौल
एका मयूराने केला
तिच्या पापणीचा पंख
झिम्म पाऊस प्यायला
झिम्म पाऊस प्यायला.

**उज्ज्वला खिरे**, तृ. व. शास्त्र

## नाहीत हे बहाणे

नाहीत हे बहाणे
नाहीत शब्द दिवाणे
निःश्वास येथ गाणे
वेदनांचे हे तराणे
अधांतरी समेवरी
धुंद मी रहात आहे
या मैफलीत माझ्या
तू कशी गाणार गाणे ?
वेदनांचे येथ गाणे
वेदनांचे येथ पक्षी
पाखरांच्या पंखावरही
वेदनेचीच येथ नक्षी
निसटल्या श्वासासही
वेदनेची किनार आहे
हरवलेल्याही क्षणाचा
श्वास वेदनेचा आहे
उमलत्या पाकळीच्या
साक्षीस सर्प आहे
उमलत्या गाण्यास त्यांचा
हरघडी डंख आहे
षड्ज पेलताना
गांधार हरवलेला
अधांतरी समेवरी
रुततो गळ्यात काटा
बकुळीवरचे तुझे
सोडू नकोस घरटे
पेलणार काळोख नाही
चांदण्यांचे बहर वेडे

**श्रीनिवास जोशी**, बारावी शास्त्र

## स्वप्न !

नेत्रांच्या स्निग्ध निळाईत पालवली शब्दांची पहाट,
बांधियला त्या नेत्रांनी झुलत्या निःशब्दाचा घाट
देहाच्या डेरेदार वडाला पारंब्या स्वप्नस्थ दिठीच्या
प्राणसरितेत हरवले नभ, पिसाटती लव्हाळी तटीच्या
पाण्यात थरारल्या ढगापरी मनात अंकुरती पापण्या
स्पर्शांच्या चांदण्यात मोहरती छाया स्वप्नांच्या देखण्या

**दीपक आपटे**, एम. ए.

स्वादिष्ट व रुचकर जेवण मिळण्याचे एकमेव ठिकाण

## बादशाही बोर्डिंग अॅण्ड लॉजिंग हाऊस

टिळक रोड, पुणे ४११ ०३०

फोन : ४४६६९१


विद्यार्थ्यांच्या सेवेसाठी, हितासाठी, लाभासाठी—

## स. प. महाविद्यालय
## सहकारी ग्राहक भांडार ( म. ) पुणे

उत्तम माल वाजवी किंमत विनम्र सेवा.


सर्व प्रकारची स्टेशनरी, जर्नल्स् फाईल्स्, टायपिंग-डुप्लिकेटिंग कागद, कार्बन पेपर, सौंदर्यप्रसाधने, साबण, कन्फेक्शनरी, बनियन्स, विद्यार्थी कल्याणाच्या अनेक योजना कार्यान्वित होत आहेत. भांडारातून आपली खरेदी करा. भांडाराचे सभासद व्हा. सहकाराने आपले व समाजाचे जीवन सुखी करा. आपल्या गरजांसाठी आमच्याशी संपर्क साधा.

| | | |
|---|---|---|
| रा. धों. वैद्य | म. गो. परांजपे | बी. एन्. कुलकर्णी |
| कार्यवाह | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |



XI पारितोषिक वितरण
- श्री. अनंतराव पाटील


शिक्षण संचालक
डॉ. वि. वि. चिपळूणकर



XII विशेष गुणवत्ता संपादन करणाऱ्यांचा सत्कार




विद्यार्थिनी स्वाती हळबे




अध्यक्ष, मा. कुलगुरूंचा सत्कार

सहयायी अभ्यासक्रम - प्रमाणपत्र वितरण समारंभ




ग्रंथालयशास्त्राची विद्यार्थिनी



होस्टेल स्टूडंट्स् कौन्सिल १९८१-८२

स्नेहसंमेलन विविध सत्कार – प्राचार्यांच्या हस्ते




आनंद जोशी    मनीषा विळेकर



राजेंद्र सावंत    श्रीराम पटवर्धन





श्री. माने    श्री. क्षीरसागर    प्रा. जानवे




टिळक पुण्यतिथी - १९८१
- श्री. चंद्रकांत घोरपडे

दृक् श्रवण केंद्र - कार्यारंभ
प्राचार्य केरूर






पुणे विद्यापीठातील सामाजिक शास्त्र
विद्याशाखेचे नवे अधिष्ठाता ( डीन )
आपले प्राचार्य - सत्कार प्रसंगी




'सौंदर्यानुभव' चर्चासत्र
डॉ. व. दि. कुलकर्णी




कौशिक व्याख्यानमाला
मा. दत्तमहाराज कवीश्वर



हुतात्मा वसंत दाते स्मृतिदिन
श्री. नानासाहेब गोरे




कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिल




लोकल मॅनेजिंग कमिटी



होस्टेल स्टुडंट्स् कौन्सिल १९८०-८१




विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ




राष्ट्रीय सेवा योजना कार्यकर्ते




संमेलन कार्यकारिणी



'क्रीडांगणावरून' संपादक मंडळ



'एस. पी. रिव्ह्यू' संपादक मंडळ



'परशुरामीय' संपादक मंडळ

## ‘तू घेऊन जा ही फुले’

किती वेळा मागशील रे
‘नाही’ तरी कशी म्हणू
पण सांग ना
आपल्या मिठीबद्ध वेदनांना
हे असं सगळं अपरिहार्यच आहे का?
माझ्या डोळ्यांतल्या पाण्याचे हे छंद
तसे जुनेच आहेत
ऐक तर मग
एके दिवशी
दिवे ओशाळून जातात ती वेळ
सौम्य आभाळातल्या मंद किरमिजी ढगांची वेळ
आणि झाडांवर चोची मिटून गच्च बसलेले
थवेच्या थवे
निनावी रावे
कपोलांवरी गीत उतरता
मिटलेले डोळे
विस्कटलेले शरीर माझे
खंड खंड सोहळे
तू परतून घे ही फुले
तू घेऊन जा ही फुले

**अजय झणकर**, तृतीय वर्ष साहित्य

## भास

प्रखर प्रकाश
तळपणारा सूर्य
रखरखीत वारा
उष्णतेचा मारा
भिरभिरणारे पक्षी
सुकलेले झाड
वाकलेले माड
भिवविणारा एकांत
निर्जीव आस
सर्वांवर करून मात
होतोय तुझाच भास।

**स्नेहल कुंभारे**, तृ. व. साहित्य

## स्नेहबंध

पाखरे उडत असतात आकाशाशी समांतर राहून
मैत्री होत असते स्वभावांशी समन्वय साधून
पाखरे उडत असतात घरट्याच्या ओढीने
मैत्री व्हावी लागते अतूट स्नेहबंधाने
एक घरटे मोडले की दुसरे बांधायचें
एक बंधन तुटले की दुसरे जोडायचे
जगण्याच्या ओढीने घरटे सजवायचे
मैत्रीच्या धाग्यांनी जीवन फुलवायचे

**मेधा चिरपुटकर**, बारावी साहित्य

## एक इषारा

मनाच्या डहाळीवर बसलेल्या हळव्या पाखरा
उडून जा सुरक्षितपणाच्या कवचात
कारण....झुलताना तोल जाणार आहे तुझा
विवेक बाळग कुणावर तरी जीव लावताना
पुढे सगळयाच जाणिवा बोथट होणार आहेत
कारण....तूही त्या आखीव दुनियेचाच
होशील एक घटक अन् होऊन जाशील
स्वतःच्या भावविश्वात रममाण....सहजपणे
तुला व्हावेसे वाटेल उन्मुक्त
एका तळयातल्या राजहंसासारखे
बदकांच्या मेळाव्यात त्याला गवसला होता
अस्सल रूपाचा परिस
पण....तुला वाटणारे तुझे अस्सल रूपच
भेसळीचं आहे
आणि त्या तळयातली क्षुद्र शेवाळी
घसरवतील तुला आपल्या बुळबुळीत अंगावरून
म्हणूनच एक सूचना....
जीवनाची उत्तुंग टोके गाठताना
मनात कंगोरा ठेव सलणारा ....मृत्यूच्या दरीचा

**अंजली जोगळेकर**, बारावी साहित्य

## एक होते फूल

एक होते फूल, त्याचे, हृदय होते कोवळे
अर्पिले त्याने कुणाला, गीत त्याचे मोकळे ।। धृ०।।
त्या फुलाला एक येथे भ्रमर होता भेटला,
अंतरीचा मधु तयाने त्या फुलाचा सेविला
या जगाचा ठाव, वेडया त्या फुलाला ना कळे ! ।।१
तोडुनि रेशीमबंधा भ्रमर होती मोकळे
त्या फुलाचे मात्र तेथे हृदय होते गुंतले ।
भ्रमर तो, त्या नाही कळले गीत त्याचे वेगळे ।।२।।
या जगाची रीत नव्हती, त्या फुलाने जाणली
त्या फुलाची भावना ना ' त्या ' कुणी ही पाहिली !
त्या फुलाचे मात्र सारे जीवन येथे संपले ! ।। ३ ।।

**ललितकला निपुणगे**, अकरावी साहित्य

## अश्रू

अश्रू असावेत –
पानावरच्या दवबिंदूंसारखे
क्षणभंगुर
अन् तरीही
मनाला आनंदविणारे,
डोळयांना सुखविणारे
अश्रू असावेत—
पावसाच्या सरींसारखे
बरसणारे
मनाला शांतविणारे,
भावनांना भिजविणारे
अश्रू असावेत–
खळखळणाऱ्या नदीसारखे
बेफिकीर
मनाला जगविणारे
दुःखाला बुडविणारे

**शुभांगी साळुंखे**, द्वि. व. शास्त्र

•

## प्रेमाचे जर्नल

तुझ्या नजरेचे किरण
माझ्या नयनावर केंद्रिभूत होताच
कर्णिकेनं आणि जवनिकेनं
प्रेमाची ज्योत पेटवली
ॲसिड पडल्यासारखा
जीव तडफडला
ब्लडचे तपमान
दोन सें. ग्रे. ने वाढले
तरीही
धोक्याचा लाल लिटमस,
काही रंग बदलेना.
तू अजून....
प्रेमाच्या बाबतीत
एवढी उदासीन का ?
का तू मला समजतेस
एक क्षुद्र....
अमीबा !
माझ्या प्रेमाची
खात्री वाटत नसेल तर....
डिसेक्शन करून पहा
तुला दिसेल....
माझे हार्ट
फ्रॉगच्या हृदयाप्रमाणे
तुझाच जप करताना

**अशोक पंडोरे**, बारावी साहित्य

## निर्माल्य

त्या स्वप्नवेडया वयात
मी स्वतःला हरवून बसते.
हर एक कल्पनांचे इमले बांधले
झेप घेताना क्षितिजही अपुरे पडले
अन् रोज नवे नवे साजही घडविले.
पण आता मात्र वाटतं, वाटतं
की एक होतं, भाबडं वय
की ज्यातल्या कळयांचं....स्मृतींचं
अखेरीस होतं फक्त निर्माल्य
फक्त निर्माल्य

**संजीवनी जोशी**, तृ. व. साहित्य

## क्रिकेट

विश्वाच्या अथांग स्टेडियमवर
कसोटी सामना खेळायला
प्रत्येकजण फलंदाज आहे
आव्हानाची बोलिंग मारायला
नियतीच्या गुगलीने कधी-कधी
नशिबाचा त्रिफळा उडतो
व्यवहाराच्या ओव्हरमध्ये
प्लेड करणं जमलंच नाही
तर कुठंतरी कॅच जातो
खातं खोललंच जात नाही
किंवा दुर्दैवानं, जमलेलं शतक
हाताशी आलेली संधी
जाते पटकन निसटणाऱ्या चेंडूसारखी
पदरी शतक पडतच नाही
प्रत्येकजण अटी-तटीनं खेळतो
पण हार खाऊन मागे परतावे
लागणारच आहे प्रत्येकाला
रन आऊट झाल्यावर
विकेट पडल्यावर
बॅट खांद्यावर टाकून

**पारसनीस**, अकरावी साहित्य

## मी माझ्यावरच खूष असतो तेव्हा

मी माझ्यावरच खूष असतो तेव्हा....
आकाशात उडणारा पक्षी बनतो
रंगेली दुनियेवर फिदा होतो
हे जीवन एक सूर्योदय वाटतो
मी मुक्त मुक्त बनून जातो ( १ )
मी माझ्यावरच खूष असतो तेव्हा....
इंद्रधनुतील रंग बनतो
मनमौजी प्रवासी होतो
हे जीवन आंब्याचा मोहोर वाटतो
मी पावसाची सर बनून जातो....( २ )
मी माझ्यावरच खूष असतो तेव्हा
नदीच्या धारेतील लहर बनतो
विजेच्या पायातील पैंजण होतो
ढगांचा काळिमा आळसा वाटतो
एक थंड लहर बनून जातो....( ३ )
मी माझ्यावरच खूष असतो तेव्हा....

**शीला शाळू**, द्वि. व. साहित्य

## हायकू

( स्वतंत्र मराठी )

खिडकीतून डोकावणारा आभाळाचा इवलासा तुकडा
लख्खकन हसला
सोनेरी किरणांचा सडा पसरला

* * *

निमुळत्या शेपटीचा रातपक्षी
उडत होता भावविभोर
पाहून त्याला लाजली चंद्रकोर

* * *

इवलेसे पाखरू
कोवळेसे चित्कारले
तिच्या डोळ्यांत दोन अश्रू टप्पोरले.

* * *

उडता उडता एका फुलपाखराने
सुळ्कन् झेप घेतली
गवतफुलाच्या गालावर हळूच टिकली मारली.

* * *

गर्द गहिऱ्या डोळ्यांवर
लाज गुलाबी उतरली
पापण्यांनी मान खाली घातली

* * *

अल्लड सोनेरी ऊन
नितळसे हसले
पानापानांवर कवडसे उमटले

* * *

पावसाची सर
हळुवार शिंपून गेली
चमचमत्या थेंबांची
नक्षी उमटवून गेली.

**मनीषा विळेकर**, तृ. व. साहित्य

Don't blame your budget
Your timely Savings
will show you the way.
Drop in at any of our nearest Branch.
For 'Attractive Deposit Schemes'
with
"Lucrative Returns"
*SAVE WITH*

## Janata Sahakari Bank Ltd. Poona

**1444, Shukrawar Peth, Poona 2**
Phone : 443258

29 Branches & 3 Extention Counters in 7 Districts.

**V. V. Apte**
Chairman.

**K. S. Kakatkar**
Managing Director.

*With best compliments from :*

## La Precision Springs & Engg. Co. Ltd., Pune 19

**Leaders in all type of precision springs.**

हार्दिक शुभेच्छा !

## उत्कर्ष मंडप

हरिभुवन मंगल कार्यालय
४३७, नारायण पेठ
पुणे ३०

चालक
श्री. बाळासाहेब दाते    श्री. हेमचंद्र दाते

# विषय विभागीय वृत्त

## The English Literary Association

The activities of the Association for 1981-82 were inaugurated by Prof. Sudhakar Pandey, Reader, Department of English, University of Poona, on Wednesday, the 12 th August 1981.

On this occasion four students of the Department-Rohit Kawale, Meenaxi Deo, Bhagyashri Sahasrabudhe and Shubhangi Kshirsagar, who scored First Class at the B. A. Examination, were felicitated and presented with gifts of books on behalf of the Association by the Chief Guest, who spoke on the relevance of Stylistics to the study of English literature. His speech was preceded by that of Prof. H. V. Shintre, who spoke on the Companion. Poems in Blake's **Songs of Innocence and Experience.** His talk was accompanied by a slide-show covering the relevant illustrations from Blake's **Songs.**

Record Sessions of Shakespeare's **Romeo & Juliet** and **Antony & Cleopatra** were held for the benefit of the students of T. Y. B. A. Compulsory English.

The Association proposes to hold paper readings, seminars and record sessions in the remainder of the academic year.

Prof. **A. A. Bhagwat**

## Commerce Association

Commeroe Association is an association of students and teachers of the Commerce Stream. Its main object is to introduce students with the practical side of commercial field. Following are the programmes which are successfully carried out by our Association.

### Business Correspondence Lectures

On 17th and 18th February 1981, Prof. Date from Kirloskar Consultants delivered a series of lectures on ' Practice of Business Correspondence in a Commercial Office. '

### Elocution Competition

Elocution Competition was held on Saturday the 18th July 1981. The topic was the most debatable issue : Utility & Futility of College Education. Miss Vaijayanti Kshirsagar, our past student who stood 13th in B. Com. Examination, was invited as the Chief Guest. Prof. Rohini Patwardhan, Prof. Manjiri Paranjape and Prof. Vijay Karekar were the Judges. Chandrashekhar Aklujkar (S. Y. B. Com.); Nitin Apte (S.Y. B. Com.) and Roopali Kulkarni ( S. Y. J. C. Com.) were the prize-winners.

### General Knowledge Quiz

General Knowledge Quiz was held on Saturday the 25th July 1981. It was

organized by Bhalchandra Patwardhan (T. Y. B. Com.). The Winner-team comprised of

1. Shubhangi Deshpande (F. Y. B. Com.)
2. Vidula Paranjape (S. Y. B. Com.)
3. Keshav Ukharde (T. Y. B. Com.)
4. Kiran Naik (T. Y. B Com.)

## Film Shows

During 5th August - 8th August 1981, following educational films were screened in our Modern Audio-Visual - Centre.

(1) I want to be a Secretary
(2) Personal Qualities for Job Success
(3) Group Discussion
(4) The Art of Public Speaking

## Expert Talk

On 8th August 1981, Dr. V. N. Upasani, an eminent market researcher from Kirloskar Consultants, was invited to give a talk on Market Research the most vital aspect of Marketing.

## Picnic

A picnic of Commerce Stream was arranged on 20th September 1981, to Panchagani.

## On Job Training

We have sent a team of seven students at Tilak Road and Deccan Gymkhana Branches of 'Central Bank of India' for receiving practical training in the field of Banking.

## Industrial Visit

We are busy arranging a tour far our Junior College students to Kirloskar Cummins Ltd. to introduce them to modern commercial office set-up and modern office equipments and devices.

Prof. S. G. **Mavalankar**

**Girish Jain** (General Secretary)

## मराठी वाङ्मय मंडळ

मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन यंदा एका अभिनव पद्धतीने साजरे झाले. नेहमीची व्याख्यानाची प्रथा बदलून यंदा उद्घाटनाच्या निमित्ताने सुप्रसिद्ध कलावंत श्री. रंगनाथ कुलकर्णी यांचा सुदाम्याचे पोहे या कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या अमर विनोदी ग्रंथावर आधारलेला एकपात्री कार्यक्रम विद्यार्थीवर्ग, अध्यापकवर्ग आणि पुण्यातील रसिक श्रोतृवृंदासाठी सादर करण्यात आला. हा कार्यक्रम कै. कोल्हटकरांच्या स्मृतिदिनीच झाला हे त्यातील विशेष औचित्य होय. हा एकपात्री प्रयोग अत्यंत यशस्वी व संस्मरणीय वठला. त्याबद्दल श्री. रंगनाथ कुलकर्णी यांना द्यावेत तितके धन्यवाद थोडेच ठरतील. कै. कोल्हटकरांच्या विनोदाच्या अनेक मार्मिक छटा त्यांनी रसिकांच्या अंतःकरणापर्यंत यशस्वीपणे पोचविल्या. लवकरच डॉ. सरोजिनी बाबर आणि श्रीमती योगिनी जोगळेकर यांचे कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

**डॉ. अनुराधा पोतदार**

## हिंदी

१९८१ के जून महिने में कालिज की शुरुवात के साथ साथ हिंदी विभाग के छात्र विशेष उत्साहके साथ अपने कार्य में रत हुए।

दिनांक १४ जुलाई ८१ को 'तुलसी-प्रेमचंद समारोह' का आयोजन किया गया जिसकी अध्यक्षता श्री. मुरलीधर जगताप, हिंदी अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र ने विशेष रुचि के साथ की। इस सुअवसरपर प्रेमचंद की कहानी 'पंचपरमेश्वर' का ध्वनिरूपक प्रस्तुत किया गया, जिसे प्रथम वर्ष वाणिज्य के छात्रों ने विशेष निपुणता के साथ प्रस्तुत किया। श्री. जगताप ने प्रेमचंद तुलसी और संबंधी अपने मौलिक विचारों मे छात्रों को अवगत कराया। इसी कार्यक्रम के अंतर्गत गतवर्ष का वृत्तांत प्रस्तुत किया गया। आभार-प्रदर्शन के साथ कार्यक्रम समाप्त हुआ।

इस वर्ष हुए प्रतिनिधियों के चुनाव में द्वितीय वर्ष विशेष की प्रतिनिधि कु. सुचेता सुदामे का चुनाव हुआ तथा तृतीय वर्ष विशेष से कु. आरती कारखानीस की प्रतिनिधि के रूप में नियुक्ति हो गई।

वर्ग संघटक :
प्रा. ह. श्री. साने.
प्रा. पद्मजा घोरपडे.

**प्रा. ह. श्री. साने**

## जर्मन

दरवर्षीप्रमाणेच दि. २३-२-८२ रोजी 'जर्मन डिपार्टमेंटचे' वार्षिक स्नेहसंमेलन खेळीमेळीच्या आणि आनंदाच्या वातावरणात साजरे झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष-स्थान मॅक्समुल्लर भवनचे डायरेक्टर श्री. वाल्डराफ यांनी भूषवले. कार्यक्रमाची सुरुवात समूहगीताने झाली. त्यानंतर छोट्या परंतु मनोरंजक अशा नाटिका सादर करण्यात आल्या. रानडे इन्स्टिटयूटच्या सहकार्याने सादर करण्यात आलेल्या परीकथेस मुलांनी चांगलाच प्रतिसाद दिला. छोटया छोटया जर्मन खेळांनी कार्यक्रमास रंगत आणली, तर स्मरणशक्तीसारख्या खेळांनी विद्यार्थ्यांच्या बुद्धीलाही प्रोत्साहन मिळाले. अशा प्रकारे सर्व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने आणि सर्व शिक्षकांच्या सहभागाने कार्यक्रम साजरा झाला. संपूर्ण कार्यक्रमात औपचारिकता औषधमात्रही नव्हती.

आपल्या कॉलेजचा माजी विद्यार्थी श्री. फडतुरे याला दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाकडून ३ महिन्यांची शिष्यवृत्ती मिळाली आहे आणि तो उच्च शिक्षणासाठी 'हायडेलबर्ग' येथे जाणार आहे.

जर्मन डिपार्टमेंटचे प्रमुख श्री. राजगुरू यांनी मॅक्स-मुल्लर भवन येथील सेमिनारमध्ये 'Overhead Projector चा भाषा शिक्षणासाठी उपयोग' या विषयावर सुंदर व्याख्यान दिले.

**प्रा. दिलीप राजगुरु**

## शिक्षणशास्त्र

विभागप्रमुख : डॉ. लीला द. गोळे.

विद्यार्थी प्रतिनिधी – श्री. प्रकाश कविटकर

बुधवार, दिनांक १२-८-१९८१ रोजी प्रा. डॉ. सौ. राजलक्ष्मी भट्टाचार्य यांचे रवीन्द्रनाथ टागोरांचे शिक्षक-विषयक विचार या विषयावर व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांनी त्यांना काही प्रश्न विचारून चर्चेस रंग आणला.

गुरुवार, दिनांक १-१०-१९८१ रोजी दृक-श्रवण शिक्षण केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक लघुपट दाखवले व नंतर वर्गात त्याबद्दल चर्चा केली.

( १ ) प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन.

( २ ) लर्निंग बाय डुईंग.

( ३ ) आवर व्हिलेज.

## इतिहास

( १ ) दिनांक १५-९-१९८१ रोजी श्री. पु. दि. इंगळे ( सातारा ) यांचे 'अस्सल कागदपत्रांच्या आधारे शिवदर्शन' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी 'इतिहास-चर्चा मंडळाचे' उद्घाटन प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर यांनी केले. प्रा. कविता नरवणे यांनी प्रास्ताविक केले.

( २ ) दिनांक १४-११-१९८१ ते २१-११-१९८१ पर्यंत इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दिल्ली, आग्रा, फत्तेपूर-सिक्री येथे गेली होती. प्रा. कविता नरवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

( ३ ) शैक्षणिक सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित विषयांवर निबंध लिहिले.

कु. कल्पना आळेकर : दिल्लीचा लाल किल्ला.

कु. भारती पारसनीस, कु. शुभदा देशपांडे : ताजमहाल

कु. जयश्री केळकर : पुरातत्त्व विभाग

कु. गौरी गद्रे, कु. सोनल शाह : फत्तेपूर सिक्री

कु. स्वाती देव, कु. सुचेता फणसळकर, कुमार तळवलकर : आग्रा किल्ला

( ४ ) पुणे विद्यापीठ इतिहास विभागातील प्रा. डॉ. कृ. ना. चिटणीस यांचे 'मुघलकालीन शिल्पकलेची वैशिष्टये' या विषयावर शनिवार दिनांक १९-१२-८१ रोजी व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. दि. ब. केरूर होते. प्रास्ताविक प्रा. कविता नरवणे यांनी केले.

( ५ ) जानेवारीमध्ये जलदुर्ग, दौलताबाद किल्ला, आणि मांडवगड यांच्या स्लाईड्स् दाखविण्यात येतील.

| विद्यार्थी प्रतिनिधी | कार्याध्यक्ष |
|---|---|
| **कु. कल्पना आळेकर** | **प्रा. सौ. कविता नरवणे** |
| **कु. सोनल शहा** | |

## अर्थशास्त्र

१९८१-८२ ह्या शैक्षणिक वर्षाच्या नियोजन चर्चा मंडळाच्या कार्याचा शुभारंभ विख्यात अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर ह्यांच्या व्याख्यानाने झाला. त्यावेळी त्यांनी 'अर्थ-शास्त्रातील मूल्य सिद्धांत' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. किंमत कशी ठरते हे मांडताना शेतमालाच्या

वाचनाने काय होते ?

चांगले संस्कार होतात,
ज्ञानात भर पडते,
करमणूक होते व
जीवन समृद्ध होते.

यासाठी

'कॉन्टिनेन्टल प्रकाशन'ची

एकापेक्षा एक चांगली
पुस्तके घ्या आणि वाचा

हिंदी, मराठी चित्रपट व नाटकांतून यशस्वी भूमिका करण्यासाठी नवोदित कलाकारांना प्रेरक व मार्गदर्शक ग्रंथ

अभिनय कसा करावा ?

ले. गजानन जहागिरदार.

नामवंत चित्रपट अभिनेते व दिग्दर्शक श्री. गजानन जहागिरदार यांच्या अनुभवसमृद्ध लेखनातून साकार झालेला मराठीतील हा ग्रंथ एकामेवाद्वितीयच ठरेल.

अभिनयासंबंधी अशोककुमार, दिलीपकुमार, नूतन आणि डॉ. श्रीराम लागू यांच्या अतिशय महत्त्वपूर्ण मनमोकळ्या मुलाखती हा या ग्रंथाचा आणखी एक विशेष

इंडिया बुक कंपनी

१८७५ सदाशिव, बाजीराव रस्ता,
पुणे ४११ ०३०

श्री गजानन सॉ मिल

टिंबर मर्चंट ॲंड सॉ मिल ओनर्स

१२०, न्यू टिंबर मार्केट, पुणे २.

दूरध्वनी : ४४४८३१

सिस्टर ब्रँच : मेसर्स गजानन सप्लायर्स

सप्लायर्स फॉर सागवान जंगली, प्लायवुड, ब्लॅक बोर्ड, वीनीयर वेलडेकोर, सिमेंट शीट, व योग्य दरात कापाई व रंधा मजुरी केली जाईल.

किंमतीविषयीही त्यांनी विश्लेषण केले.

नियोजन मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे 'वालचंद हिराचंद वक्तृत्व स्पर्धा' घेण्यात आली. स्पर्धेसाठी 'काळा पैसा', 'सहावी पंचवार्षिक योजना', 'शेतमालाच्या किंमती' इत्यादी विषय ठेवण्यात आले होते. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक श्री. रामचंद्र राजाराम पाटील ह्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यास मिळाले. ह्यापुढील कार्यक्रम फेब्रुवारी ८२ मध्ये सहकारी क्षेत्रातील पतपुरवठा या विषयावर घेण्यात येईल.

**प्रा. वि. रा. शिरगुरकर**

## समाजशास्त्र

समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या सन १९८१-८२ या वर्षातील कार्यक्रमाची सुरुवात दि. १९ सप्टेंबर १९८१ रोजी डॉ. अनिल अवचट यांचे व्याख्यानाने झाली. त्यांच्या व्याख्यानाचा विषय बलुतेदारांची सद्यःस्थिती असा होता. आपल्या व्याख्यानात त्यांनी महाराष्ट्रातील बलुतेदारांच्या परिस्थितीचे सविस्तरपणे चित्रण केले व या उपेक्षित वर्गाच्या समस्यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली.

दि. २३ सप्टेंबर १९८१ रोजी, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. सय्यदभाई यांचे 'मुस्लिम स्त्रीचे सामाजिक स्थान' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी मुस्लिम स्त्रीच्या डोक्यावर तलाकची टांगती तलवार कशी असते व त्यामुळे मुस्लिम स्त्रियांना कसे हलाखीचे जीवन कंठावे लागत आहे, याचे अत्यंत विदारक असे चित्रण केले.

यावर्षी प्रा. उत्तरा शास्त्री यांना, त्यांनी सादर केलेल्या 'Neo Budhist a Marginal Community या प्रबंधाला पुणे विद्यापीठाची पीएच. डी. मिळाली. त्यांना गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेतील डॉ. बोपगमगे यांचे मार्गदर्शन लाभले होते. डॉ. शास्त्री यांचा संशोधन विषय हा प्रचलित घडामोडींशी संबंधित असल्यामुळे तो पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

यावर्षी कु. स्मिता रोंघे व कु. रंजना जगताप यांनी तृ. व. व द्वि. व. समाजशास्त्र विशेष या वर्गाचे वर्गप्रतिनिधी म्हणून काम केले.

**प्रा. मा. शं. सोमण**

## गणित

( १ ) प्रा. सौ. मंगला गुर्जर यांनी Projectivities over a commutative ring या विषयावरील प्रबंध Ph. D. पदवीसाठी पुणे विद्यापीठास सादर केला. त्यांनी डॉ. गोपालकृष्णन् यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले.

( २ ) तृतीय वर्ष बी. ए., बी. एस्सी. ( गणित ) या वर्गांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी दिनांक १२ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर या काळात जळगाव येथे पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या रिफ्रेशर कोर्समध्ये प्रा. अ. गो. जुमडे यांनी भाग घेतला.

( ३ ) प्रा. श. अ. कात्रे हे चंडीगढ येथील Centre for Advanced Studies in Mathematics मधून M. Phil. प्रथम श्रेणीत विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले. ते सध्या Teacher-Fellowship खाली चंडीगढ येथे Ph. D. पदवीसाठी संशोधन करीत आहेत.

( ४ ) प्रा. सौ. मंजुषा दाते. बी. एड. परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

( ५ ) दिवाळीच्या सुटीत रयत शिक्षण संस्थेच्या टेक्निकल हायस्कूलमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. पां. ना. कुलकर्णी यांची व्याख्याने झाली.

( ६ ) प्रा. म. रा. राईलकर, प्रा.मा. रा. मोडक आणि प्रा. श. अ. कात्रे यांनी American Mathematical Monthly – मधील प्रश्न सोडविले.

( ७ ) स. प. महाविद्यालयातील गणिताचे पहिले शिक्षक प्रा. त्र्यं. भि. हर्डीकर यांना २२-८-१९८१ रोजी नव्वद वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त, गणित विभागातील शिक्षकांनी त्यांना भेटून त्यांचे अभीष्टचिंतन केले. या वयातही ते दररोज सात-आठ तास अभ्यास व लेखन करीत आहेत. गेली काही वर्षे केलेल्या परिश्रमातून त्यांनी Indeterminate Analysis नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये भास्कराचार्य, आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त इत्यादी प्राचीन गणितज्ञांच्या व स्वतः संशोधन केलेल्या अनेक पद्धतींचे सोदाहरण विवेचन त्यांनी केले आहे.

( ८ ) स. प. महाविद्यालयाचे नामवंत माजी विद्यार्थी डॉ. रवींद्र कुलकर्णी सध्या इंडियाना येथील ब्लूमिंटन विद्यापीठात गणित विभागाचे प्रमुख आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या रविश्री निधीमधून चालू वर्षापासून तीन योजना

स. प. महाविद्यालयात कार्यान्वित होत आहेत. ( अ ) गणित प्रमुख विषय असलेल्या तृतीय वर्षातील २ विद्यार्थ्यांना प्रतिमास रु. २५ ची शिष्यवृत्ती ( आ ) ग्रंथालयात रँ. केरकर विभाग या नावाने पुस्तके घेण्याकरिता प्रतिवर्षी रु. १,००० चे अनुदान ( इ ) रँ. केरकर निबंधस्पर्धेकरिता प्रतिवर्षी रु. ८०० चे अनुदान.

याशिवाय प्रा. हर्डीकरांच्या उपरोक्त ग्रंथाच्या प्रकाशनाकरिता रु. ८,००० चे अनुदानही रविश्री निधीमधून मिळणार आहे.

डॉ. कुलकर्णी यांच्या पुण्यातील वास्तव्यात त्यांनी गणितावर दोन व्याख्याने महाविद्यालयात दिली.

( ९ ) पुणे विद्यापीठातर्फे, द्वितीय वर्ष शास्त्र व साहित्य, सत्र तीन, या वर्गासाठी प्रश्नमालिका तयार करण्याच्या कामात, नोव्हेंबर १९८१ मध्ये गणित विभागाने सक्रिय भाग घेतला.

( १० ) या वर्षी विभागातर्फे 'Manipulating Binary' नावाचा एक चित्रपट खरेदी करण्यात आला.

( ११ ) रँ. केरकर निबंधस्पर्धेमध्ये यावर्षी ७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेमध्ये कु. मधुमालती हरिसंगम, द्वि. व. शास्त्र हीस प्रथम पारितोषिक रु. ३००, कु. प्रज्ञा राजे, तृ. व. साहित्य हीस द्वितीय पारितोषिक रु. २५०, आणि श्री. संदीप होले, द्वि. व. शास्त्र यास उत्तेजनार्थ पारितोषिक रु. २५ मिळाले. सदर पारितोषिके दि. २० जानेवारी १९८२ रोजी श्रीमती सुमित्राबाई केरकर यांच्या हस्ते देण्यात आली.

**प्रा. म. रा. राईलकर**

## संख्याशास्त्र

( १ ) ( अ ) प्रा. डॉ. एस. आर. परांजपे, प्राध्यापक, संख्याशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ यांचे

What is Operations Research ?

या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

( ब ) श्री. सि. बा. देव, मॅनेजर, स्टॅटिस्टिकल क्वालिटी कंट्रोल विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स, पुणे, यांचे

Why Statistical Quality Control ?

या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

( क ) प्रा. डॉ. श्री. र. काळे, विभागप्रमुख तत्त्वज्ञान विभाग, स. प. महाविद्यालय, यांचे

Inference : its nature and main types,

या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

( ड ) श्री. मु. रा. लेले (या विभागाचे माजी विद्यार्थी) यांचे

On measurement of Efficacy of a cross breeding programme

या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

( इ ) "Newton's method" आणि "Space filling curves"

हे शैक्षणिक चित्रपट तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

( २ ) प्रा. व. र. हरिश्चंद्रकर आणि प्रा. श्रीमती माधुरी गानू पुणे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागात टीचर फलो म्हणून अध्ययन करीत आहेत.

( ३ ) पुणे विद्यापीठाच्या एप्रिल, १९८१ मधील तृतीय वर्ष शास्त्र–संख्याशास्त्र परीक्षेत विभागाच्या एकूण ३२ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थी प्रथम वर्गात व २ विद्यार्थी द्वितीय वर्गात उत्तीर्ण झाले.

( ४ ) १९८१–८२ या वर्षात श्रीमती मंगला विनायक कुलकर्णी यांची द्वितीय सत्रात व्याख्यात्या म्हणून नवीन नेमणूक झाली आहे.

( ५ ) सेमेस्टर पद्धती आणि परीक्षा पद्धतीतील सुधारणा याविषयी विद्यार्थीवर्गाच्या प्रतिक्रियांचा अभ्यास करण्यासाठी एक नमुना सर्वेक्षण ( sample survey ) हाती घेण्यात आले होते. त्यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र विभागाबरोबर पुण्यातील व पुण्याबाहेरील काही महाविद्यालयांचा सहभाग होता. हे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्याच्या अहवालाची प्रत पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंना सादर करण्यात आली आहे.

( ६ ) गेली तीन वर्षे विभागातर्फे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलनाचा उपक्रम चालू आहे. यंदा हे संमेलन ८ फेब्रुवारी, १९८१ रोजी झाले.

**प्रा. म. कृ. केळकर**

## वास्तवशास्त्र

( १ ) प्रा. शा. न. जोशी यांनी पुणे विद्यापीठात एम. फिल. इन फिजिक्स हा अभ्यासक्रम पुरा केला व ते

101502

दिनांक ३० जुलै १९८१ रोजी महाविद्यालयात कामावर रुजू झाले.

( २ ) वास्तवशास्त्राचे माजी विभागप्रमुख आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक श्रीपाद दत्तात्रय भावे यांचे दिनांक १९-११-८१ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. त्यांनी १९३१ ते १९५९ या काळात विभागप्रमुखत्वाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. याशिवाय वसतिगृहप्रमुख, जिमखाना उपाध्यक्ष, महाविद्यालयाचे उपप्राचार्य, पदव्युत्तर संशोधनासाठी मार्गदर्शक इत्यादी नात्याने कार्य केले. दिनांक १७ डिसेंबर रोजी विभागात सर्व प्राध्यापक व इतर सेवक यांची सभा होऊन त्यात त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

( ३ ) वास्तवशास्त्र मंडळाचे उद्घाटन विद्यापीठातील डॉ. व्ही. एन भोरास्कर यांचे हस्ते ऑगस्ट महिन्यात झाले. त्यांनी 'रेडिओ आयसोटोप्स व त्यांचे उपयोग' या विषयावर सदीप व्याख्यान दिले.

( ४ ) रोटरी यूथ क्लबतर्फे आबासाहेब गरवारे महाविद्यालयात दिनांक २२ व २३ डिसेंबर १९८१ रोजी सायन्स प्रोजेक्टस् स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पुण्यातील सर्व महाविद्यालयातील विविध विषय-विभागांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचा निकाल जाहीर होऊन त्यात या विभागातील दोन विद्यार्थ्यांना बक्षिसे जाहीर झाली.

| नाव | प्रोजक्ट |
|---|---|
| ( १ ) श्री. एस. एस. भिडे | शुक्र कक्षेचा अभ्यास |

**बक्षीस**

पहिले बक्षीस रु. २५१ ।-

| | |
|---|---|
| ( २ ) श्री. एस. के. गोडसे | ढगांचा छायाचित्रात्मक अभ्यास |

तिसरे बक्षीस रु. ५१ ।-

स्पर्धकांचे व वरील उल्लेखनीय पारितोषिक विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. वरील स्पर्धेसाठी प्रा. आफळे, प्रा. बालवे व प्रा. फडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**प्रा. कृ. रा. कुलकर्णी**

## रसायन

### सन १९८१-८२ या शैक्षणिक वर्षातील विशेष घडामोडी

एम. एस्सी. इन् ऑरगॅनिक केमेस्ट्री या विषयाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची पहिली तुकडी एप्रिल १९८१ मध्ये घेतलेल्या विद्यापीठ परीक्षेस बसली होती. एकूण ९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. निकाल १००% लागला. ६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. श्री. रा. श्री. आघारकर हे Inorganic Chemistry या विषयात विद्यापीठात पहिले आले, व त्यांना श्री. जनार्दन हरि भाते पारितोषिक विभागून देण्यात आले.

एम. एस्सी. ऑरगॅनिक केमेस्ट्री या विषयाच्या एप्रिल १९८१ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेत ९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. श्री. प्र. बा. जोशी Organic Chemistry या विषयात विद्यापीठात तिसरे आले.

प्रा. श्री. वा. केळकर एप्रिल १९८१ मध्ये पुणे विद्यापीठाने घेतलेल्या B. Ed. परीक्षेस बसले होते. ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

प्रा. सौ. प्रज्ञा देशपांडे यांनी Ph.D.पदवीसाठी आपला प्रबंध पुणे विद्यापीठास सादर केला आहे.

प्रा. दि. श्री. देशपांडे एप्रिल १९८२ मध्ये होणाऱ्या पुणे विद्यापीठाच्या B. Ed. परीक्षेस बसत आहेत.

या विभागातील प्रा. डॉ. न.रा. शेटे यांनी १९८१-८२ या शैक्षणिक वर्षात तीन रिसर्च पेपर्स प्रसिद्ध केले. त्यापैकी एक Tetrahedron (England) व दोन Indian Journal of Chemistry या नियतकालिकात प्रसिद्ध झाले.

प्रा. डॉ. अ. स. गिजरे यांना पुणे विद्यापीठाने Ph.D. संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे.

डॉ. अ. रा. वद्य Post Doctoral Research Fellow म्हणून Louvain ( Belgium ) येथे गेले आहेत.

Association of Indian Universities (New Delhi) यांचेतर्फे चालविलेल्या Correspondance Course in Evaluation Methodology and Examinations-Basic level ची अंतिम परीक्षा जून १९८१ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेत प्रा. वा. म. दाते उत्तीर्ण झाले.

**प्रा. वा. म. दाते**

S P College Library
93929
Rack
101502 P16

*With best compliments from :*

BE A CHAMP
WITH
CHAMPION SPORTS

1251, DECCAN GYMKHANA, PUNE-4

Phone No. 442213

AJANTA
SCIENTIFIC
AGENCIES

Manufacturers Representative
In Fine Chemicals,
All Scientific Goods and
Special Glass Blown Apparatus

**1647, Sadashiv Peth, Poona 30.**

*With best compliments from*

Shree
Traders

**Amol Apartments**
**159/1 Shanwar Peth**
**Poona 411 030**

Pharmaceutical Distributors
And Dealers In
Laboratory Chemicals & Solvents

## व्यावसायिक अभ्यासक्रम : इलेक्ट्रॉनिक्स

( कनिष्ठ महाविद्यालय )

या वर्षी प्रथमवर्ष शास्त्र वर्गातील २८ विद्यार्थी-विद्यार्थिनींना या अभ्यासक्रमासाठी Aptitude Test मधील गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आला. या वर्षीपासून प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष अशा दोन बॅचेस सुरू करण्यात आल्या.

यंदा श्री. पिले यांची Instructor म्हणून नेमणूक करण्यात आली.

हा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाची अधिक माहिती Industrial Visits मुळेच होते व त्याप्रमाणे खालील Factories ना भेटी देण्यात आल्या.

(1) Systech International Ltd.
(2) Syntronics Ltd., Bhosari.
(3) Rescon Mfg. Co., Ltd.
(4) Technocraft
(5) Analogue and Digital Measurement Co. Ltd., Bhosari.
(6) Amphetronics, Bhosari
(7) Elpro International Ltd., Chinchwad
(8) Monga Electronics.

तसेच जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात Arvi Satellite Centre ला भेट देणार आहोत.

याचबरोबर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी खालील तज्ज्ञ व्यक्तींनी व्याख्याने दिली.

( १ ) श्री. देसाई ( २ ) श्री. मोडक
( ३ ) श्री. परांजपे ( ४ ) श्री वाबळे
( ५ ) श्री. इनामदार ( ६ ) श्री. शुक्ला
( ७ ) श्री. राजहंस

यंदाचे आमचे हे दुसरेच वर्ष आहे. या अभ्यासक्रमास प्राचार्य दि. ब. केरूर, वास्तवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. कृ. रा. कुलकर्णी, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. आ. गो. जुमडे, आणि व्यावसायिक अभ्यासक्रम विभाग प्रमुख डॉ. ना. रा. शेटे, यांचे वारंवार मिळणारे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन तसेच सर्व सहकारी प्राध्यापक वर्गाचे व विद्यार्थ्यांचे मिळणारे सहकार्य यामुळेच हा अभ्यासक्रम यशस्वी होत आहे.

**प्रा. चंद्रशेखर करमरकर**

◊ ◊ ◊

## अभिनंदन

तत्त्वज्ञानविभागातील प्रा. सौ. गौरी भागवत, प्रा. प्रकाश सोमण व प्रा. विद्या नाडकर्णी आणि राज्यशास्त्रविभागातील प्रा. सुहास पळशीकर यांनी पुणे विद्यापीठाच्या एम्. फिल. परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले आहे. अभिनंदन.

◻ ◻ ◻

# संघटना वृत्त

## प्राध्यापक चर्चा मंडळ

सोमवार दि. २ मार्च १९८१ रोजी तत्त्वज्ञान विभागाचे प्रा. विजय कारेकर यांनी लिहिलेल्या ' लायन्स क्लब्ज ' या मराठी प्रायोगिक एकांकिकेचे त्यांनी वाचन केले व त्यानंतर या काहीशा ' ॲब्सर्ड ' नाट्याकडे झुकलेल्या, स्त्री-पुरुष संबंधातील रती व स्वामित्वभावना ( Sex and Power instinct ) या प्रमुख अंतःप्रेरणांचा मागोवा घेत प्रेमभावनेचा वेध घेऊ पाहणाऱ्या एकांकिकेवर चर्चा झाली. यात अनेक प्राध्यापकांचा सहभाग होता.

शुक्रवार दि. ७ मार्च १९८१ रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. अप्पासाहेब तथा गो. नी. दांडेकर यांची गतवर्षीच्या मराठी साहित्यसंमेलनपदी निवड झाल्याबद्दल मंडळातर्फे प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना मा. अप्पासाहेबांनी आपल्या लेखनप्रक्रियेबद्दल व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाबद्दल निवेदनपर असे वक्तव्य केले. आपल्या लिखाणात कोणत्याही साहित्यिक अगर सद्धांतिक अभिनिवेशाचा अभाव नसून त्या अर्थाने आपली साहित्यिक प्ररणा साक्षात्कारी आहे असे सांगून आपल्या भाषाशैलीच्या घडणीत श्री गाडगे महाराज, संतवाङ्मय व बोलीभाषा यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले.

सोमवार दि. ९ मार्च १९८१ रोजी सुप्रसिद्ध समीक्षक प्रा. श्री. पु. भागवत यांचे आजच्या मराठी समीक्षेवर भाषण झाले. समीक्षेबद्दलचा त्यांचा अनुभव संपादक, प्रकाशक, प्राध्यापक या नात्यांनी किती विविधांगी आहे याचा प्रत्यय त्यांच्या भाषणातून येत होता. याच कारणाने मराठी समीक्षसंबंधी त्यांनी व्यक्त केलेल्या असमाधानालाही फार गंभीर अर्थ होता. आपल्याकडे सौंदर्यविषयक तात्त्विक चर्चा उदंड, पण रसग्रहणात्मक व विश्लेषक समीक्षा गुणवत्तेने कमी पडते असे त्यांनी प्रतिपादन केले. सौंदर्यदृष्टी, Interdisciplinary दृष्टिकोण, मराठी व अन्य भाषाशिक्षकांमधील सुसंवाद, ' वृत्तपत्रीय ' समीक्षेत सुजाणता व समतोल या सर्व गोष्टींचा अभाव ही त्यांच्या मते मराठी समीक्षेतील गुणवत्तेच्या कमतरतेची प्रमुख कारणपरंपरा. आपल्या महाविद्यालयीन व विद्यापीठीय अभ्यासक्रमातूनही या अभावाबद्दल कुठे अस्वस्थपणा जाणवत नसल्याचे त्यांनी परखडपणे सांगितले.

सोमवार, दि. ५ ऑक्टोबर १९८१ रोजी प्रा. डॉ. एम. एस. गोसावी, प्राचार्य, बी. वाय्. के. कॉलेज ऑफ कॉमर्स, यांचे त्यांनी नुकत्याच दिलेल्या जपान भेटीवर आधारित असे एक रंजक व माहितीपूर्ण व्याख्यान झाले. दुसऱ्या महायुद्धोत्तर काळात जपानने केलेली अजोड तांत्रिक प्रगती व त्यातून व्यक्त होणारे जपानचे व्यक्तिमत्त्व, जपानी परंपराप्रियता आणि कार्यप्रवणता, मानवनिर्मित आणि प्राकृतिक अडचणींना तोंड देत एक नवे विश्व उभारण्याची त्यांची जिद्द पण त्याबरोबरच आधुनिकतेसह येणाऱ्या सामाजिक समस्यांचा सामना करताना भांबावलेले जपानी व्यक्तिमत्त्व त्यांनी समर्थपणे शब्दांतून उभे केले.

मंगळवार दि. २२ डिसेंबर १९८२ रोजी प्रा. ए. एस्. देशपांडे, प्रपाठक, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ यांनी लिहिलेल्या The Dynamics of the Reform Movement in the Early 19th Century Maharashtra या संशोधन लेखावर त्यांनी केलेले सारसंकलन व भूमिका-कथन व नंतर त्यावर चर्चा असा कार्यक्रम झाला. महाराष्ट्रातील आधुनिक समाजसुधारणा चळवळीचा आरंभ हा इ. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतरचा मानला जातो व त्या चळवळीमागे बव्हंशी इंग्रजी अमदानीतील पाश्चात्त्य विचारपरंपरेचा प्रभाव आहे अशी सर्वसंमत मीमांसा आहे. हे सर्वसाधारणपणे खरे असले तरी, यापूर्वी कित्येक वर्षे इंग्रज अमदानी-

खाली असलेल्या बंगालमध्ये अशा तऱ्हेच्या सामाजिक सुधारणा चळवळी का सुरू झाल्या नाहीत व खुद्द महाराष्ट्रात मुंबई १८१८ पूर्वी बराच काल इंग्रजांकडे असूनही तिथे अशा चळवळी आधीच का सुरू होऊ नयेत असे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून त्यांनी पेशवाईचा अस्त व इंग्रजी अंमल हीच केवळ समाजसुधारणा चळवळीमागची पुरेशी कारणे नाहीत हे स्पष्ट केले व त्याविषयी स्वतःचा hypothesis मांडला. महाराष्ट्रातील इंग्रजी शासनापूर्वीचा पारंपरिक वतनदार वर्ग व इंग्रजी शासन सुरू झाल्यानंतर नव्याने सामाजिक महत्त्व पावलेला अंमलदार वर्ग यांच्या एक प्रकारच्या संघर्षातून समाजसुधारणा चळवळीचा उगम झाल्याचे स्पष्ट केले.त्यांच्या विवेचनाला आर्थिक, राजकीय, सामाजिक असे संदर्भ असल्यामुळे इतिहासमीमांसा कशी असावी यांचा एक वस्तुपाठच त्यांनी श्रोत्यांसमोर सादर केला असे म्हणावेसे वाटते.

वरील सर्व कार्यक्रमांना प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर हे अध्यक्ष म्हणून लाभले होते. अध्यक्षीय भाषण व पाहुण्यांच्या भाषणानंतर चर्चा असेल तेथे चर्चेचे प्रभावी नियमन हे त्यांचे चर्चामंडळाच्या प्रत्येक सभेतील योगदान असते हे कृतज्ञतापूर्वक नमूद करीत आहे.

**प्रा. अ. आ. भागवत**

## बुक–क्लब

यंदाच्या शैक्षणिक वर्षात पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

( १ ) गुरुवार, दिनांक २७–८–१९८१ :
ग्रंथनाम : मार्क्स व मानव.
लेखक : श्री. प्रभाकर पाध्ये.
समीक्षा : प्रा. विजय कारेकर.
अध्यक्ष : प्रा. डॉ. दि. ब. केरूर.

( २ ) मंगळवार, दिनांक २९–९–१९८१ :
ग्रंथनाम : आसामचे आव्हान.
लेखक : श्री. रविकिरण साने.
समीक्षा : प्रा. सुहास पळशीकर.

संयोजक : **डॉ. लीला द. गोळ**

## ग्रंथालय

( १ ) मागील शैक्षणिक वर्षात (१९८०–८१) ग्रंथालयात पुढीलप्रमाणे नव्या ग्रंथांची भर पडली.

( १ ) वरिष्ठ महाविद्यालय – २३०५
( २ ) कनिष्ठ महाविद्यालय – ४७८

यंदाच्या शक्षणिक वर्षात डिसेंबर १९८१ अखेर खालीलप्रमाणे नवी पुस्तके समाविष्ट करण्यात आली.

( १ ) वरिष्ठ महाविद्यालय – १४७२
( २ ) कनिष्ठ महाविद्यालय – ११७

( २ ) ग्रंथालय प्रमुख –

ग्रंथालय प्रमुखपदाची जबाबदारी प्रा. बी. एन. कुलकर्णी यांनी एप्रिल १९७९ पासून यशस्वीपणे सांभाळली. त्यांची उपप्राचार्यपदी नेमणूक झाल्यामुळे प्रा. सौ. लीला अर्जुनवाडकर यांनी २४–८–१९८१ पासून ग्रंथालय प्रमुखपदाची सूत्रे हाती घेतली आहेत.

**(३) कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा गौरव –**

कनिष्ठ महाविद्यालयातील ६७ विद्यार्थ्यांना ( ११ वी मधील ४२ विद्यार्थी आणि १२ वीमधील २५ विद्यार्थी ) पुस्तकसंच बक्षीस देऊन, परीक्षेतील त्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल गौरव करण्यात आला.

( ४ ) जून १९७१ पासून आपल्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल असलेले श्री. म. भि. कोण्णूर यांची पुणे विद्यापीठात ग्रंथालयशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून निवड झाल्याने १–९–१९८१ पासून ते स. प. महाविद्यालयाच्या सेवेतून मुक्त झाले आहेत. ग्रंथालयातील सर्वांत ज्येष्ठ सेवक श्री. रा. गो. जोशी सध्या त्यांचे काम पाहात आहेत.

ग्रंथालयात सुमारे ११ वर्षे लेखनिका म्हणून काम करणाऱ्या सौ. रेणू सुरेश देव, प्रकृतिस्वास्थ्यासाठी दि. २०–८–१९८१ पासून महाविद्यालयाच्या सेवेतून निवृत्त झाल्या आहेत. ग्रंथालयात अटेंडंट म्हणून काम करणारे श्री. मा. य. गोडबोले दि. ८–८–८१ पासून महाविद्यालयाच्या दृक्–श्रवण केंद्रात पूर्णवेळ काम करीत आहेत. ग्रंथालयातील एक शिपाई सेवक श्री. प्रकाश शिरोळे हे जून १९८१ पासून महाविद्यालयाच्या सेवेतून मुक्त झाले आहेत. श्री. दत्तात्रय महाडिक यांची ग्रंथालयात ५–८–८१ पासून शिपाई सेवक म्हणून नव्याने नेमणूक करण्यात आली आहे.

**( ५ ) अध्यापन कार्य**

पुणे जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या ग्रंथपालन शिक्षण वर्गाचे मुख्याध्यापक म्हणून ग्रंथपाल श्री. कोण्णूर यांनी काम केले व विद्यार्थ्यांना संदर्भ साहाय्य हा विषय शिकविला. सौ. रेवती नरगुंदे यांनी वर्गीकरण प्रात्य-

मी आलेय मिंटी

एक खारोटी



स्वभाव माझा जागरूक
वृत्ती माझी संचयी.
चालणे माझे चपळ
वागणूक माझी निगर्वी.
सेतू बंधनात आपला वाटा उचलून
रामाचा आशीर्वाद मिळविलेली
आजही थोरा मोठ्यांचे
आशीर्वाद असेच आहेत पाठीशी
माझं घर होतं दूर रानात
झाडांच्या ढोलीत
आता मात्र माझं घर खेड्यात, शहरात
महाबँकेच्या शेकडो शाखांत.

मी आलेय मिंटी
मी म्हणजे—महाबँक

बँक ऑफ महाराष्ट्र

( भारत सरकारचा उपक्रम )

मुख्य कचेरी : 'लोक मंगल', शिवाजीनगर

पुणे ४११ ००५

क्षिक हा विषय शिकविला.

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण केंद्रातर्फे पुणे विभागात चालविलेल्या ग्रंथालय प्रशिक्षण वर्गासही त्यांनी वर्गीकरण-तात्त्विक व प्रात्यक्षिक हे दोन विषय ऑगस्ट १९८१ मध्ये शिकविले. वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी गेल्या वर्षीपासून ग्रंथालयशास्त्राचा सहयायी अभ्यासक्रम चालू केला आहे. यंदा १० विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात आला आहे. माजी ग्रंथपाल श्री. कोण्णूर अभ्यागत प्राध्यापक म्हणून शिकविण्याचे काम करीत आहेत. ग्रंथालयातील वरिष्ठ साहाय्यक सौ. रेवती नरगुंदे यांनी तर या कामात मोठी जबाबदारी उचललेली आहेच.

( ६ ) लायब्ररी न्यूज लेटर – विजयादशमीला ग्रंथालय वृत्ताचा दुसऱ्या वर्षाचा पहिला अंक आपण प्रकाशित केला. ग्रंथालयात नव्याने येणाऱ्या निवडक ग्रंथांचा थोडक्यात परिचय व ग्रंथालयातील उपक्रम यांची माहिती आपल्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व अन्य लोकांना व्हावी या हेतूने गतवर्षी सुरू केलेला हा नवा उपक्रम यंदाही चालू ठेवला आहे.

( ७ ) पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथालय संघाचे दि. २२ नोव्हेंबर १९८१ रोजी नंदुरबार येथे अधिवेशन झाले. त्यास आपल्या ग्रंथालयातर्फे श्री. रा. गो. जोशी आणि श्री. शां. रं. गंधे हे हजर राहिले होते.

( ८ ) ग्रंथालय समिती—

कुलपती ओ. पी. मेहरा यांच्या आदेशानुसार महाविद्यालयात ग्रंथालयसमिती नेमण्यात आली आहे. तिचे सभासद पुढीलप्रमाणे– उपप्राचार्य प्रा. म. रा. राईलकर, उपप्राचार्य प्रा. बी. एन. कुलकर्णी, प्रा. डॉ. चंद्रशेखर बर्वे, ग्रंथालय प्रमुख प्रा. सौ. लीला अर्जुनवाडकर, सहाय्यक ग्रंथपाल श्री. रा. गो. जोशी, कार्यालय अधीक्षक श्री.पां.वा. केळकर, वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक सौ. रेवती नरगुंदे, विद्यार्थि–प्रतिनिधी श्री. नंदू काळभोर. या समितीची बैठक दर महिन्याला होते. आणि तीत नित्य व नमित्तिक कामांची धोरणे आणि त्यांची कार्यवाही, विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविणे इत्यादींबाबत विचारविनिमय केला जातो.

डिसेंबर १९८१ पासून प्राचार्यांच्या कचेरीत पाक्षिक विभागीय सभा आयोजित केली जाते. त्या सभेतही ग्रंथालयाचे कामकाज आणि अडीअडचणी यांबद्दल चर्चा केली जाते.

**प्रा. सौ. लीला अर्जुनवाडकर**
ग्रंथालय प्रमुख

# विद्यार्थी वसतिगृह

१९८१–८२ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थी वसतिगृहात एकूण १७८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यांची वर्गवार संख्या पुढीलप्रमाणे:—

| वर्ग | साहित्य | शास्त्र | वाणिज्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| इयत्ता ११ वी | ३ | २७ | १ | ३१ |
| इयत्ता १२ वी | ४ | ४८ | ४ | ५६ |
| प्रथम वर्ष | ४ | ९ | ३ | १६ |
| द्वितीय वर्ष | ५ | १० | ३ | १८ |
| तृतीय वर्ष | ७ | ९ | २ | १८ |
| एम. ए. भाग–१ | १५ | – | – | १५ |
| एम. ए. भाग–२ | १४ | – | – | १४ |
| एम. एस्सी. भाग-१ | – | ५ | – | ५ |
| एम. एस्सी भाग-२ | – | ३ | – | ३ |
| इतर – | – | – | – | २ |
| एकूण : | ५२ | ११३ | १३ | १७८ |

दिनांक १५–७–१९८१ रोजी इयत्ता ११ वी व १२ वी मधील वसतिगृह विद्यार्थ्यांचा परस्पर परिचयाचा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आला. त्यावेळी प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. अ. गो. जुमडे, उपप्राचार्य प्रा. म. रा. राईलकर, प्रा. भ. न. कुलकर्णी, प्रा. आ. गो. मोडक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर विचार मांडले.

या वर्षाकरिता पुढील विद्यार्थ्यांची वसतिगृह पर्यवेक्षकपदी नियुक्त करण्यात आली.

श्री. एम. बी. कुदळे — पदव्युत्तर शास्त्र भाग–२
श्री. एस. ए. पठारे — पदव्युत्तर शास्त्र भाग–१
श्री. ए. के. दाने — पदव्युत्तर साहित्य भाग-१

दिनांक १५ ऑगस्ट १९८१ रोजी वसतिगृहातील लोकमान्य टिळक वाचनालयास वसतिगृह विद्यार्थी संकलित

निधीतून सुमारे ५१०/-रुपयांची पुस्तके व मासिके अर्पण करण्याचा कार्यक्रम प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर यांच्या हस्ते झाला.

१९८१-८२ या वर्षाकरिता डॉ. दि. वा. ढमढेरे यांची वैद्यकीय सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दिनांक ७ व ८ ऑगस्ट ८१ या दोन दिवशी पुणे विद्यापीठ आरोग्य सेवा योजना यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच दिनांक २३ ऑगस्ट ८१ रोजी विद्यापीठातील तज्ज्ञ डॉक्टरांचे "आरोग्य" या विषयावर एक व्याख्यान आयोजित केले होते.

दिनांक १ व २ सप्टें. ८१ या दोन दिवशी वसतिगृह विद्यार्थ्यांनी श्रीगणेशोत्सवाचे कार्यक्रम उत्तम रीतीने आखून पार पाडले.

या वर्षाकरिता विद्यार्थी प्रतिनिधी मंडळावर नियुक्त केलेल्या व निवडून आलेल्या विद्यार्थ्यांनी पुढीलप्रमाणे काम करण्यास मोठया उत्साहाने सुरुवात केली आहे.

**१. वाचनालय व पालवी समिती :**

श्री. कुदळे एम. बी. ( पर्यवेक्षक )
श्री. कुलकर्णी डी. पी.
श्री. सोमवंशी एम. के.
श्री भोंगळे के. जे.

**२. खेळ समिती :**

श्री. पठारे एस. ए. ( पर्यवेक्षक )
श्री. मालपुरे आर. एस.
श्री. मुजुमदार एस. एस.
श्री. पाटील पी. बी.

**३. भोजनालय व उपाहारगृह समिती :**

श्री. दाते ए. के. ( पर्यवेक्षक )
श्री. भाटीया बी. एन.
श्री. अहिवळे वाय. जी.

**४. सांस्कृतिक कार्यक्रम समिती :**

श्री. दाते ए. के. ( पर्यवेक्षक )
श्री. काटकर एस. के.
श्री. पाटील आर. जे.
श्री. पाटील के. एस.

**५. स्वच्छता व आरोग्य समिती :**

श्री. कुदळे एम. बी. ( पर्यवेक्षक )
श्री. गांगल एच. पी.
श्री. खेतमालीस डी. एन.

रविवार दिनांक २७-१२-८१ रोजी इयत्ता १२ वी मधील विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या दृष्टिकोणातून एक सभा आयोजित केली. या सभेत कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. अ. गो. जुमडे व वसतिगृहप्रमुख प्रा. वि. रा. शिरगुरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. ३१ जाने. व १ फेब्रुवारी ८२ असे दोन दिवस दरवर्षीप्रमाणे वसतिगृह दिनाचा सोहळा पार पडला. या कार्यक्रमाकरिता सरचिटणीस श्री. मंगेश जाधव व सह-चिटणीस श्री. सुनील आठवले यांनी काम पाहिले. यावेळी आयोजित केलेल्या "आनंदमेळा" या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. सौ. शकुंतला कटककर यांनी केले, तसेच विविध मनोरंजन या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. श्रीमती सरोजिनी बाबर यांनी भूषविले.

मार्च १९८१ मध्ये पुणे विद्यापीठाने घेतलेल्या पद्व्युत्तर भाग-२ "औद्योगिक मानसशास्त्र" या विषयाच्या परीक्षेत वसतिगृह पर्यवेक्षक श्री. दादाजी शिंदे सर्वप्रथम आले.

वसतिगृहाच्या दैनंदिन कामात व विकास योजनांची अंमलबजावणी करण्यात शिक्षण प्रसारक मंडळी व स. प. महाविद्यालयातील अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभत आलेले आहे. विशेषतः मा. मो. वि. गवंडी, अध्यक्ष नियामक मंडळ, प्रा. वि. द. सरलष्कर-चिटणीस शि. प्र. मंडळी, प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर, प्रा. श. द. भागवत, प्रा. पु. श्री. वैसास, प्रा. अ. गो. जुमडे यांची बहुमोल मदत झालेली आहे. वसतिगृहातर्फे आम्ही सर्व त्यांचे ऋणी आहोत.

**प्रा. वि. रा. शिरगुरकर**

## विद्यार्थिनी वसतिगृह

१९८१-८२ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थिनी वसतिगृहात एकूण १०७ विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला. त्यांची वर्गवार संख्या पुढीलप्रमाणे :-

| वर्ग | साहित्य | शास्त्र | वाणिज्य | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| इयत्ता ११ वी | १ | १३ | ४ | — | १८ |
| इयत्ता १२ वी | ५ | ८ | ३ | — | १६ |
| प्रथम वर्ष | ६ | १२ | ४ | — | २२ |
| द्वितीय वर्ष | ५ | ७ | ४ | — | १६ |
| तृतीय वर्ष | ६ | १३ | ३ | — | २२ |
| पदव्युत्तर साहित्य | ५ | — | — | — | ५ |
| बी. एड्. व इतर | — | — | — | ८ | ८ |
| एकूण : | २८ | ५३ | १८ | ८ | १०७ |

यावर्षी पर्यवेक्षिका म्हणून प्रा. सौ. नीलिमा कुलकर्णी व कु. नेत्रा धाराशिवकर यांची नियुक्ती करण्यात आली.

डॉ. सौ. आशा गीत यांची वैद्यकीय सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दिनांक २९ जुलै १९८१ रोजी वसतिगृह विद्यार्थिनींचा परस्पर परिचयाचा कार्यक्रम प्राचार्य डॉ. दि. व. केरूर यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला.

दि. १३ व १४ ऑगस्ट १९८१ या दोन दिवशी पुणे विद्यापीठ आरोग्य सेवा योजना यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच दिनांक २५ सप्टेंबर ८१ रोजी डॉ. विश्वास डाके यांचे "नेत्रदोष" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते व दिनांक २७ सप्टेंबर ८१ रोजी विद्यार्थिनींचे डोळे तपासण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रतिवर्षीप्रमाणे कै. सौ. सुशीलाबाई पाडगावकर स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

१९८०–८१ वर्षीचा " गुराप्पा मुद्दापूर " शिष्यवृत्ती रुपये ३००/–कु. स्नेहलता वाघ द्वि. व. शास्त्र हिला देण्यात आली.

या वर्षाकरिता विद्यार्थिनी प्रतिनिधी मंडळावर नियुक्त केलेल्या विद्यार्थिनींनी पुढीलप्रमाणे काम करण्यास मोठ्या उत्साहाने सुरुवात केली आहे:—

प्रा. सौ. नीलिमा कुलकर्णी व कु. नेत्रा धाराशिवकर– पर्यवेक्षिका.

कु. सविता जोशी – सरचिटणीस व कु. सीमा मुजुमदार – सहचिटणीस.

इतर सभासद :– मंजिरी करमरकर, स्वाती कुलकर्णी, अनिता दाते, वर्षा सातवेकर, सुमेधा कुलकर्णी, स्वाती मुळे, कल्पना जोशी, सुचेता कुलकर्णी, वंदना कुलकर्णी, संजीवनी कुंटे, नीलिमा कुलकर्णी व सुस्मिता मुखर्जी.

**प्रा. म. रा. राईलकर**

## जिमखाना

### कनिष्ठ महाविद्यालय

वर्ष १९८१–८२ सालाकरिता आपल्या महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाने महाराष्ट्र राज्य क्रीडा विभागाकडून आयोजित केलेल्या हिवाळी व पावसाळी सत्रात खालील विभागात प्रतिनिधित्व केले आहे.

| पावसाळी सत्र | हिवाळी सत्र |
|---|---|
| ( १ ) कब्बडी | ( १ ) ॲथलेटिक्स |
| ( २ ) फूटबॉल | ( २ ) बॅडमिंटन |
| ( ३ ) टेबल–टेनिस | ( ३ ) हॉकी |
| ( ४ ) बास्कटबॉल | ( ४ ) व्हॉलीबॉल |
| ( ५ ) जलतरण | ( ५ ) कुस्ती |
| ( ६ ) खो–खो | ( ६ ) जिम्नॅस्टिक |

खालील खेळाडूंची पुणे विभाग व महाराष्ट्र राज्य संघामध्ये निवड झाली आहे.

| पुणे विभाग | महाराष्ट्र राज्य |
|---|---|
| **( १ ) टेबल-टेनिस ( मुले )** | |
| ( १ ) गजानन भिडे | ( १ ) गजानन भिडे |
| ( २ ) विनोद कुलकर्णी | |
| ( ३ ) राजू तुळपुळे | |
| ( ४ ) समीर देशपांडे | |
| **( २ ) खो-खो ( मुले )** | |
| ( १ ) जयदीप खरे | |
| ( २ ) संजय पाटणकर | |
| ( ३ ) अतुल सोमण | |
| ( ४ ) अभिजित कुलकर्णी | |
| ( ५ ) महेश देशिंगकर | |
| ( ६ ) शेखर गंधी | |
| ( ७ ) संजय मुळे | ( १ ) संजय मुळे |
| ( ८ ) शिरीष पोळेकर | |

*With best compliments from*

✧ फोन नंबर : ३२७१०

३२३३७

✧ तारेचा पत्ता : धूम्रपान

## ठाकूर सावर्डेकर आणि कंपनी लि.

विड्यांचे कारखानदार

३७७ गुरुवार पेठ, पुणे ४११ ००२

पुण्याची सुप्रसिद्ध

**लंगर विडी**

इतर लोकप्रिय ब्रॅन्डस् :

घोडा, शंकर, गोविंद, कंदील, सिंह, बॉंबे लंगर,

परी, मेंगलोर लंगर इत्यादी

( ९ ) महेश दातार.
(१०) पराग देवल

| | पुणे विभाग | महाराष्ट्र राज्य |
|---|---|---|
| ( ३ ) **जलतरण-मुली** | १. अरुंधती जोशी.<br>२. मधुवंती जोशी<br>३. भारती जोशी<br>४. संध्या उडपीकर | १. अरुंधती जोशी |
| ( ४ ) **ॲथलेटिक्स-मुले** | १. मिलिंद राजहंस | १. मिलिंद राजहंस |
| ( ५ ) **हॉकी-मुली** | | १. भारती वैद्य<br>२. गीतांजली फडके |
| ( ६ ) **व्हॉलीबॉल-मुले** | | १. दत्ता मोरे |
| ( ७ ) **खो-खो-मुली** | | १. मेधा डिके |
| ( ८ ) **जिम्नॅस्टिक-मुली** | | १. संजीवनी करंदीकर<br>२. जयश्री बापट<br>३. ज्योत्स्ना खरे<br>४. रणजित काकडे |
| ( ९ ) **ज्युदो** | १. रणजित काकडे | १. रणजित काकडे |
| (१०) **मल्लखांब** | | १. रवींद्र पेठे<br>२. खनाडे |
| (११) **क्रिकेट-मुले** | १. अतुल सोमण<br>२. जितेंद्र जोगळेकर<br>३. सुरेंद्र भावे<br>४. अभिजित कुलकर्णी<br>५. प्रसन्न पिंपळे<br>६. योगेश जोशी<br>७. भांडारकर | १. अतुल सोमण<br>२. जितेंद्र जोगळेकर |

| | पुणे विभाग | महाराष्ट्र राज्य |
|---|---|---|
| (१२) **क्रिकेट-मुली** | ( १ ) माधवी गवंडी | ( १ ) माधवी गवंडी<br>( २ ) सरिता धडफळे |
| (१३) **कब्बडी-मुली** | ( १ ) स्मिता देवस्थळे. | |
| (१४) **टेनिस** | ( १ ) जयंत कढे | |

**अभिनंदनीय**

डिसेंबर ८२ साली होणाऱ्या आशियाई क्रीडास्पर्धेमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या जयश्री बापट व संजीवनी करंदीकर यांची भारतीय जिम्नॅस्टिक संघात निवड झाली आहे. सदरच्या खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा अनुभव मिळण्याच्या दृष्टीने आयोजित केलेल्या सरावस्पर्धेसाठी मॉस्को येथ झालेल्या भारत-सोव्हिएत युनियन क्रीडा महोत्सवात भारतीय जिम्नॅस्टिक्स संघात निवड झाली आहे.

**नि. अं. गुरव**
संघटक

**प्रा. पु. श्री. घैसास**
प्रमुख

## जिमखाना वरिष्ठ महाविद्यालय

वर्ष १९८१-८२ सालाकरिता खालील समितीने जिमखाना आंतर महाविद्यालयीन क्रीडा समितीचे कामकाज पाहिले.

| खेळ | सेक्रेटरीचे नाव | विभाग प्रमुख शिक्षक |
|---|---|---|
| क्रिकेट | १. पवन कुलकर्णी<br>२. वंदना कुलकर्णी | प्रा. अरुण बेलसरे |
| हॉकी | १. शेखर दामले<br>२. उषा बर्वे | प्रा. आपटे |
| भारतीय | १. प्रकाश पवार | प्रा. एच. एस. साने |
| ॲथलेटिक्स | १. अजय देवधर<br>२. साधना शहा | प्रा. देवकुळे |
| जलतरण | १. दीपक नानिवडेकर<br>२. वजयंती बिवलकर | प्रा. एस. डी. गोरे |
| व्हॉलीबॉल | १. गिरीश महाजनी | प्रा. मा. शं. सोमण |

बास्केटबॉल

२. किशोरी भदे

मायनॉर गेम्स

१. विनय कुलकर्णी प्रा. खासगीवाले

२. मंजिरी गोखले

फुटबॉल

१. रविंद्र देवधर प्रा. एम. जी. परांजपे

टेनिस

१. आनंद तोरवी प्रा. राजगुरू

गिर्यारोहण

१. सुनील बोडस प्रा. एस. डी. गोरे

वजन उचलणे

१. विद्या कोरगावकर प्रा. जी. के. शिरोडे

आंतर महाविद्यालयीन क्रीडा प्रतिनिधी

१. श्रीराम पटवर्धन

२. मनीषा विळेकर

जनरल सेक्रेटरी

रमेश फणसे

पुणे विद्यापीठ प्रतिनिधी

राजेंद्र सावंत

कुलसचिव

श्री. आनंद क्षीरसागर

कार्यालय अधीक्षक

श्री. पां. वा. केळकर

| खेळाचे नाव | खेळाडूचे नाव |
|---|---|
| (१) टेबल-टेनिस | संजय कबाडे |
| (२) वॉटरपोलो | आनंद जोशी |
| (३) जलतरण | आनंद जोशी |
| | वैजयंती बिवलकर |
| (४) फूटबॉल | रवींद्र देवधर |
| (५) कब्बडी | चारुशीला जेधे |
| (६) व्हॉलीबॉल | मंजिरी फणसळकर |
| | भाग्यश्री जोशी |
| | किशोरी भदे |
| | गीता दातार |
| | सुजाता भागवत |
| | केदार जोशी |
| (७) बास्केटबॉल | प्रमदा कुलकर्णी |
| | उमा चव्हाण |
| | सीमा भोपटकर |
| (८) क्रिकेट | पवन कुलकर्णी |
| | रियाझ पूनावाला |
| | भालचंद्र जोगळेकर |
| | अजय कारेकर |
| | हेमंत आठले |
| (९) हॅण्डबॉल | प्रमदा कुलकर्णी |
| | साधना शहा |
| | उमा चौहान |
| (१०) कुस्ती | अनिल जगताप |
| (११) जिम्नॅस्टिक | सुनील गोखले |
| | श्रीरंग चितळे |
| | मीना ढवळे |
| | विद्युत भागवत |
| | सचिन कुंटे |
| (१२) हॉकी | मनीषा विळेकर |
| | उषा बर्वे |
| | वैजयंती दाते |
| | अनुराधा मोहिते |
| | वैशाली पोतनीस |
| | विद्या देशमुख |
| (१३) वेटलिफ्टिंग | नितीन श्रोत्री |
| | शेखर शळके |
| (१४) बेस्ट-फिजिक | प्रशान्त पाटील |
| (१५) खो-खो | प्रदीप भट |
| | विशाखा जबडे |
| (१६) अॅथलेटिक्स | साधना शहा |
| | वैजयंती बिवलकर |
| | प्रकाश पवार |
| | माधव आवटे |
| (१७) क्रिकेट | माधवी लेले |
| | वंदना कुलकर्णी |
| | रेखा नलावडे |
| | नीता कदम |
| | साधना केळकर |
| | नीलिमा बर्वे |

(१८) खो-खो किशोर राठी

महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी वर्ष १९८१-८२ चे सर्वसाधारण अजिंक्यपद संपादन करून क्रीडा विभागाला व महाविद्यालयाच्या परंपरेला साजेशी गौरवास्पद कामगिरी केली आहे. सदरचे अजिंक्यपद बऱ्याच वर्षांनंतर महाविद्यालयास मिळाले आहे. त्यातच काही खेळाडूंनी उत्कृष्ट वैयक्तिक कामगिरी करून पुणे विभाग व विद्यापीठाचे कर्णधारपद भूषविले आहे.

( १ ) कु. साधना शाह – मैदानी स्पर्धेत वैयक्तिक अजिंक्यपद.

(२) कु. वैजयंती बिवलकर – जलतरण स्पर्धेत विजेतेपद महाराष्ट्रराज्य क्रॉसकन्ट्री संघाची कर्णधार.

( ३ ) श्री. पवन कुलकर्णी – पुणे विभाग क्रिकेट संघाचा कप्तान.

( ४ ) श्री. आनंद जोशी – पुणे विद्यापीठ वॉटरपोलो संघाचा कप्तान.

( ४ ) कु. किशोरी भदे – पुणे जिल्हा व्हॉलीबॉल संघाची कर्णधार.

( ६ ) कु. प्रमदा कुलकर्णी – पुणे विभाग बास्केटबॉल संघ, उप – संघनायक

सदरच्या वर्षात खालील-प्रमाणे अजिंक्यपदे मिळविली आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) व्हॉलीबॉल | ( मुली ) | – | विजयी |
| ( २ ) बास्केटबॉल | ( मुली ) | – | विजयी |
| ( ३ ) हॅण्डबॉल | ( मुली ) | – | विजयी |
| ( ४ ) हॉकी | ( मुली ) | – | विजयी |
| ( ५ ) जिम्नॅस्टिक | ( मुले ) | – | विजयी |
| ( ७ ) क्रिकेट | ( मुले ) | – | उप-विजयी |

कनिष्ठ महाविद्यालयाच्या कु. जयश्री बापट, कु. संजीवनी करंदीकर यांची डिसेंबर ८२ मध्ये होणाऱ्या आशियाई जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत भारतीय संघात निवड झाली आहे. अतिशय लहान वयात वरील खेळाडूंनी मिळविलेले यश महाविद्यालयाला अतिशय भूषणास्पद आहे. पदव्युत्तर विभागातील कु. नीलिमा बर्वे हिची दौऱ्यावर जाणाऱ्या [ न्यूझिलंड ] भारतीय संघात निवड झाली आहे. गेली चार वर्षे सातत्याने राष्ट्रीय स्पर्धेत चमकणाऱ्या या खेळाडूंबद्दल महाविद्यालयाला अभिमान वाटतो.

महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाकडून उन्हाळी सुट्टीमध्ये विविध खेळांची प्रशिक्षण शिबिरे गेले चार वर्षे आयोजित केली जातात. वर्ष ८१-८२ मध्ये एकूण ७०० शालेय व महाविद्यालयीन खेळाडूंनी या शिबिरात भाग घेतला. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व प्रशिक्षित शिक्षक यांचे मार्गदर्शन या शिबिराला लाभलेले होते. जिमखान्याचा सदरचा उपक्रम अत्यंत आवश्यक व स्पृहणीय आहे असे शिबिरात भाग घेतलेल्या खेळाडूंनी व त्यांचे पालक वर्गाने कळविले आहे.

**नि. अं. गुरव** — संघटक

**प्रा. पु. श्री. घैसास** — प्रमुख

## छात्रसेना पायदळ विभाग

### ७/३६ महाराष्ट्र पलटण

पहिल्या शैक्षणिक सत्रात छात्रसेनेच्या केवळ १८ कवायती झाल्या. वार्षिक प्रशिक्षण शिबिर शासनाच्या आडमुठया धोरणामुळे स्थगित होत राहिले. पण शेवटी २५ डिसेंबर १९८१ ते ३ जानेवारी १९८२ असे १० दिवसांचे संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिर कोल्हापूरला टेंबलाई टेकडीच्या पायथ्याशी भरविण्याचे ठरविले. छात्रसैनिकांच्या उत्साहाला पारावार राहिला नाही. सर्वांनी शिबिरात काय काय करायचे याचे बेत आखले होते. २५ डिसेंबर १९८१ ला सकाळी ८-३० ला शिवाजीनगरहून ५ बसेसचा तांड कोल्हापूरला निघाला. दुपारी ४ च्या सुमारास शिबिरात दाखल झालो. अंडर ऑफिसर श्री. मुकुंद आगलावे यांच्या नेतृत्वाखाली स. प. च्या छात्रसनिकांनी तंबू उभारला आणि सर्व सोळा छात्रसैनिकांनी भरपूर मेहनत घेऊन शिबिरात लाईन ड्रसिंग स्पर्धेत कमांडरसाहेबांची वाहव मिळवली.

२ महाराष्ट्र पायदळ पलटणीचे मुख्य अधिकारी मेजर दिलीप बर्वे हे आमचे कॅंप कमांडर ( शिबिराचे प्रमुख अधिकारी ) होते.

कवायतीच्या स्पर्धेत अंडरऑफिसर श्री. मुकुंद आगलावे यांनी भाग घेतला. एकूण ५ तुकड्यांत आमच्या पलटणीन म्हणजे ३६ महाराष्ट्र पलटणीने अग्रक्रम मिळविला. एवढेच

*With Best Compliments From*

★

# SPARK ENGINEERS

Dadawadi Jain Temple, Near Saras Baug,
1747 Shukrawar Peth
PUNE 411 030

नव्हे तर लाईन ड्रेसिंग, क्रॉस-कंट्री या स्पर्धांतही अग्रक्रम मिळवून ३६ महाराष्ट्र पलटणीची 'शान' कायम राखली.

हा हा म्हणता शिबिराचे १० दिवस केव्हा संपले ते कळलेच नाही. २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त गेल्या वर्षी जसे सेक्शन बॅटलड्रीलचे प्रात्यक्षिक केले होते तसेच यावर्षीही 'संगीन-युद्ध' (Bayonet Fighting) प्रात्यक्षिक दाखवायचा आमच्या छात्रसनिकांचा निर्धार आहे.

अंडर ऑफिसर श्री. भरत चव्हाण हे गुरगाव (हरयाणा) येथील बेसिक-लीडरशिप शिबिराला गेले होते. त्यांनी तर संपूर्ण महाराष्ट्राच्या तुकडीचे नेतृत्व केले. या शिबिराचे प्रमाणपत्र त्यांना आमच्या छात्रसेनेच्या सर्वोच्च अधिकाऱ्याकडून म्हणजे मेजर जनरल श्री. नरेंद्रसिंग यांच्याकडून मिळाले. या शिबिराचे आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्टय म्हणजे शिबिरार्थींकडून शतप्रतिशत रक्तदान करण्यात आले.

२६ जानेवारीच्या प्रजासत्ताकदिनी खालील छात्रसैनिकांना बक्षिसे दिली जाणार आहेत.

(१) सीनिअर अंडर ऑफिसर श्री. राजेंद्र सावंत मेजर डी. व्ही. कुलकर्णी पारितोषिक.

(२) ज्युनिअर अंडर ऑफिसर श्री. मुकुंद आगलावे–कॅप्टन पी. आर. करमरकर पारितोषिक

(३) ज्युनिअर अंडर ऑफिसर श्री. भरत चव्हाण

(४) कंपनी सार्जंट मेजर श्री. मिलिंद पाटील– मेजर आर. एन. गायधनी पारितोषिक

(५) सीनिअर अंडर ऑफिसर श्री. राजेंद्र सावंत, सर्वोत्कृष्ट मुष्टियोद्धा– हुतात्मा वसंत दाते पारितोषिक

(६) सार्जंट श्री. रुचिर कुलकर्णी– सर्वोत्कृष्ट नेमबाज.

( i ) हुतात्मा वसंत दाते पारितोषिक

( ii ) 'बी' प्रमाणपत्र परीक्षेत ३६ महाराष्ट्र बटालियनमध्ये सर्वप्रथम.

(७) सीनिअर अंडर ऑफिसर श्री. शाम भुतडा–'सी' प्रमाणपत्रपरीक्षेत सर्वप्रथम.

(८) कंपनी क्वार्टर मास्टर सार्जंट श्री. रवींद्र मणोकर –बेस्ट कॅडेट.

यावर्षी स. प. महाविद्यालयातून 'बी' प्रमाणपत्रपरीक्षेला एकूण बारा छात्रसैनिक बसणार आहेत तर 'सी' प्रमाणपत्रपरीक्षेला एकूण सहा छात्रसैनिक बसणार आहेत. या परीक्षा २३।२४ फेब्रुवारीला १९८२ रोजी अॅग्रिकल्चर कॉलेजच्या मैदानावर होणार आहेत.

**प्रा. कॅप्टन अविनाश जानवे**

## छात्रसेना ( मुलींची )

दरवर्षीप्रमाणेच या वर्षीही मुलींच्या छात्रसेनेला विद्यार्थिनींकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. यावर्षी आपल्या महाविद्यालयातून एकूण ७५ विद्यार्थिनींनी छात्रसेनेत नावे दाखल केली. त्यापैकी पायदळामध्ये ६७, हवाई दलामध्ये ६ व आरमारदलामध्ये २ अशी संख्या आहे. जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी छात्रसेनेत दाखल व्हावे यासाठी कमांडिंग ऑफिसर मेजर ए. के. चौधरी यांचे प्रेरणाप्रद भाषण आयोजित करण्यात आले.

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून परेडस्ना सुरुवात झाली. 'G-I' प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेल्या १८ विद्यार्थिनींना १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन या दिवशी प्राचार्य डॉ. केरूर यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली.

गतवर्षीपासून छात्रसेनेत असलेल्या कॅडेटनी विविध स्तरांवर आयोजित केलेल्या शिबिरांमध्ये उत्साहाने भाग घेतला.

१. बंगलोर येथे झालेल्या ( २ जून ८१ ते १३ जून ८१ ) बेसिक लीडरशिप कोर्ससाठी सार्जंट चित्रा केळकर उपस्थित होती.

२. पाचगणी येथे २० मे ८१ ते १० जून ८१ या काळात आयोजित केलेल्या अॅडव्हान्स लीडरशिप कोर्ससाठी ज्युनि. अण्डर ऑफिसर लीना जोशी उपस्थित होती. तसेच

३. नांदेड येथे झालेल्या ३१ जुलै ८१ ते १० ऑगस्ट ८१ या काळातील प्रजासत्ताकदिनपूर्व शिबिरास ज्युनि. अण्डर ऑफिसर लीना जोशी व सार्जंट चित्रा केळकर उपस्थित होत्या.

२० सप्टेंबर रोजी पूना वूमन्स कौन्सिलनी आयोजित केलेल्या फ्लॉवर शोसाठी आपल्या कॅडेटस स्वयंसेवक म्हणून गेल्या होत्या.

१९ सप्टेंबरला अॅडव्हेंचर ट्रेनिंगसाठी आपल्या कॉलेजच्या २१ मुली सिंहगडला गेल्या होत्या.

दि. ६ ऑगस्ट व २७ सप्टेंबर या दिवशी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात एकूण १५ कॅडेट्सनी रक्तदान केले.

दिवाळीच्या सुट्टीतील हॉस्पिटल अटॅचमेंटच्या शिबिरा-

साठी साजट चित्रा केळकर व कॅडेट मेधा व्ही. जोशी या गेल्या होत्या. तसेच नागरी संरक्षण शिबिरास ७ कॅडेटस गेल्या होत्या. तेथे घेतल्या गेलेल्या परीक्षेमध्ये कॅडेट शुभांगी देवधर हिला तृतीय पारितोषिक मिळाले.

पाचगणी येथे नुकत्याच झालेल्या २७ डिसेंबर ८१ ते ३ जानेवारी ८२ च्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरास आपल्या महाविद्यालयातून ३२ कॅडेटस गेल्या होत्या. त्यापैकी २८ पायदळ व ४ हवाईदलातील होत्या. या शिबिरामध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे–

| | |
|---|---|
| १. बेस्ट कॅडेट | : ज्युनि. अंडर ऑ. लीना जोशी |
| २. बेस्ट ड्रिल | : ज्युनि. अंडर ऑ. लीना जोशी |
| ३. बेस्ट टेंट लेआऊट (प्रथम पारितोषिक) | : एअरविंग कॅडेटस |
| ४. बेस्ट टेंट लेआऊट (द्वितीय पारितोषिक) | : सिनीयर अंडर ऑ. स्वाती इनामदार व इतर |
| ५. बेस्ट सोलो साँग | : कॅडेट हेमलता केळकर |
| ६. बेस्ट ग्रुप साँग | : एअरविंग कॅडेटस |
| ७. बेस्ट ग्रुप डान्स | : ज्युनि. अंडर ऑ. लीना जोशी व सार्जंट चित्रा केळकर. |

**प्रा. कु. पद्मजा घोरपडे**

## 3 Mah Naval Unit, N. C. C.

In the B - Certificate examination conducted in March 1981, 5 cadets from our College have passed in B - grade. Two cadets have passed C - Certificate examination in which Cadet Capt. Dhananjay Sane ( T. Y. B.Sc. ) had secured A - grade which is rarely obtainable.

During May - June 1981 P. O. Cadet Sudam Chavan and P. O. Cadet Hemant Kelkar were selected for the Advanced Leadership ( Sea - Attachment ) Course at Vishakhapatnam. N. C. C. officer Lt. S. S. Pandit represented Maharashtra in the same camp. Our cadets were benefitted by the course by way of visiting Naval bases such as INS Cirkars, INS Satvahana, INS Virbahu and Naval worships and submarines such as INS Vaghir, INS Rajput. Various Naval customs and traditions were learnt and followed by our cadets.

The enrolment of this year was made with maximum response by Jr. College students. More than a hundred of cadets in all is a solid contribution to the open unit by our college alone.

P. O. Cadet Dinanath Lele of S. Y. J. C. ( Commerce ) class is selected from all, regarding Republic Day Parade in January 1982 at New Delhi. He attended many selection camps as at Nanded, Poona, Bombay and had shown best performance in various activities. Hearty congratulations.

Our past student and one of the best cadets Shri. Ajay Badamikar is abroad in Merchant Navy. He has donated a precious trophy on his name regarding annual regatta competitions. In addition, the best cadet from our college will also get 'Badamikar - medal' every year. The naval cadets get continuous encouragement by way of such remarkable donations.

The annual training camp is being conducted at Alandi during Dec. 1981 to Jan. 1982. About twenty of our cadets will be attending the camp.

Prof. Lt. **S. S. Pandit**
Prof. S/Lt. **S. R. Gogawale**

# राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये या वर्षी १५० विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कार्यक्रम अधिकारी आणि विद्यार्थी – प्रतिनिधी यांनी मा. प्राचार्य, मा. उपप्राचार्य मोडक, विविध स्तरावरील वन अधिकारी, शेतीतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते इत्यादींच्या मार्गदर्शनाच्या सहाय्याने अनेक कार्यक्रम राबविले. या कार्यक्रमांमध्ये ग्रामीण विकास, नवीकरण, पशुसंवर्धन, कुष्ठ रोग्यांची सेवा, अपंगांची सेवा, ऊर्जाविकास, शैक्षणिक विकास, इत्यादी उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले.

## १९८१–८२ या शैक्षणिक वर्षातील प्रमुख कार्यक्रम

( १ ) **रक्तदान :** फेब्रुवारी, १९८१ मध्ये गरवारे रक्तपेढीच्या सहाय्याने झालेल्या कार्यक्रमात १७८ विद्यार्थी विद्यार्थिनींनी रक्तदान केले. या विक्रमी कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथकात नसलेल्याही विद्यार्थ्यांचा प्रतिसाद फारच उत्साहजनक होता. त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षामध्ये म्हणजे डिसेंबर १९८१ मध्ये पुन्हा १२८ विद्यार्थी–विद्यार्थिनींनी रक्तदान केले.

( २ ) **वर्षान्त समारंभ :** १९८०–८१ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचा वर्षांत समारंभ ५ मार्च, १९८१ रोजी झाला. या समारंभाचे अध्यक्षस्थान मा. डॉ. वि. रा. किराड ( अध्यक्ष, स्थानिक व्यवस्थापन समिती ) यांनी भूषविले. यानिमित्ताने डॉ. किराड यांच्या सामाजिक कार्याचा, अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थीवर्गास मिळाला.

( ३ ) **वृक्षस्नेहसंस्कार छावणी :** मुंबईच्या नॅशनल पार्कमध्ये झालेल्या या दहा दिवसांच्या शिबिरास पुणे विद्यापीठातर्फे पाच विद्यार्थी पाठविलेले होते. त्यात आपल्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातील श्री. मिलिंद देवल, श्री. अरगडे, श्री. सतीशचंद्र जोशी या तीन विद्यार्थ्यांचा समावेश होता.

( ४ ) **महाराष्ट्र पातळीवरील वनशिबिर :** शिवाजी विद्यापीठातर्फे सागरेश्वर येथे आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये आपल्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विशेष म्हणजे श्री. दीपक करंदीकर यास सांगली वन विभागातर्फे उल्लेखनीय कामगिरीबद्दल चांदीचा कप बक्षीस मिळाला.

( ५ ) **अंध मुलींच्या शाळेतील कार्यक्रम :** कोथरूड यथील अंध मुलींच्या शाळेमध्ये विविध कार्यक्रम घेण्यात येतात. या कार्यक्रमांची सुरुवात अंध विद्यार्थिनी कु. मुक्ता पाटील हिच्या शुभहस्ते झाली. या कार्यक्रमामध्ये खेळण्यासाठी मैदान तयार करणे, वृक्षारोपण, अंध मुलींना पुस्तके वाचून दाखविणे, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश आहे. विद्यार्थिनींच्या एका गटाने दर रविवारी शाळेस भेट देऊन या कार्यक्रमाचे सातत्य राखले.

( ६ ) **गांधी भवनाशी संपर्क :** ग्रामीण विकसनाच्या कार्यामध्ये सोपा संडास, गोबर गॅस, इत्यादींचे महत्त्व सर्वश्रुत आहेच. या संदर्भात चर्चा करून, मार्गदर्शनासाठी आपले विद्यार्थी सातत्याने गांधी भवनाशी संपर्क ठेवीत असतात. याबाबत श्री. तोडणकर यांचे मार्गदर्शन उल्लेखनीय होते.

( ७ ) **चोराची आळंदी येथे वीस दिवसांचे लघु-शिबिर :** ग्रामस्थांच्या आग्रहपूर्वक विनंतीनुसार आपल्या पथकातील काही विद्यार्थ्यांनी श्रमदानाने चोराची आळंदी ते कुंजीरवाडी हा रस्ता तयार करण्यास मदत केली.

( ८ ) **कुष्ठधामातील कार्यक्रम :** डॉ. बांदोरावाला कुष्ठरोग रुग्णालय, कोंढवा येथे गेली तीन वर्षांपासून आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी कार्य करीत आहेत. वृक्षारोपण, मनोरंजनाचे कार्यक्रम, श्रमदान, इत्यादी कार्यक्रम झाले. एका कार्यक्रमामध्ये सुमारे १२५ विद्यार्थी–विद्यार्थिनींनी कोंढवा येथे वस्तीला राहून भरीव कार्य केले. या विविध कार्यक्रमांमुळे कुष्ठरोग व रोग्यांची मानसिक स्थिती यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. त्यासाठी या रुग्णालयातील डॉ. दयानंद, डॉ. तावडे आणि मा. मेहेंदळे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. गणेशोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा एक कार्यक्रम करून तेथील रुग्णांचे मनोरंजन केले.

( ९ ) **पुणे विद्यापीठामध्ये वृक्षारोपण :** या वर्षी पावसाळ्यामध्ये पुणे शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या श्रमदानातून पुणे विद्यापीठ परिसर वृक्षमय करण्याची योजना होती. आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेने यात उत्साहाने सहभाग घेतला.

(१०) **भारतीय समाज विकास संशोधन संस्था :** या संस्थेच्या मदतीने आपल्या राष्ट्रीय सेवा योजनेतील अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींना ग्रामीण विकासाचे प्रात्यक्षिक

*With Best Compliments from*

MACHNALL PRIVATE LTD.

For Quality Machining

28, Gultekdi Industrial Estate,
PUNE : 411 009

Phone : 441761

पाहून त्याचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. सुट्टीच्या काळात काही विद्यार्थी या संस्थेच्या ग्रामीण विकास केंद्रामध्ये कार्य करीत असतात. त्याचप्रमाणे खेडुतांबरोबर श्रमदान कार्यक्रमामध्येही उत्साहाने सहभागी झाले. त्यात नियोजित लिंबोळी प्रकल्पासाठी रस्त्याचे काम करण्यात आले.

(११) **वारंगवाडी :** गेल्या ३ वर्षांपासून वारंगवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे ग्रामीण विकासाचे कार्य चालू आहे. त्यातून उमद्या तरुण मनांना नवनवीन अनुभव मिळून ग्रामीण जीवनाशी समरस होता आलेले आहे. या गावात संडास, गोबर गॅस, लाईट, उपसा जलसिंचन, शेती विकास, बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून देणे, झाडे लावणे, गुरांचे शिबिर, इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण कार्यामध्ये आपले विद्यार्थी अग्रेसर आहेत. यंदा या सर्व गोष्टींचे मूर्त स्वरूप दिसू लागलेले आहे. गेल्या वर्षी अपघाती निधन झालेल्या कै. अरविंद सातपुते या विद्यार्थ्याच्या नावाने तालीम पूर्ण होत आहे. त्यासाठी गावकऱ्यांनी निधी उभारून बांधकाम खर्च केला. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतर्फेही निधी उभारून या तालमीस आधुनिक उपकरणे पुरविण्यात येतील. विद्यार्थ्यांतर्फे निधी उभारण्याच्या कार्यात मा. उपप्राचार्य मोडक, मा. कुलसचिव प्रा. देवकुळ, श्री. साळुंके आणि विद्यार्थी विद्यापीठ प्रतिनिधी राजा सावंत यांचे सक्रिय सहकार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना लाभलेले आहे.। वारंगवाडीच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही आपले विद्यार्थी गतसालाप्रमाणे यंदाही सहभागी झाले. गुरांच्या शिबिराचे यश म्हणून काही महत्त्वपूर्ण रोगांचे निर्मूलन झालेले नमूद करणे इष्ट होईल. संकरित कोंबड्यांची योजनाही यंदापासून राबविली जात आहे.

या कार्यक्रमांना गती देण्याच्या दृष्टीने एक अडीच दिवसांचे आणि एक दहा दिवसांचे ग्रामीण विकास शिबिर यशस्वी ठरलेले आहेत.

(अ) **लघु-शिबिर :** हे शिबिर दिनांक २९ ते ३१ ऑगस्ट, १९८१ या काळात झाले. एकूण ११९ विद्यार्थी-विद्यार्थिनी यात सहभागी झाले. यामध्ये वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात ५००० झाडांची लागवड करण्यात आली. पशुधन विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरासाठी पुणे जिल्ह्याचे विभागीय वन अधिकारी श्री. देशपांडे व मावळ तालुक्याचे वन क्षेत्रपाल श्री. श्रीराम संगमरकर यांचे अपूर्व मार्गदर्शन लाभले.

(ब) **ग्रामीण विकास शिबिर :** दिनांक २३ डिसेंबर, १९८१ ते २ जानेवारी, १९८२ या काळात घेतलेल्या या शिबिरामध्ये ५२ जणांनी भाग घेतला. याच काळात कै. अरविंद सातपुते तालमीचे उद्घाटन झाले. आजूबाजूच्या ग्रामस्थांनाही या शिबिर काळात आर्थिक विकासाच्या दृष्टीने ठोस पावले कशी उचलावीत याचे मार्गदर्शन केले. सांगवी, गोळ्याची वाडी, नवलाख उंबरे, राजपुरी, इत्यादी गावांना भेटी दिल्या. सद्‌ध्या या गावी सिंडिकेट बँकेतर्फे हाती घेण्यात आलेल्या ग्रामीण विकासाच्या कार्याची अभ्यासपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. नित्य श्रमदानातून शोष खड्डे घेणे, तालमीच्या बांधकामास मदत करणे, वारंगवाडी ते वडगाव गाडी रस्ता तयार करणे, इत्यादी कामे झाली. ईगल फ्लास्क या कंपनीच्या सहकार्याने विविध विकास योजनांचा आराखडा तयार करण्यात आला. त्यात वाचनालय, रेडिओ घर, आरोग्य, उपसा जलसिंचन आणि पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादींना प्राधान्य दिलेले आहे.

(१२) **टाटा इन्स्टिटयूटचे ट्रेनिंग :** टाटा इन्स्टिटयूटतर्फे राष्ट्रीय सेवा योजना कार्याची व्याप्ती वाढवून त्याचा सामाजिक सुधारणांसाठी कसा उपयोग करून घेता येईल याचे ट्रेनिंग देण्याच्या दृष्टीने एक शिबिर आयोजित केले होते. त्यात प्रा. डॉ. उत्तरा शास्त्री यांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या यशस्वी वाटचालीस आम्हास मार्गदर्शन व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत. आपल्या महाविद्यालयात अभिमानास्पद असलेल्या या योजनेमध्ये पुढील वर्षीही भरीव कार्य करण्याचा संकल्प या निमित्ताने आम्ही करीत आहोत.

**श्री सुनील शिंदे** — **प्रा. प्रवीण सप्तर्षी**
**श्री. मिलिंद देवल** — **प्रा. गंगाधर शिरोडे**
**कु. सुवर्णा फटाले**

## शि. प्र. मंडळीच्या कार्यालयाचा नवीन पत्ता—

'शारदा सभागृह,'
स. प. महाविद्यालय आवार,
जिमखान्याजवळ,
पुणे ४११ ०३०.

## वादसभा

दसभेने विविध कार्यक्रम आयोजित केले-

**परिशिष्ट १ :**

वादसभेने आयोजित केलेली व्याख्याने :

| | वक्ते | विषय |
|---|---|---|
| ( १ ) | मा. चंद्रकांत घोरपडे | लोकमान्य टिळक स्मृतिदिन. |
| ( २ ) | मा. प्रा. सु. दा. गोरे | राखीव जागा |
| ( ३ ) | मा. प्रा. व. मं. सिरसीकर | राखीव जागा |
| ( ४ ) | मा. ना. ग. गोरे | आजची आव्हाने [ हुतात्मा वसंत दाते स्मृतिदिन ] |
| ( ५ ) | मा. चं. प. भिशीकर | धर्मांतर |
| ( ६ ) | मा. न्यायमूर्ती पटवर्धन | धर्मांतर आणि संविधान |
| ( ७ ) | मा. ग. वा. बेहेरे | सामाजिक समता ( बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन ). |
| ( ८ ) | मा. बा. वा. राजेइनामदार | मानवी हक्क दिन. |

**परिशिष्ट २ :**


वादसभेने विविध स्पर्धांतून मिळविलेले यश

**( १ ) ज्ञानेश्वर वक्तृत्व स्पर्धा, नेवासे**
सांघिक प्रथम क्रमांक.
स्वाती सरदेसाई – व्यक्तिगत प्रथम क्रमांक
शुभदा गोडबोले – व्यक्तिगत द्वितीय क्रमांक.

**( २ ) पाणिनी वक्तृत्व स्पर्धा, बार्शी**
सांघिक प्रथम क्रमांक.
नीतिन आपटे – व्यक्तिगत द्वितीय क्रमांक.
अनुराधा सहस्रबुद्धे – उत्तेजनार्थ.

**( ३ ) धन्वंतरी वक्तृत्व स्पर्धा, पुणे**
सांघिक प्रथम क्रमांक
नीतिन आपटे – व्यक्तिगत द्वितीय क्रमांक.
आमोद साने– प्रशस्तीपत्र

**( ४ ) आनंद करंडक वादस्पर्धा, नासिक**
सांघिक प्रथम क्रमांक ( उत्स्फूर्त विषय )
उज्ज्वला लेले – व्यक्तिगत द्वितीय क्रमांक
विजय कुलकर्णी – प्रशस्तीपत्र.




**( ५ ) पं. दीनदयाळ वादस्पर्धा, पुणे**
उज्वला लेले – व्यक्तिगत चतुर्थ क्रमांक
विजया कुलकर्णी – प्रशस्तिपत्र

**( ६ ) मोरोपंत वाद-वक्तृत्व स्पर्धा, बारामती**
ज्योत्स्ना आठवले – उत्तेजनार्थ ( वाद-वक्तृत्व )

**( ७ ) कर्मवीर हिरे स्पर्धा, मालेगाव**
विवेक फणसळकर– व्यक्तिगत प्रथम क्रमांक (इंग्रजी)
कांचन परळीकर – प्रशस्तिपत्र ( मराठी )

**( ८ ) जयकर करंडक वादस्पर्धा**
संगीता श्रोत्री – व्यक्तिगत द्वितीय क्रमांक

**( ९ ) बँक ऑफ बरोडा वादस्पर्धा**

स्मिता धर्माधिकारी – व्यक्तिगत द्वितीय क्रमांक

**(१०) वालचंद हिराचंद वक्तृत्वस्पर्धा**

रामचंद्र पाटील – व्यक्तिगत प्रथम क्रमांक

**(११) नी. गो. पंडितराव वक्तृत्वस्पर्धा, ठाणे**

स्वाती सरदेसाई – व्यक्तिगत तृतीय क्रमांक

शुभदा गोडबोले – व्यक्तिगत चतुर्थ क्रमांक

**(१२) स. गो. बर्वे निबंधस्पर्धा**

रामचंद्र पाटील – व्यक्तिगत द्वितीय क्रमांक

**(१३) नवनिर्माण युवक संघटना निबंधस्पर्धा**

रामचंद्र पाटील – व्यक्तिगत प्रथम क्रमांक

**(१४) क्रांतीसिंह नाना पाटील निबंधस्पर्धा**

रामचंद्र पाटील – व्यक्तिगत तृतीय क्रमांक

**(१५) कै. डॉ. सौ. चंदुबाई कुलकर्णी वादस्पर्धा: नासिक.**

सांघिक प्रथम क्रमांक

उज्ज्वला लेले– व्यक्तिगत प्रथम क्रमांक

वंदना बोकील– व्यक्तिगत द्वितीय क्रमांक

**परिशिष्ट ३ :**

रोटरी क्लबने आयोजित केलेल्या "व्यक्तिगत विकसन" चर्चासत्रात संगीता श्रोत्री, विजया कुलकर्णी, भरत चव्हाण, एन. डी. धायगावे यांनी भाग घेतला तर इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट आणि लेस्ली सॉनी प्रोग्रॅम ऑफ ट्रेनिंग इन डेमॉक्रसी या संस्थांनी संयुक्तरीतीने आयोजित केलेल्या चर्चासत्रात संगीता श्रोत्रीने भाग घेतला.

वादसभेची सहल दिनांक १४ सप्टेंबर, १९८१ रोजी लोणावळा येथे गेली होती.

वादसभेतर्फे सादर करण्यात येणारा अभिरूप लोकसभा हा कार्यक्रम फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होईल. आणि डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे निबंधस्पर्धेचा निकाल त्याचवेळी जाहीर करण्यात येईल.

वादसभेचा निरोप-समारंभ फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात होईल.

**वर्षा खेर**
**विजया कुलकर्णी**
**एन. डी. धायगावे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**प्रा. उल्हास बापट**
कार्याध्यक्ष

## कलामंडळ

१९८१–८२ ह्या वर्षासाठी महाविद्यालयाच्या कलामंडळ सेक्रेटरीपदी श्री. सुधीर फडके ( द्वि. व. साहित्य ) यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच कलामंडळ प्रमुख म्हणून प्रा. श्रीराम खरे ह्यांनी काम पाहिले.

१९८१–८२ मध्ये ज्या कलाकारांनी विविध स्पर्धांतून जे कलानैपुण्य दाखवले त्या विद्यार्थ्यांची नावे

**( १ ) पुरुषोत्तम करंडक**

ह्या नाट्यस्पर्धेत एकूण दोन एकांकिका सादर करण्यात आल्या. ( १ ) कॉंपेन्सेशन – विद्यार्थी दिग्दर्शक – अजित आपटे ( २ ) अस्पर्श – विद्यार्थी दिग्दर्शिका – अंजली परांजपे

ह्यांपैकी ' अस्पर्श ' ह्या एकांकिकेची दुसऱ्या फेरीत निवड झाली व त्यामधील पारितोषिके पुढीलप्रमाणे –

( १ ) कु. गौरी गद्रे – ' माई भिडे ' अभिनयाचे प्रथम पारितोषिक

